पाहिजेत

हॉटेल साई इन, चोंढी-अलिबाग रोड येथे फुल टाईम/पार्ट टाईम रिसेप्शन स्टाफ/अकाऊंट पाहिजे (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक अर्जासह भेटा.

१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | शुक्रवार | दि. २० नोव्हेंबर २०२६ | अंक १६४ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in



रस्त्याच्या कामाचा दुसरा बळी



- बोरपाडा येथील प्रकाश भगत यांचा दुर्दैवी मृत्यू
- नागाव-खारगल्ली येथे भीषण अपघात
- ठेकेदारावर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी

। चौल । प्रतिनिधी ।

अलिबाग-रेवदंडा मार्गावरील एमएसआयडीसीच्या नियोजनशून्य रस्त्याच्या कामाने आणखी एका नागरिकाचा बळी घेतला आहे. नागाव-खारगल्ली येथे गुरुवारी (दि. १९) सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात बोरपाडा येथील ४८ वर्षीय प्रकाश भगत यांचा मृत्यू झाला. रस्त्याच्या कामासाठी ठेवलेल्या मातीच्या ढिगाऱ्याचा अंदाज न आल्याने ते १५ ते २० फूट खाली कोसळले. दोनच दिवसांपूर्वी बेलकडे-कुरुळ मार्गावरील वाहतूक कोंडीत अडकून दोन वर्षीय आरांशचा मृत्यू झाला होता. आता आणखी एका जीवाचा बळी गेल्याने एमएसआयडीसी आणि ठेकेदारांच्या निष्काळजीपणाविरोधात संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, भगत यांच्या नातेवाईकांसह ग्रामस्थांनी रुग्णालयाबाहेर गर्दी करीत प्रशासनाला जाब विचारला. तसेच जोपर्यंत ठेकेदारावर गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यास घेण्यास नकार दिला. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

शेकाप आक्रमक

प्रकाश भगत यांच्या अपघाती मृत्यूची माहिती मिळताच शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे आणि तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी जिल्हा रुग्णालयात धाव घेतली. संबंधित ठेकेदारावर तातडीने गुन्हा दाखल करावा, तसेच जबाबदार अधिकारी आणि ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी, अशी आक्रमक भूमिका मांडली. नागरिकांच्या जीवाशी खेळणारा हा प्रकार खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही शेकापच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

> रस्त्याचे काम म्हणजे विकास नव्हे, तर नागरिकांसाठी मृत्यूचा सापळा बनला आहे. वारंवार अपघात होत आहेत, निष्पाप नागरिकांचे जीव जात आहेत. आणखी किती बळी गेल्यानंतर एमएसआयडीसी प्रशासनाला जाग येणार? कामाच्या ठिकाणी साधे बॅरिकेड्स, सूचना फलक आणि सुरक्षिततेची व्यवस्था करता येत नसेल, तर कामे करता कशाला? या दुर्घटनांची जबाबदारी संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांनी स्वीकारलीच पाहिजे. दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. आम्हाला जनतेच्या जिवाची किंमत मोजून केलेला विकास नकोय.
> – हर्षदा मयेकर, सरपंच, नागाव

.. तर जीव वाचला असता

अपघातानंतर प्रकाश भगत गंभीर अवस्थेत रस्त्याखाली पडलेले असताना त्यांना तातडीने मदत मिळाली नाही. घटनास्थळी संबंधित ठेकेदाराचा कामगार किंवा सुपरवायझरही उपस्थित नसल्याची माहिती समोर आली आहे. रुग्णालयात नेण्यासाठीही तातडीने कोणी पुढाकार घेतला नाही. वेळेत मदत आणि उपचार मिळाले असते, तर कदाचित प्रकाश भगत यांचा जीव वाचला असता. रस्त्याचे काम सुरू असताना नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोणाची, असा संतप्त सवाल पुन्हा एकदा उपस्थित होत आहे.

अलिबाग-रेवदंडा मार्गावर एमएसआयडीसीमार्फत काँक्रिटीकरण आणि रुंदीकरणाची •>पान २ वर

सरकार नमलं!

। नेरळ । प्रतिनिधी ।

सायडोंगरमधील जंगलतोडीविरोधात उसळलेला जनक्षोभ आणि पर्यावरणप्रेमींच्या वाढत्या विरोधापुढे अखेर प्रशासनाला माघार घ्यावी लागली आहे. टोरंट पॉवरच्या जलविद्युत प्रकल्पासाठी प्रस्तावित भालिवडी ते पाली-सायडोंगर पोहोच रस्त्याच्या २५ नोव्हेंबर रोजी होणारी संयुक्त मोजणी पुढे ढकलण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने मोजणी तहकूब करण्याचे पत्र दिल्यानंतर भूमीअभिलेख विभागाने हा निर्णय घेतला. त्यामुळे संभाव्य आंदोलनाला तूर्तास •>पान २ वर



टोरंट हटावसाठी रविवारी सह्यांची मोहीम

कर्जत तालुक्यातील पाली-सायडोंगर येथील जंगलतोड कायमस्वरूपी बंद करावी आणि टोरंटसह पोशीर व शिलार प्रकल्प रद्द करावेत, या मागणीसाठी रविवारी (दि. २२) कर्जत पर्यावरण बचाव संघर्ष समितीतर्फे सह्यांची मोहीम राबविण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता लोकमान्य टिळक चौकात या मोहिमेला सुरुवात होईल. दसऱ्याच्या दिवशी झालेल्या वृक्षतोडीचा निषेध म्हणून सायंकाळी कर्जत शहरात कँडल मार्चही काढण्यात येणार आहे. या आंदोलनात विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, शेतकरी संघटना आणि स्थानिक बचाव समित्या सहभागी होणार आहेत. दरम्यान, शिवसेना ठाकरे पक्षातर्फे कर्जत तालुक्यात बचाव फेरी काढण्यात येणार आहे.

वे|घ|क

गोकुळचे दूध सहा रुपयांनी महागले!

कोल्हापूर : गोकुळ दूध संघाने ग्राहकांना मोठा दरवाढीचा झटका दिला आहे. म्हशीच्या दूध विक्री दरात प्रतिलीटर सहा रुपयांची, तर खरेदी दरात तीन रुपयांची वाढ करण्याचा निर्णय गुरुवारी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. तसेच गाईच्या दूध खरेदी आणि विक्री दरात प्रत्येकी दोन रुपयांची वाढ करण्यात आली आहे. नवनियुक्त चेअरमन शिवाजी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. दूध संघाला सुमारे ७० कोटी रुपयांची तूट भरून काढण्यासाठी ही दरवाढ करण्यात आल्याचे सांगण्यात आले. शनिवारपासून नवीन दर लागू होणार आहेत.

माळरानावर जनावरांच्या आतड्यांचे अवशेष

रसायनी : खालापूर तालुक्यातील माडप गावाच्या हद्दीत राजवर्धन ढाब्यासमोरील माळरानावर गवतामध्ये जनावरांच्या पोटातील आतड्यांचे अवशेष आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. बुधवारी (दि. १८) सकाळी सातच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. अज्ञात व्यक्तींनी जनावरांना ठार मारून त्यांच्या पोटातील अवशेष माळरानावर टाकल्याचा संशय आहे. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुढील तपास पोलीस हवालदार शेळके करीत आहेत.

बालदींना शिक्षा, आमदारकीला धक्का!

- आमदारकीचा डामडौल संपणार? तीन वर्षांच्या शिक्षेने खळबळ
- उरणच्या भाजप आमदारासह चौघांना अलिबाग न्यायालयाचा दणका
- १६ वर्षांनंतर मारहाण प्रकरणाचा निकाल, दोषींना सश्रम कारावास





। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

उरणचे भाजप आमदार महेश बालदी यांना अलिबाग न्यायालयाने जोरदार दणका दिला आहे. सन २०१० मधील मारहाण प्रकरणात आमदार महेश बालदी यांच्यासह चौघांना दोषी ठरवत प्रत्येकी तीन वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. १९ नोव्हेंबर २०२६ रोजी मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने हा निकाल दिला. •>पान २ वर

आता आमदारकीचे काय होणार?

तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा झाल्याने महेश बालदी यांच्या आमदारकीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ मधील कलम ८(३) नुसार दोन वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कारावासाची शिक्षा झाल्यास लोकप्रतिनिधी अपात्र ठरू शकतो. त्यामुळे बालदी यांच्यावर आमदारकी गमावण्याची वेळ येऊ शकते. आता बालदी न्यायालयाच्या निकालाला कोणत्या पद्धतीने आव्हान देतात आणि अपील न्यायालय काय निर्णय देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सफाई कामगारांच्या लढ्याला यश

- नवी मुंबईतील १४ स्थानकांच्या हस्तांतरणाला तूर्तास ब्रेक
- अंतिम निर्णयापर्यंत सिडकोकडे स्वच्छतेची जबाबदारी

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

नवी मुंबईतील १४ रेल्वे स्थानकांच्या हस्तांतरणामुळे रोजगार धोक्यात आलेल्या २६७ कंत्राटी सफाई कामगारांना मोठा दिलासा मिळाला आहे. आझाद कामगार संघटनेने उभारलेल्या न्यायालयीन लढ्यानंतर न्यायालयाने परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे हस्तांतरण प्रक्रिया तूर्तास थांबली असून, रेल्वे प्रशासनानेही अंतिम निर्णय होईपर्यंत स्वच्छतेची जबाबदारी सिडकोनेच पार पाडावी, असे स्पष्ट केले आहे.

नवी मुंबईतील १४ रेल्वे स्थानकांचे रेल्वे प्रशासनाकडे हस्तांतरण करण्यासाठी ठाणे आणि मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या खासदारांनी पाठपुरावा केला होता. त्यानुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्तताही करण्यात आली होती. मात्र, या प्रक्रियेत वर्षानुवर्षे स्थानकांची स्वच्छता करणाऱ्या २६७ कंत्राटी कामगारांच्या रोजगाराचा विचार झाला नसल्याचा आरोप आझाद कामगार संघटनेने केला.

स्थानकांचे हस्तांतरण झाल्यानंतर रेल्वेकडून स्वतंत्र ठेकेदार नेमून नवीन कामगार नियुक्त केले जाण्याची शक्यता होती. •>पान २ वर



> स्थानकांचे हस्तांतरण करताना मालमत्ता आणि प्रशासकीय जबाबदाऱ्यांबरोबरच वर्षानुवर्षे सेवा देणाऱ्या सफाई कामगारांच्या रोजगाराचाही विचार झाला पाहिजे. रेल्वे आणि सिडको प्रशासनाने समन्वय साधून कामगारांच्या हिताचा निर्णय घ्यावा. कामगारांना न्याय मिळेपर्यंत आमचा न्यायालयीन लढा सुरूच राहील.
> – **महादेव वाघमारे,** संस्थापक, आझाद कामगार संघटना

दिवेआगरच्या सरपंचांवर गुन्हा

श्रीवर्धन : निवडणूक उमेदवारी अर्जासोबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात मालमत्तेची माहिती लपवल्याच्या आरोपावरून दिवेआगर ग्राम पंचायतीचे सरपंच विजय सुदाम तोडणकर यांच्याविरोधात श्रीवर्धन पोलिसांत अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अदखलपात्र गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या दिवेआगर ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीत तोडणकर जनतेतून थेट सरपंचपदी निवडून आले होते. उमेदवारी अर्जासोबत जोडलेल्या प्रतिज्ञापत्रात स्वतःच्या व कुटुंबाच्या मालकीची स्थावर मालमत्ता लपवल्याची तक्रार ग्रामस्थ सिद्धेश •>पान २ वर

खोपोलीतील पनीकर हत्या प्रकरण

संशयित आरोपी गोव्यातून अटक

। खोपोली । प्रतिनिधी ।

खोपोलीतील कारमेल स्कूल परिसरातील इंद्रप्रस्थ इमारतीत घडलेल्या ७० वर्षीय महेश्वरी पनीकर यांच्या निर्घृण हत्या या प्रकरणातील संशयित आरोपीला गोव्यातून ताब्यात घेण्यात खोपोली पोलिसांना यश आले आहे. यश थापा (२१, रा. भानवज, खोपोली) असे ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव असून, पोलिसांनी पत्रकार परिषदेत या कारवाईची माहिती दिली.

दिवाळीच्या सणादरम्यान घडलेल्या या धक्कादायक घटनेने खोपोली शहर हादरले होते. महेश्वरी पनीकर •>पान २ वर

शेतकऱ्यांची दिवाळी मदतीविना

- ५७६ शेतकरी पाच हजारांच्या 'अग्रीम'पासून अद्याप वंचित

। श्रीवर्धन । समीर रिसबूड ।

दुष्काळ जाहीर झाला, शेतकरी मदतीसाठी पात्र ठरले; मात्र शासनाच्या मदतीचा लाभ मिळवण्यासाठी त्यांना आता प्रशासकीय आणि तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. श्रीवर्धन तालुक्यातील तब्बल ५७६ पात्र शेतकरी अद्याप पाच हजार रुपयांच्या अग्रिम मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. कुणाच्या नावात किंवा सर्व्हे नंबरमध्ये तफावत, तर कुणाचे संपूर्ण गावच ऑनलाइन पोर्टलवर दिसत नसल्याने शेतकऱ्यांची मदत अडकली आहे. शासनाने मदत जाहीर केली असली, तरी ती वेळेत शेतकऱ्यांच्या खात्यात पोहोचवण्यात प्रशासनाची यंत्रणा अपुरी पडल्याचे चित्र आहे.

राज्य शासनाने श्रीवर्धन तालुका दुष्काळग्रस्त जाहीर केल्यानंतर महसूल विभागामार्फत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. 'दुष्काळ २०२६' अहवालानुसार तालुक्यातील एकूण १ हजार ३८१ शेतकरी मदतीसाठी पात्र ठरले आहेत. मात्र, यापैकी पोर्टलवर अंतिम मंजुरी मिळालेल्या ८०५ शेतकऱ्यांच्या खात्यातच थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणालीद्वारे प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत जमा होण्यास सुरुवात झाली आहे. उर्वरित ५७६ शेतकरी अद्याप मदतीपासून वंचित आहेत.

महसूल विभागाच्या आकडेवारीनुसार, पाच पीक पंचनामा याद्यांमधून लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली आहे. पहिल्या यादीतील ७६८ पैकी ५०३, दुसऱ्या यादीतील १७९ पैकी ८९, तिसऱ्या यादीतील २६७ पैकी १६२, चौथ्या यादीतील १२१ पैकी ४४ आणि पाचव्या यादीतील ४६ पैकी केवळ ७ शेतकऱ्यांना अंतिम मंजुरी मिळाली आहे. अशा प्रकारे एकूण ८०५ शेतकऱ्यांना मदतीचा मार्ग मोकळा झाला आहे.

मात्र, उर्वरित शेतकऱ्यांच्या मदतीचा प्रश्न गंभीर बनला आहे. तब्बल ३६८ शेतकऱ्यांचे सर्व्हे नंबर आणि नावांमध्ये तफावत असल्याने त्यांचे प्रस्ताव अडकले आहेत. तर कोंढे तर्फे श्रीवर्धन, •>पान २ वर

सिडकोकडून ताबा देण्यास विलंब | **३८ लाख भरले, तरी घराचा ताबा नाही**

२५० कुटुंबं घराच्या प्रतीक्षेत!

। पनवेल । प्रतिनिधी ।

आयुष्यभराची पुंजी आणि गृहकर्जाची रक्कम घरासाठी भरूनही हक्काच्या सदनिकेचा ताबा मिळत नसल्याने तळोजा सेक्टर ३६ मधील विजयदुर्ग हिल्स्टा प्रकल्पातील २५० कुटुंबांची फरफट सुरू आहे. भोगवटा प्रमाणपत्र मिळाले, न्यायालयीन स्थगितीही नाही; तरी सिडकोकडून ताबा देण्यास विलंब होत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या सिडकोच्या गृहनिर्माण सोडतीत या प्रकल्पातील सदनिका मिळालेल्या लाभार्थ्यांनी घराची संपूर्ण रक्कम भरली आहे. प्रत्येकाने अंदाजे ३३ ते ३८ लाख रुपये जमा केले असून, सुमारे २५० कुटुंबे ताब्याच्या प्रतीक्षेत आहेत. विशेष म्हणजे, नोव्हेंबर २०२५ मध्ये प्रकल्पाला भोगवटा प्रमाणपत्र मिळाले असतानाही न्यायालयीन प्रकरणाचे कारण पुढे करून ताबा प्रक्रिया रखडवण्यात आली.

मात्र, सिडकोने १४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिकृत सूचनेनुसार, मुंबई उच्च न्यायालयातील याचिका २७ ऑगस्ट रोजी फेटाळण्यात आली असून, सध्या कोणतीही स्थगिती लागू नाही. न्यायालयीन अडथळा दूर झाल्यानंतरही ताबा का दिला जात नाही, असा सवाल लाभार्थ्यांनी उपस्थित केला आहे. एकीकडे सिडको नव्या सोडतीची तयारी करीत असताना जुन्या सोडतीतील विजेत्यांना मात्र स्वतःच्या घरासाठी झगडावे लागत आहे.



विजयदुर्ग हिल्स्टा गृहप्रकल्प समितीचे प्रतिनिधी अभिजीत हांडे, सचिन केसरे आणि पांडुरंग टेंभरे यांनी मंत्रालयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. घराचा ताबा मिळत नसल्याने अनेक कुटुंबांना गृहकर्जाचा हप्ता आणि सध्याच्या घराचे भाडे असा दुहेरी आर्थिक भार सहन करावा लागत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. दरम्यान, घरांचा ताबा मिळण्यास विलंब होत असल्याने लाभार्थ्यांची आर्थिक आणि मानसिक कोंडी झाली आहे. अनेकांनी घरासाठी बँकांकडून कर्ज घेतले असून त्याचे हप्ते सुरू झाले आहेत. प्रत्यक्षात घराचा ताबा नसल्याने भाड्याच्या घरात राहण्याचा खर्चही सहन करावा लागत आहे. त्यामुळे सिडकोने न्यायालयीन प्रकरणाचे कारण पुढे न करता तातडीने घरांचा ताबा द्यावा आणि लाभार्थ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

बिल्डरच्या निष्काळजीपणामुळे

चिमुकल्याचा बळी

- सुकापूरमध्ये पाण्याने भरलेल्या खड्ड्यात पडून मृत्यू
- फ्युचर होम्स बिल्डर्ससह कंत्राटदाराविरोधात गुन्हा दाखल

। पनवेल । प्रतिनिधी ।

बांधकामाच्या ठिकाणी सुरक्षेची काळजी घेण्याऐवजी उघडे खड्डे मृत्यूचे सापळे बनत असतील, तर त्याची किंमत निष्पाप बालकांना जीव गमावून चुकवावी लागते. सुकापूर येथे बांधकामासाठी खोदलेल्या आणि पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बुडून सहा वर्षीय समर्थ रवींद्र सर्जे याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने बांधकाम व्यावसायिकांच्या सुरक्षा व्यवस्थेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला असून, फ्युचर होम्स बिल्डर्स अँड डेव्हलपर्स आणि संबंधित कंत्राटदाराविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुकापूर येथील शांती निकेतन सोसायटीसमोर पुनर्विकासाचे बांधकाम सुरू आहे. या कामासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यात पाणी साचले होते. दुपारी तीन ते साडेचारच्या दरम्यान सहा वर्षीय समर्थ या पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बुडाला. या दुर्घटनेत त्याचा मृत्यू झाला. खेळण्या-बागडण्याच्या वयातील चिमुकल्याचा •>पान २ वर

पेणमध्ये बेकायदा भरावाचा खेळ

महसूल विभागाच्या भूमिकेवर संशय

कारवाईकडे डोळेझाक का?

। पेण । प्रतिनिधी ।

'तेरी भी चूप, मेरी भी चूप, सब हो जायेगा गुपचूप, गुपचूप...' अशीच काहीशी परिस्थिती सध्या पेण शहर आणि परिसरातील मोठ्या गृहनिर्माण प्रकल्पांच्या बाबतीत दिसून येत आहे. एका बाजूला विकासाच्या नावाखाली टोलेजंग इमारती उभ्या राहात आहेत, तर दुसऱ्या बाजूला या प्रकल्पांसाठी होणाऱ्या माती आणि दगडाच्या उत्खननाचा हिशेब मात्र गुलदस्त्यात आहे. उत्खननातून निघणारी माती नेमकी जाते कुठे? तिचा भराव कोणत्या भूखंडावर आणि कोणाच्या परवानगीने केला जातो? शासनाची रॉयल्टी भरली जाते का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत असतानाही महसूल विभागाकडून ठोस कारवाई होताना दिसत नसल्याने संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.



पेण शहराच्या आजूबाजूला सध्या मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्पांची कामे सुरू आहेत. जमिनीचे सपाटीकरण, पायाभरणी आणि बेसमेंटसाठी मोठ्या प्रमाणात खोदकाम केले जात आहे. यातून हजारो ब्रास माती आणि दगड बाहेर पडत असल्याची शक्यता आहे. मात्र, या गौण खनिजाची वाहतूक कोणत्या परवानगीने होते, त्याची विल्हेवाट कुठे लावली जाते आणि दुसऱ्या भूखंडांवर भराव करण्यासाठी आवश्यक परवानग्या घेतल्या आहेत का, याचा स्पष्ट हिशेब नागरिकांसमोर येत नाही.

धक्कादायक बाब म्हणजे, एका ठिकाणी उत्खनन करून काढलेली माती दुसऱ्या ठिकाणच्या खासगी भूखंडांवर टाकून भराव केला जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. अशा भरावासाठी महसूल विभागाची परवानगी घेतली आहे का? उत्खननातून निघालेल्या गौण खनिजाचा अधिकृत हिशेब ठेवला जातो का? शासनाला देय असलेली रॉयल्टी भरली जाते का? की या सगळ्या व्यवहारात नियमांना सोयीस्करपणे बगल दिली जात आहे? हे प्रश्न आता ऐरणीवर आले आहेत.

महसूल बुडतोय की जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

माती आणि दगडाच्या उत्खननासाठी शासनाचे स्पष्ट नियम आहेत. आवश्यक परवानग्या, रॉयल्टी आणि वाहतुकीची कागदपत्रे असणे बंधनकारक आहे. मात्र, प्रत्यक्ष सुरू असलेल्या उत्खननाचा आणि महसूल विभागाच्या नोंदींचा ताळमेळ तपासला जातो का? उत्खननातून बाहेर पडणाऱ्या मातीचा हिशेबच नसेल आणि दुसरीकडे भराव सुरू असेल, तर शासनाच्या तिजोरीला महसुलाचा फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, अद्याप ठोस कारवाई दिसत नसल्याने महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मोठ्या व्यावसायिकांना अभय का?

एखाद्या सामान्य नागरिकाने घराच्या बांधकामासाठी माती किंवा दगडासंदर्भातील नियमांची पूर्तता केली नाही, तर त्याला महसूल कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. मग मोठमोठ्या गृहनिर्माण प्रकल्पांच्या बाबतीत एवढी मोकळीक का? नियम सर्वसामान्यांसाठी वेगळे आणि बांधकाम व्यावसायिकांसाठी वेगळे आहेत का? अधिकारी आणि व्यावसायिकांमधील संभाव्य हितसंबंधांबाबतही नागरिकांच्या मनात शंका निर्माण होत आहेत. अर्थात, याबाबत वस्तुस्थिती स्पष्ट होण्यासाठी निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. मात्र, वारंवार तक्रारी होऊनही कारवाई होत नसेल, तर संशयाला जागा निर्माण होणारच.

प्रशासनाने आता हिशेब द्यायलाच हवा!

पेण शहराचा विकास व्हावा, नवीन गृहनिर्माण प्रकल्प उभे राहावेत, याला कोणाचाही विरोध नाही. मात्र, विकासाच्या नावाखाली शासनाचा महसूल बुडवला जात असेल, पर्यावरणाचे नुकसान होत असेल आणि नियमांना बगल दिली जात असेल, तर ते कदापि स्वीकारता येणार नाही. महसूल विभागाने सर्व सुरू असलेल्या प्रकल्पांतील उत्खनन, मातीची वाहतूक आणि भरावाची प्रत्यक्ष पाहणी करून परवानग्या व रॉयल्टीची तपासणी करावी. नियमभंग आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी.

पेन्शनधारकांसाठी आजीवन प्रमाणपत्राची सुविधा

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या पेन्शनधारकांना दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात शासनाकडे हयातीचा दाखला अर्थात आजीवन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. यासाठी यापूर्वी संबंधित बँकेत जावे लागत होते. मात्र, आता पनवेल तालुक्यातील निवृत्तीवेतनधारकांसाठी पनवेलमधील उपकोषागार कार्यालयातच ऑनलाइन आजीवन प्रमाणपत्र देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अपर कोषागार अधिकारी सतीश धोत्रे यांनी केले आहे.

निवृत्तीवेतनधारकांचे पेन्शन नियमित आणि विनाअडथळा सुरू राहण्यासाठी दरवर्षी हयातीचा दाखला सादर करणे बंधनकारक आहे. ही प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद व्हावी, यासाठी शासनाने तालुकास्तरावरील कोषागार कार्यालयांमध्ये आजीवन प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था केली आहे. पनवेल तालुक्यातील निवृत्तीवेतनधारकांसाठी वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळील नवीन प्रशासकीय भवनातील कार्यालय क्रमांक १०७ येथे ही सुविधा उपलब्ध आहे. या ठिकाणी अपर कोषागार अधिकारी सतीश गोविंद धोत्रे, उपकोषागार अधिकारी शुभांगी गणेश साळुंखे, स्वप्निल गोरे आणि उज्वला वाघमोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कल्हे परिसरातून चार देशी गायींची चोरी

। पनवेल । प्रतिनिधी ।

तालुक्यातील कल्हे गाव परिसरात चराईसाठी सोडलेल्या चार देशी गायी अज्ञात चोरट्यांनी पळवून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. एमएम फार्म हाऊसजवळ घडलेल्या या चोरीत सुमारे एक लाख २० हजार रुपयांच्या गायी चोरीला गेल्या आहेत.

याप्रकरणी आदिम सईद मुल्ला (३९) यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. चराईसाठी सोडलेल्या गायी जागेवर नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी शोध घेतला; मात्र गायींचा ठावठिकाणा न लागल्याने पोलिसांत धाव घेतली. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला असून, गायींचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

पान १ वरुन

रस्त्याच्या कामाचा दुसरा बळी

कामे सुरू आहेत. मात्र, या कामांमध्ये सुरक्षिततेच्या उपाययोजनांचा अभाव असल्याचे वारंवार समोर येत आहे. अनेक ठिकाणी सूचना फलक, रात्रीच्या वेळी दिसणारे दिवे आणि बॅरिकेड्स नसल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या कामांमुळे यापूर्वीही अनेक अपघात झाले असून, नागरिक जखमी झाले आहेत. वाहनांचेही नुकसान झाले आहे. मात्र, संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांकडून परिस्थिती गांभीर्याने घेतली जात नसल्याचे चित्र आहे.

गुरुवारी सायंकाळी नागाव-खारगल्ली येथे प्रकाश भगत हे एमएच ०६ बीए २३९४ या मोटारसायकलवरुन घरी जात असताना त्यांचाही अशाच निष्काळजीपणामुळे बळी गेला. रस्त्याच्या कामासाठी ठेवलेल्या मातीच्या ढिगाऱ्याचा अंदाज न आल्याने ते ढिगाऱ्यावरून थेट रस्त्याखाली १५ ते २० फूट खोल कोसळल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर जवळपास २० मिनिटे कोणतीही मदत मिळाली नसल्याचे बोलले जात आहे. त्यानंतर त्यांना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.

अपघाताची माहिती अलिबाग पोलीस ठाण्याचे बीट मार्शल ब्रिजेश साळावकर यांनी दिली. या घटनेमुळे बोरपाडा परिसरात हळहळ व्यक्त होत असून, रस्त्याच्या कामातील निष्काळजीपणाबाबत नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

सरकार नमलं!

ब्रेक लागला आहे. सह्याद्रीच्या कुशीतील पाली-सायडोंगर येथे टोरंट पॉवर एनर्जी स्टोरेज सोल्युशन प्रा.लि. कंपनीचा जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी वन विभागाने झाडे तोडण्यास सुरुवात केल्यानंतर स्थानिकांसह देशभरातून विरोध झाला. प्रकल्पस्थळापर्यंत पोहोच रस्ता तयार करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भालिवडी ते पाली-सायडोंगरदरम्यान सुमारे ५.९१ किलोमीटर रस्ता प्रस्तावित आहे. या रस्त्यासाठी भूसंपादनाची अधिसूचना एप्रिल २०२६ मध्ये काढण्यात आली होती. मात्र, स्थानिक शेतकऱ्यांनी सुरुवातीपासूनच या प्रक्रियेला विरोध केला.

या रस्त्यासाठी भालिवडी, पोटल, आंबोट, पाली आणि सायडोंगर परिसरातील २२६ शेतकऱ्यांच्या जमिनींची मोजणी होणार होती. यासाठी भूमीअभिलेख विभागाने शेतकऱ्यांना नोटिसा बजावल्या होत्या. सुरुवातीच्या माहितीत १३ सर्व्हे क्रमांकांचा उल्लेख असताना, सुधारित माहितीनुसार २० सर्व्हे क्रमांकांतील जमिनींची मोजणी प्रस्तावित होती. यापूर्वीही तीन वेळा मोजणीचा प्रयत्न झाला होता; मात्र शेतकऱ्यांच्या विरोधामुळे प्रक्रिया पुढे सरकली नव्हती.

२५ नोव्हेंबरला मोठ्या आंदोलनाची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने कर्जत भूमीअभिलेख उपअधीक्षकांना पत्र देऊन मोजणी तहकूब करण्याची विनंती केली. त्यानंतर मोजणी पुढे ढकलण्यात आली. मात्र, हा निर्णय शेतकऱ्यांना अधिकृतपणे कळविण्यात आलेला नसल्याचे समजते. त्यामुळे मोजणी पुढे ढकलण्यामागील नेमकी भूमिका आणि पुढील तारीख याबाबत संभ्रम कायम आहे.

२२६ शेतकरी, २० सर्व्हे क्रमांक!

भालिवडी ते पाली-सायडोंगर या ५.९१ किलोमीटरच्या पोहोच रस्त्यासाठी पाच गावांतील २२६ शेतकऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. सुधारित माहितीनुसार, २० सर्व्हे क्रमांकातील जमिनींची संयुक्त मोजणी होणार होती. मोजणीसाठी किती सरकारी चलन भरले गेले, याची माहिती मात्र अद्याप गुलदस्त्यात आहे.

पोहोच रस्त्याची संयुक्त मोजणी सरकारने पुढे ढकलली, याला शासनाला उशिरा आलेले शहाणपण एवढेच म्हणता येईल. मात्र, मोजणी पुढे ढकलणे हा कायमस्वरूपी तोडगा नाही. शासनाने आता टोरंटचा प्रकल्पच रद्द करण्याबाबत निर्णय घेऊन सह्याद्री आणि येथील पर्यावरण वाचवण्यासाठी सहकार्य करावे.

- ॲड. कैलास मोरे

बालदींना शिक्षा, आमदारकीला धक्का!

३२३ अंतर्गत सहा महिने आणि कलम ५०६ भाग दोन अंतर्गत एक वर्ष अशा शिक्षा सुनावल्या आहेत. महेश बालदी यांना याशिवाय कलम ५०९ अंतर्गत सहा महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षाही ठोठावण्यात आली आहे. सर्व शिक्षा एकाच वेळी भोगायच्या असल्याने प्रभावी कारावासाची मुदत तीन वर्षे राहणार आहे. यामुळे उरणच्या भाजपमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. तब्बल १६ वर्षांनंतर आलेल्या या निकालामुळे उरणच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, बालदी यांच्या आमदारकीवर अपात्रतेची टांगती तलवार निर्माण झाली आहे. २०१० मध्ये उरण येथे एका तरुणाला मारहाण केल्याचे हे प्रकरण आहे. या घटनेत तरुणाला गंभीर दुखापत झाली होती. याप्रकरणी दाखल गुन्ह्याचा खटला अलिबाग येथील मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयात सुरू होता. अखेर न्यायालयाने आ. महेश रतनलाल बालदी, सुनील जनार्दन पेडणेकर, प्रवीण जनार्दन पेडणेकर आणि गणेश सदाशिव पाटील या चौघांना दोषी ठरवले. न्यायालयाने भारतीय दंड संहितेच्या कलम ३२५ अंतर्गत तीन वर्षे, कलम ३२४ अंतर्गत तीन वर्षे, कलम कायद्यापेक्षा पद मोठे नाही, सुधारण्याची संधीही फेटाळली

या प्रकरणात आरोपींना शिक्षा देताना न्यायालयाने महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. आरोपींचे सामाजिक स्थान किंवा सार्वजनिक पद लक्षात घेऊन त्यांना शिक्षेत सवलत देता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. महेश बालदी यांच्या राजकीय कारकीर्दीवर परिणाम होईल, हा युक्तिवादही शिक्षा कमी करण्यासाठी पुरेसा नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. आरोपींना शिक्षेऐवजी सुधारण्याची संधी देण्याची मागणीही न्यायालयाने फेटाळली.

सफाई कामगारांच्या लढ्याला यश

त्यामुळे सध्या कार्यरत कामगारांच्या रोजगारावर टांगती तलवार निर्माण झाली होती. संघटनेचे संस्थापक महादेव वाघमारे यांनी कामगारांच्या हक्कांसाठी प्रशासनाकडे पाठपुरावा केला. मात्र, अपेक्षित तोडगा न निघाल्याने संघटनेने न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाच्या 'जैसे थे' आदेशामुळे हस्तांतरण आणि नव्या कामगार नियुक्तीच्या प्रक्रियेला तूर्तास ब्रेक लागला आहे.

न्यायालयीन आदेशानंतर रेल्वे प्रशासनाने सिडकोला पत्र देत अंतिम निर्णय होईपर्यंत संबंधित १४ स्थानकांवरील स्वच्छतेची जबाबदारी कायम ठेवण्यास सांगितले आहे. त्यामुळे कामगारांना तात्पुरता दिलासा मिळाला असला, तरी त्यांच्या रोजगाराचे कायमस्वरूपी संरक्षण होणार का, हा प्रश्न अद्याप कायम आहे.

शेतकऱ्यांची दिवाळी मदतीविना

कापोली, वेळास आगर, कारिवणे, भरडोली, कोलमांडले (अ व ब), देवघर, बापवन, कार्ले आणि साखरोणे या गावांतील २०८ शेतकऱ्यांची गावेच ऑनलाइन पोर्टलवर दिसत नसल्याने मंजुरीची प्रक्रिया रखडली आहे.विशेष म्हणजे, या शेतकऱ्यांनी दुष्काळाचा सामना केला, पंचनाम्याच्या प्रक्रियेतून गेले आणि मदतीसाठी पात्रही ठरले. तरीही केवळ ऑनलाइन नोंदीतील त्रुटींमुळे त्यांना मदतीसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. प्रशासनाच्या तांत्रिक यंत्रणेतील त्रुटींचा फटका थेट शेतकऱ्यांना बसत असताना या त्रुटी आधीच का दूर करण्यात आल्या नाहीत, असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, तहसील कार्यालयामार्फत त्रुटी दूर करून माहिती अद्ययावत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतर उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या खात्यातही पाच हजार रुपयांची अग्रिम मदत जमा केली जाईल, असे सांगण्यात आले आहे. मात्र, नेमक्या किती दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होणार, याबाबत स्पष्ट कालमर्यादा समोर आलेली नाही. त्यामुळे मदतीच्या प्रतीक्षेत असलेल्या ५७६ शेतकऱ्यांना प्रशासनाच्या आश्वासनावरच अवलंबून राहावे लागत आहे.

संशयित आरोपीला गोव्यातून अटक

यांचा त्यांच्या राहत्या घरात मृतदेह आढळून आला होता. त्यांचे हात-पाय बांधलेल्या अवस्थेत मृतदेह आढळल्याने हत्येचे गांभीर्य अधिक वाढले होते. याशिवाय घरातील सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची बाबही समोर आली होती. भरवस्तीत घडलेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन खोपोली पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती आणि अन्य उपलब्ध पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी संशयिताचा माग काढला. अखेर गोव्यातून यश थापा याला ताब्यात घेण्यात आले.

चिमुकल्याचा बळी

असा दुर्दैवी अंत झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

बांधकामाच्या ठिकाणी खड्डा सुरक्षितपणे बंदिस्त करणे, संरक्षक कठडे उभारणे किंवा नागरिकांना प्रवेश रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे अपेक्षित होते. मात्र, सुरक्षेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष झाल्यानेच ही दुर्घटना घडल्याचा आरोप आहे. बांधकाम व्यावसायिक आणि कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे एका निष्पाप बालकाला जीव गमवावा लागल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. खांदेश्वर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

दिवेआगरच्या सरपंचांवर गुन्हा

कोसबे आणि महेश पिळणकर यांनी तहसील कार्यालयात केली होती. माणगाव नगरपंचायत हद्दीतील मालमत्ता क्रमांक २२५ (फ्लॅट क्रमांक ८-२०१, श्री मानजी कॉम्प्लेक्स, उतेखोल) तोडणकर यांच्या नावावर असूनही प्रतिज्ञापत्रात तिचा उल्लेख नसल्याचा आरोप करण्यात आला होता.नगरपंचायत आणि राज्य निवडणूक आयोगाच्या अहवालातून मालमत्ता तोडणकर यांच्या नावावर असल्याची खात्री झाल्यानंतर महसूल नायब तहसीलदार मनोज माने यांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार बुधवारी (दि. १८) तत्कालीन निवडणूक निर्णय अधिकारी सुनील पाटील यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अदखलपात्र नोंद केली. या प्रकरणात तक्रारदाराला न्यायालयात दाद मागण्याची सूचना देण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग,
पनवेल पिनकोड - ४१०२०६
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२ - २७४५२७७८ फॅक्स - ०२२ - २७४६७४४०
ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र.३१ (ई-निविदा) सन २०२६-२७

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र.०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामाकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www. maha-tenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण ०२ काम समाविष्ट असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १९.११.२०२६ सकाळी १०.०० ते दिनांक २६.११.२०२६ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय.
सा.बां. विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :-

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे खारपेढांबे, ता. अलिबाग येथील मिळकत, त्या मिळकतीच्या विद्यमान मालक श्रीम. गुलाब एकनाथ पाटील, वगैरे ३५ यांच्याकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार
खार पेढांबे	१३३	१-५५-०० पो.ख. ०-२५-०० १-८०-००	रु.२.८६

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, साठेकरार बक्षीस, लिज, लिएन, वहीवाट या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व त्यामध्ये कुणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क अधिकार नाही, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २०/११/२०२६

ॲड. विधान अरविंद पाटील
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९४२२३७५११५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे दत्तपाडा, ता. अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत, त्या मिळकतीच्या विद्यमान मालक सौ.शिवानी हर्षकेश नाईक व सौ. दैवती दत्तात्रेय नाईक यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार
दत्तपाडा	६०	०-४५-०० पो.ख. ०-०४-०० ०-४९-००	रु.११.५०

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, साठेकरार बक्षीस, लिज, लिएन, वहीवाट या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व त्यामध्ये कुणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क अधिकार नाही, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २०/११/२०२६

ॲड. विधान अरविंद पाटील
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९४२२३७५११५

Bank of India
Relationship beyond banking

स्पेशलाइज्ड् ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट ब्रॅन्च
मेझेनाइन मजला, ७०/८०, एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. दूर. ०२२ २२६७ ३५४९
संपर्क क्रमांक : ९८१९४०३५४९ ई-मेल : SARM.MumbaiSouth@bankofindia.bank.in

स्थावर/जंगम मालमत्तांच्या विक्रीकरिता ई-लिलाव

सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत स्थावर संपत्तींच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

आम जनतेस तसेच विशेषत: कर्जदारांना व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोंकडे गहाण/ प्रभारित स्थावर मालमत्ता, ज्यांचा ताबा बँक ऑफ इंडिया, एसएआरएम श ाखा यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला आहे त्या मालमत्तांची संबंधित कर्जदारांकडून बँक ऑफ इंडियाकडे देय असलेली संबंधित थकबाकी तसेच त्यावरील सदर तारखेपर्यंतचे व्याज व प्रभार रकमेच्या वसुलीकरिता दि. ०९.१२.२०२६ रोजी जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे व जी काही आहे तेथे आहे तत्वावर विक्री करण्यात येईल.

राखीव मूल्य व इसारा रक्कम ठेव खालील तक्त्यामध्ये दर्शवलेली आहे. वेबपोर्टलवर उपलब्ध ई-लिलाव प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अधोहस्ताक्षरितांद्वारे विक्री करण्यात येईल.

अनु. क्र.	कर्जदार / हमीदाराचे नाव व थकित रक्कम	मालमत्तांचे विवरण / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा	राखीव मूल्य (रु. लाखांत EMD (रु.लाखांत)	परीक्षण दिनांक/ वेळ व क्षेत्र, संपर्क क्रमांक
१.	श्री. ओसामा लतिफ मुल्ला, श्री. लतिफ मेहबूब मुल्ला थकित रक्कम रु. १८९.७० लाख + व्याज + खर्च/प्रभार.	मालमत्ता क्र. १७७२ वरील जमीन इमारत, गट क्र. ५४/२/के/६, सच्चीदा बिल्डींग व श्री साई बंगलोजवळ, श्री स्वामी समर्थ नगर, गाव : चेंढरे, अलीबाग, ता. अलीबाग, जि. रायगड (प्रत्यक्ष ताबा)	रु. १७३.७५ रु. १७.३७५	दि. ०३.१२.२०२६ वेळ : दु. १२.०० ते दु. २.०० ८८३०६६४८१४/ ९८१९४०३५४९.

ई-लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

१. विक्री ही जशी आहे तशी, ज्या स्थितीत आहे तशी व जे काही आहे तसे या तत्त्वावर केली जाईल आणि ती ऑनलाइन पद्धतीने पार पडेल.
२. ई-लिलावात नोंदणी करण्यासाठी आणि सहभागी होण्यासाठी बोलीदाराला www.baanknet.com या संकेतस्थळाला भेट द्यावी लागेल. EMD जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ ०९.१२.२०२६ रोजी दुपारी ४:०० वाजेपर्यंत असेल. बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी नोंदणी व EMDविषयक सर्व प्रक्रिया दिलेल्या मुदतीतच पूर्ण कराव्यात.
३. अधिकृत अधिकाऱ्याच्या माहितीनुसार आणि ज्ञानानुसार, संबंधित मालमत्तेवर कोणतेही बोजा नाही. तरीही, बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तेवरील बोजा, मालकी हक्क व मालमत्तेवर परिणाम करणारे दावे/हक्क/देणी यांबाबत स्वतः स्वतंत्रपणे चौकशी करावी. ई-लिलावाची जाहिरात म्हणजे बँकेची कोणतीही वचनबद्धता किंवा प्रतिनिधित्व मानले जाणार नाही. ही मालमत्ता बँकेला ज्ञात असलेल्या किंवा अज्ञात असलेल्या सर्व विद्यमान आणि भविष्यातील बोज्यांसह विकली जात आहे. कोणत्याही त्रयस्थ पक्षाचे दावे/हक्क/देणी यासाठी अधिकृत अधिकारी/तारणधारक धनको कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. विक्रीसाठी ठेवलेल्या मालमत्तेबाबत ऑनलाइन बोली सादर केल्यानंतर कोणत्याही स्वरूपाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.
४. सूचीबद्ध मालमत्तांसाठी ऑनलाइन ई-लिलावाची तारीख ०९.१२.२०२६ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत असेल.
५. मालमत्तेची पाहणी सुलभ करण्यासाठी, इच्छुक खरेदीदारांना विनंती आहे की त्यांनी sarm.mumbaisouthbankofindia.bank.in या ई-मेलद्वारे आणि/किंवा वर नमूद केलेल्या संपर्क क्रमांकांवर आणि/किंवा बँक ऑफ इंडिया, एसएआरएम शाखा (संपर्क क्र. ९८१९४०३५४९ / ०२२-२२६७३५४९) यांच्याशी संपर्क साधून पूर्वसूचना द्यावी.
६. बोली केवळ ऑनलाइन प्रक्रियेद्वारेच सादर केली जावी.
७. सादर करावयाची बोली ही राखीव किंमतीपेक्षा एका विस्तार मूल्याने अधिक असावी आणि वर नमूद केलेल्या मालमत्तांसाठी बोलीदारांनी आपली बोली २५,०००/- रुपये (रु. पंचवीस हजार रुपये मात्र) च्या पटीत वाढवावी.
८. बोलीदारांना सल्ला दिला जातो की, त्यांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी व ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यापूर्वी लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती संकेतस्थळावर जाऊन वाचाव्यात. ९. बोलीदारांनी विक्रीच्या अटी व शर्ती वाचल्या आणि समजून घेतल्या आहेत असे मानले जाईल आणि ते त्या अटी व शर्तींनी बांधील असतील.
१०. बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेची पाहणी करणे आणि त्याबाबत स्वतःची खात्री करून घेणे ही इच्छुक बोलीदारांची जबाबदारी असेल.
११. यशस्वी बोलीदाराची इसारा रक्कम ठेव (EMD) ही विक्रीच्या रकमेचा काही भाग म्हणून जमा ठेवली जाईल आणि अयशस्वी बोलीदारांची EMD परत केली जाईल.
१२. इसारा रक्कम ठेवीवर (EMD) कोणतेही व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदाराला, अधिकृत अधिकाऱ्याने बोलीची किंमत स्वीकारल्याच्या दुसऱ्या दिवसापर्यंत, आधीच भरलेल्या इरटे सह विक्रीच्या किंमतीच्या २५% रक्कम जमा करावी लागेल आणि उर्वरित विक्रीची रक्कम विक्रीच्या १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी जमा करावी लागेल. लिलाव विक्री बँकेच्या पुष्टीकरणाच्या अधीन असेल. यशस्वी बोलीदाराने रक्कम जमा करण्यात कसूर केल्यास, आधीच जमा केलेली संपूर्ण रक्कम जप्त केली जाईल आणि मालमत्तेचा पुन्हा लिलाव केला जाईल; तसेच कसूर करणाऱ्या बोलीदाराचा मालमत्तेवर किंवा रकमेवर को

शिक्षकांचा शासनाच्या तिजोरीवर डल्ला?

खोटे दाखले देऊन घरभाडे भत्ता लाटल्याचा आरोप



| पेण | प्रतिनिधी |

शिक्षकांनी नियुक्तीच्या ठिकाणी म्हणजेच मुख्यालयी वास्तव्यास राहणे अपेक्षित असते; परंतु, प्रत्यक्षात अन्यत्र राहूनही मुख्यालयी वास्तव्यास असल्याचे खोटे दाखले मिळवून शासनाकडून घरभाडे भत्ता घेतला जात असल्याचा गंभीर आरोप पेण तालुक्यातून होत आहे. विशेष म्हणजे, या प्रकारात काही ग्रामसेवक आणि सरपंचांकडून शिक्षकांना कथितरीत्या सहकार्य केले जात असल्याने शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारण्याचा हा प्रकार नेमका कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

शिक्षकांना मुख्यालयी वास्तव्यास राहण्यासाठी शासनाकडून घरभाडे भत्ता दिला जातो. मात्र, प्रत्यक्षात मुख्यालयी न राहता स्थानिक ग्रामपंचायतीकडून आपण मुख्यालयी राहत असल्याचे दाखले मिळवून घेण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप आहे. या बदल्यात संबंधितांना आर्थिक लाभ दिला जात असल्याचीही चर्चा आहे. पेण तालुक्यातील अनेक शिक्षकांनी अशा प्रकारे दाखले मिळवल्याचा आरोप असून, जवळपास ९० टक्के शिक्षकांनी हा प्रकार केल्याचा दावा केला जात आहे. हा दावा खरा असल्यास हा केवळ एखाद्या शिक्षकाचा विषय नसून, संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा गंभीर प्रकार ठरू शकतो.

या प्रकरणातील विशेष बाब म्हणजे पेण शहराला लागून असलेल्या वडगाव ग्रामपंचायत हद्दीतील शिक्षकांबाबतही असेच आरोप केले जात आहेत. या शिक्षकांनी मुख्यालयी वास्तव्यास असल्याचे दाखले घेतले असल्याचे सांगितले जात आहे. जर संबंधित शिक्षक प्रत्यक्षात मुख्यालयी राहत नसतील आणि केवळ कागदोपत्री दाखले घेऊन शासनाचा घरभाडे भत्ता घेत असतील, तर हा प्रकार शासकीय निधीचा गैरवापर आणि प्रशासकीय प्रक्रियेची थट्टा असल्याची टीका होत आहे. दरम्यान, मुख्यालयी वास्तव्यास असल्याचे दाखले देताना संबंधित शिक्षक प्रत्यक्षात कुठे राहतात, त्यांच्या घराचा वीजबिलाचा पत्ता काय आहे, भाडेकरार आहे का, तसेच ग्रामपंचायतीने दाखला देताना कोणती पडताळणी केली, याची तपासणी झाल्यास या संपूर्ण प्रकरणाचे वास्तव समोर येऊ शकते. त्यामुळे घरभाडे भत्ता घेणाऱ्या शिक्षकांची पडताळणी करावी, तसेच चुकीचे दाखले दिल्याचे आढळल्यास संबंधित शिक्षकांसह दाखले देणाऱ्या अधिकारी-पदाधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

दाखले देणाऱ्यांच्या चौकशीची मागणी

शिक्षकांनी चुकीची माहिती दिली असेल तर त्यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित आहे; मात्र, त्याहून महत्त्वाचा प्रश्न म्हणजे खोटी माहिती खरी असल्याचे प्रमाणपत्र किंवा दाखला देणाऱ्या ग्रामपंचायत प्रशासनाची जबाबदारी कोण ठरवणार? ग्रामसेवक आणि सरपंचांनी प्रत्यक्ष पाहणी न करता किंवा वस्तुस्थितीची खातरजमा न करता मुख्यालयी वास्तव्याचे दाखले दिले असतील, तर संबंधितांचीही चौकशी होणे गरजेचे आहे. त्यामुळे शिक्षक, ग्रामसेवक आणि सरपंच यांच्यातील कथित साटेलोटे उघड करण्यासाठी प्रशासनाने स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे ग्रामस्थांची गैरसोय

| सुतारवाडी | प्रतिनिधी |

रोह्यातील भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे ग्रामस्थांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. याबाबत जमीन मालकांपैकी एक अभिमन्यू लडगे यांनी पत्रकारांना लेखी पत्रक दिले आहे. त्यात त्यांनी अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

पत्रकात अभिमन्यू लडगे यांनी म्हटले आहे की, रोहा तालुक्यातील सावरवाडी सुतारवाडी येथील गट नंबर ६१५ चे हद्द कायम करण्यासाठी भूमी अभिलेख रोहा यांच्याकडून जमीन मोजणीसाठी दि.१६ नोव्हेंबर अशी तारीख दिली होती. अशा प्रकारचे पत्रकही त्यांनी दिले आहे. त्यामुळे आपल्या जमिनीची हद्द कुठपर्यंत आहे? तसेच, ती कायम करण्यासाठी मुंबई, महाड व सुरत येथून संबंधित जमीन मालक तेथे आले होते. मात्र, त्या दिवशी रोहा भूमी आलेख कार्यालयातून जमीन मोजणीसाठी कर्मचारी आलाच नाही. या कर्मचाऱ्याचे नाव अमित यादव असे असून, त्याला संबंधित ग्रामस्थांनी फोनद्वारे संपर्क साधला असता त्याने सांगितले की, ''मी आज रजेवर आहे. त्यामुळे मला येता येणार नाही.'' त्यामुळे बाहेरून आलेल्या जमीन मालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. यादरम्यान, बाचाबाची व शाब्दिक चमकही थोड्या प्रमाणावर झाली.

जर वास्तविक भूमी अभिलेख खात्याने जमीन मोजण्यासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची रजा मंजूर केली होती; तर, जमीन मोजण्यासाठी दि.१६ नोव्हेंबर अशी तारीख दिलीच कशी? त्याच्या ठिकाणी दुसरा कर्मचारी जमीन मोजण्यासाठी का पाठवला नाही? जमीन मोजण्यासाठी अन्य शहरातून आलेल्या जमीन मालकांना मोठा भुर्दंड बसला, याला जबाबदार कोण, असे गंभीर प्रश्न शेतकऱ्यांना पडल्याचे देअभिमन्यू लडगे यांनी पत्रकात म्हटले आहे.

निवडक

कुलाबा जीवन गौरवसाठी आवाहन

अलिबाग : सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त मा. आमदार मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट रायगड, भाई जगताप मित्र मंडळ रायगड आणि ॲड. उमेशदादा ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.३ जानेवारी २०२७ रोजी युवक मार्गदर्शन तथा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे हे १६वे वर्ष असून, आजतागायत सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, पत्रकारिता तथा वैद्यकीय क्षेत्रातील बहुसंख्य गुणीजनांना कुलाबा जीवन गौरव या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित तथा प्रोत्साहित करण्यात आले आहे. या वर्षीही राज्यभरातील बहुसंख्य गुणीजनांना कुलाबा जीवन गौरव-२०२७ या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून, विविध क्षेत्रातील भरीव कार्यासाठी/पथित यशासाठी सन्मानित/प्रोत्साहीत करण्यात येणार आहे. यानिमित्ताने कुलाबा जीवन गौरव पुरस्कार समितीच्यावतीने राज्यातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, पत्रकारिता तथा वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणीजनांना माहिती पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही माहिती दि.१५ डिसेंबरपर्यंत निर्देशित स्वरूपात अलिबाग येथील शितोळे आळीतील शिवरामनंदा सिएचएस येथे जमा करण्याचे आवाहन कुलाबा जीवन गौरव पुरस्कार कमिटी अध्यक्ष श्रीयश घरत यांच्याकडून करण्यात आले आहे.

माजगाव परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ



पाताळगंगा : माजगाव, आंबिवली, वारद या गावांमध्ये दोन ते तीन महिन्यांपासून घरफोडी आणि चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे. चोरट्यांकडून येथील बंद घरांना लक्ष्य केले जात असून, घरातील मौल्यवान वस्तू आणि रोकड लंपास केली जात असल्याचे समोर येत आहे. या घटनांमुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. माजगाव, आंबिवली, वारद येथील घरातील सदस्य बाहेरगावी किंवा पर्यटनासाठी गेले असल्याची संधी साधून चोरटे बंद दरवाजांचा फायदा घेत घरात प्रवेश करत असल्याचे बोलले जात आहे. चोरट्यांकडून घरातील कपाटे, फ्रिज, तांदळाची पिंपे तसेच लहान-मोठे स्टीलचे डबे उघडून त्यामध्ये मौल्यवान वस्तू किंवा पैसे आहेत का, याची तपासणी केली जाते. यावेळी घरातील साहित्याची मोठ्या प्रमाणात नासधूसही केली जात असल्याचे ग्रामस्थांमधून बोलले जात आहे. तसेच, या चोरीच्या घटना साधारणपणे मध्यरात्री दोन ते तीन वाजण्याच्या सुमारास घडत असल्याची माहिती स्थानिक नागरिकांकडून देण्यात येत आहे. दरम्यान, ग्रामपंचायतीने सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवले असून, परिसरात फेरीवाल्यांना प्रवेश निषिद्ध असल्याचे फलकही लावले आहेत. तरीही चोरीच्या घटनांचे सत्र सुरूच असल्याने ग्रामस्थ चिंतेत आहेत.

स्वीकृत नगरसेवक निवडीवरून वाद

| महाड | प्रतिनिधी |

महाड नगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवकपदाच्या निवडीवरून नवा वाद निर्माण झाला आहे. नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांनी राजेश शिंदे यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड केल्यानंतर उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांनी या निवडीला हरकत घेतली आहे. तसेच, त्यांची नियुक्ती रद्द करण्याची मागणी जाधव यांनी प्रांताधिकाऱ्यांकडे केली आहे.

महाड नगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवक पदासाठी राजेश शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. या अर्जाची छाननी केल्यानंतर नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांनी त्यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड केली. मात्र, या निवडीवर उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांनी आक्षेप नोंदवला आहे. महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ मधील तरतुदींनुसार राजेश शिंदे यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्ती नियमबाह्य असल्याचे जाधव यांचे म्हणणे आहे. तसेच, नामनिर्देशनासाठी ज्या संस्थेचे सदस्यत्व प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे, ते प्रमाणपत्र चुकीचे असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या प्रकरणामुळे महाड नगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवक निवडीचा मुद्दा चर्चेत आला असून, प्रांताधिकारी या तक्रारीवर काय निर्णय घेतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

शिंदे सेनेविरोधात ठाकरे सेना आक्रमक

■ अलिबागमधील छत्रपती शिवाजी महाराज चौकात नोंदवला निषेध

| अलिबाग | प्रतिनिधी |

सत्तेचा माज चढलेल्यांनी शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या छायाचित्राचा अवमान केल्याच्या निषेधार्थ अलिबागमध्ये ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेत जोरदार आंदोलन छेडले. जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली अलिबागमधील छत्रपती शिवाजी महाराज चौकात झालेल्या या आंदोलनात शायना एन.सी. आणि शिंदे सेनेविरोधात शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला.



बाळासाहेब ठाकरे हे केवळ एका पक्षाचे नेते नसून, लाखो शिवसैनिकांच्या अस्मितेचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहेत. त्यांच्या छायाचित्राची विटंबना झाल्याचा आरोप समोर आल्यानंतर रायगडमधील शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली. याच पार्श्वभूमीवर अलिबागमध्ये ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून निषेध नोंदवला. सत्तेच्या जोरावर कोणालाही शिवसैनिकांच्या भावना पायदळी तुडवता येणार नाहीत, असा ठाम संदेश या आंदोलनातून देण्यात आला. या आंदोलनात जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, जिल्हा सल्लागार सतीश पाटील, जिल्हाधिकारी अमीर ठाकूर, तालुकाप्रमुख शंकर गुरव, प्रवक्ते धनंजय गुरव, नगरसेवक संदीप पालकर, कृष्णा कडवे, अजित पाटील, स्नेहल देवळेकर, प्रणाली पाटील, जितेंद्र जैन, मिलिंद खानोलकर यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

...तरीदेखील पंतप्रधान कर्जतमध्ये येणार?

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात होऊ घातलेल्या टोरंट वीज प्रकल्पाला प्रचंड विरोध होत आहे. तरीदेखील देशाचे पंतप्रधान येणारच, अशी आवई उठवली जात आहे. पंतप्रधान आले तर त्यांची सभा ज्या लाखाची वाडी येथे आयोजित केली जाऊ शकते तेथे आजही मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. दरम्यान, आदिवसी शेतकऱ्यांची सातबारा उतारा असलेली जमीन हस्तगत केल्याचे त्यांच्याकडून बोलले जात असून, बंदोबस्तात असलेले पोलीस त्यांना तेथून हाकलून लावत असल्याचा आरोप देखील त्यांच्याकडून करण्यात येत आहे.



टोरंट वीज प्रकल्पाच्या वसाहतीसाठी महाराष्ट्र शासनाने आदिवासी सोसायटीच्या नावे असलेली ९६ एकर जमीन टोरंट कंपनीला ३० वर्षाच्या भाडेतत्वावर दिली आहे. त्या भालिवडी ग्रामपंचायत मधील जमिनीवर ऑक्टोबर महिन्यापासून जमीन सपाटीकरण सुरु आहे.त्यांनतर १५ ऑक्टोबर रोजी देशाचे पंतप्रधान टोरंट कंपनीच्या सायडोंगर प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यासाठी येणार अशी चर्चा सुरु झाली. तेंव्हापासून कर्जत पोलिसांचे पथक तलाखाची वाडी येथे बंदोबस्तात आहे. सुरुवातीला दि.३ नोव्हेंबर रोजी देशाचे पंतप्रधान यांचा कार्यक्रम नक्की होता; मात्र, दसऱ्याला पाली सायडोंगर येथे झाडे तोडली आणि त्यानंतर देशभरातून टीका झाली.त्यामुळे ती तारीख पुढे ढकलून दि.१६ नॉव्हेमबर करण्यात आली. परंतु, या दिवशी देखील पंतप्रधान काही आले नाहीत. आता डिसेंबर महिन्यात पंतप्रधान येणार असल्याची अनौपचारिक चर्चा येथे बंदोबस्तात असलेले पोलीस करीत आहेत. त्यामुळे तेथे पोलिसांचा जगता पहारा कायम राहणार आहे. त्याचा त्रास सावळे ग्रामस्थांना सहन करावा लागत आहे. या परिसराच्या आजूबाजूला त्यांच्या शेतजमिनी आहेत. त्यांना त्या जमिनीमध्ये जाण्यास देखील पोलीस विरोध करीत असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये समावेश करा

■ शासनाने पाठ फिरवलेल्या शेतकऱ्यांची मागणी

| माणगाव | प्रतिनिधी |

निसर्गाच्या लहरीपणाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्याला बसतो. कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस, तर कधी पावसाने पाठ फिरवल्यामुळे हातातोंडाशी आलेले पीक डोळ्यांसमोर करपून जाते. वर्षभर कष्ट करून, कर्ज काढून आणि मोठ्या आशेने पिकवलेल्या शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही, तर शेतकऱ्याच्या संपूर्ण कुटुंबाचे आर्थिक गणितच कोलमडते. सध्या अशाच संकटाचा सामना रायगड जिल्ह्यातील माणगाव, म्हसळा आणि रोहा तालुक्यांतील शेतकऱ्यांना करावा लागत आहे. त्यामुळे या तिन्ही तालुक्यांचाही दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करून शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

राज्यात यापूर्वी ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर आणखी १३ तालुक्यांमधील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन सर्वेक्षण करण्याचे आदेश मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत देण्यात आले होते. माणगाव, म्हसळा आणि रोहा तालुक्यांमध्ये शेती हा अनेक कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रमुख आधार आहे. भातशेतीबरोबरच नाचणी, कडधान्ये आणि विविध हंगामी पिकांवर येथील शेतकऱ्यांचे अर्थकारण अवलंबून आहे. मात्र, पावसाचे अनियमित प्रमाण, पाण्याची कमतरता आणि बदलत्या हवामानामुळे शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे. अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली असून, काही शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळण्याची आशाही मावळली आहे.

शेतकऱ्यावर फार्महाउस मालकाकडून अन्याय

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील तुकाराम हिंदोळा यांच्या मालकीची चाफेवाडी येथील सर्वे ३०/१ मध्ये जमीन आहे. मात्र, त्या जमिनीमध्ये जाण्यापासून सर्व्हे नंबर ३१/१ ब मधील फार्म हाऊस मालकांनी त्यांना बंदी घातली आहे. दुसरीकडे त्या फार्म हाऊस मालकाकडून तेथे मोठ्या प्रमाणात माती उत्खनन सुरु असून, ते कोणत्याही प्रकारची रॉयल्टी भरून केले जात नाही. त्यामुळे तलाठी मंडळ अधिकारी आणि तहसीलदार यांनी तेथे लावून संबंधित यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी हिंदोळा यांनी केली आहे.

वनक्षेत्रातील गवत छावण्यांसाठी वरदान



| म्हसळा | प्रतिनिधी |

म्हसळा तालुक्यातील पशुधनाला चाऱ्याची टंचाई भासू नये, यासाठी वनविभागाच्या पडीक जमिनींवर उपलब्ध असलेले गवत कापून ते दुष्काळी भागात पाठविण्याची व्यवस्था केंद्र व राज्य सरकारने करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे जंगलातील गवत वाळून जाते. त्यानंतर अनेक ठिकाणी वणवे लागून मोठ्या प्रमाणावर जंगल आणि गवत जळून खाक होते. त्यामुळे हे गवत आगीत नष्ट होण्यापूर्वीच त्याची कापणी करून साठवणूक केल्यास दुष्काळी तालुक्यांतील चारा छावण्यांसाठी त्याचा मोठा उपयोग होऊ शकतो. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील बहुतांश भागात शेतीची कामे कमी झाल्याने पडीक जमिनींचे प्रमाण वाढले आहे. जमिनींवर मोठ्या प्रमाणात नैसर्गिक गवत उगवले असून, त्याचा योग्य वापर करण्याची आवश्यकता आहे. विशेष म्हणजे म्हसळा तालुक्यात सुमारे ३६०० एकर जमीन वनविभागाच्या ताब्यात आहे. खाडीकिनारपट्टीचा भाग वगळता वनक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गवत उपलब्ध आहे. एकीकडे दुष्काळी भागातील पशुपालकांना जनावरांच्या चाऱ्यासाठी मोठी धावपळ करावी लागत असताना दुसरीकडे कोकणातील वनक्षेत्र आणि पडीक जमिनींवरील गवत कोणत्याही उपयोगाविना नष्ट होत आहे. या दोन्ही परिस्थितींचा विचार करून शासनाने नियोजनबद्ध पद्धतीने गवत कापणी, संकलन, साठवणूक आणि वाहतुकीची व्यवस्था करणे गरजेचे आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी या विषयात पुढाकार घेऊन केंद्र व राज्य शासनाकडे पाठपुरावा करावा. तसेच, संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

शनिवार, दि. २१ नोव्हेंबर रा. ९.३० वा.
पीएनपी नाट्यगृह, अलिबाग
तिकीट विक्री नाट्यगृहात चार दिवस आधी सुरु



तिकीट संपर्क : संदीप गोठीवरेकर - ९५२७६८६१००
चंद्रकांत पानकर - ९८८१४६२४६६

नवी मुंबईत परदेशी पाहुण्याचे आगमन | टी.एस. चाणक्य परिसरात छायाचित्रकारांची रेलचेल

'बायलॉन क्रेक'ने वेधले पक्षीप्रेमींचे लक्ष

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

हिवाळ्याची चाहूल लागताच नवी मुंबईतील पाणथळ क्षेत्रांमध्ये परदेशी पक्ष्यांचे आगमन सुरू झाले आहे. पाम बीच मार्गावरील टी. एस. चाणक्य परिसरातील विस्तीर्ण पाणथळ जागा सध्या विविध देशांतून येणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांसाठी आकर्षणाचे ठिकाण बनली आहे. या परिसरात दरवर्षी हिवाळ्यात विविध प्रजातींचे पक्षी दाखल होत असल्याने पक्षीप्रेमी आणि छायाचित्रकारांची पावले या भागाकडे वळू लागली आहेत.

यंदाच्या हंगामात टी. एस. चाणक्य परिसरात दुर्मिळ मानल्या जाणाऱ्या 'बायलॉन क्रेक' या पक्ष्याने पक्षीप्रेमींचे विशेष लक्ष वेधून घेतले आहे. आकाराने लहान



असलेल्या या पक्ष्याचे सौंदर्य आणि त्याची वैशिष्ट्यपूर्ण ठेवण छायाचित्रकारांसाठी आकर्षण ठरत आहे. पक्षी छायाचित्रकार आणि अभ्यासक प्रदीप चौधरी यांनी या दुर्मिळ पक्ष्याला आपल्या कॅमेऱ्यात टिपले आहे. त्यांनी टिपलेले छायाचित्र पक्षीप्रेमींमध्ये चर्चेचा विषय ठरले असून, हा पक्षी पाहण्यासाठी आणि त्याचे छायाचित्र टिपण्यासाठी परिसरात छायाचित्रकारांची गर्दी होत आहे. पक्ष्यांच्या हालचाली टिपण्यासाठी सकाळच्या वेळी छायाचित्रकार मोठ्या संख्येने येथे दाखल होत आहेत. दुर्बिणी आणि लांब पल्ल्याच्या कॅमेऱ्यांच्या साहाय्याने पक्ष्यांचे निरीक्षण केले जात आहे. एखाद्या दुर्मिळ पक्ष्याचे दर्शन घडल्याची माहिती मिळताच पक्षीप्रेमींमध्ये उत्सुकता वाढते आणि त्याला पाहण्यासाठी अनेक जण परिसरात पोहोचतात.

'बायलॉन क्रेक' हा पाणथळ जागा, दलदलीचे प्रदेश, गवताळ भाग आणि पाणवनस्पतींनी व्यापलेल्या परिसरात वावरणारा लहान आकाराचा जलपक्षी आहे. त्याचे राखाडी रंगाचे शरीर, तपकिरी पंखांवरील ठिपके, लालसर डोळे आणि हिरवट चोच ही त्याची प्रमुख ओळख आहे. हा पक्षी प्रामुख्याने युरेशियातील काही भागांत प्रजनन करतो आणि हिवाळ्यात भारतासह उबदार प्रदेशांकडे स्थलांतर करतो. मात्र, या पक्ष्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. पक्ष्यांच्या जवळ जाणे, मोठ्या आवाजात बोलणे, त्यांना उडवून लावणे किंवा त्यांच्या अधिवासात अडथळा निर्माण करणे टाळणे गरजेचे आहे. छायाचित्रण करताना सुरक्षित अंतर राखणे ही प्रत्येक छायाचित्रकाराची जबाबदारी असल्याचे पक्षीपप्रमींमधून बोलले जात आहे.

नैसर्गिक जागा सुरक्षित राहणे गरजेचे

नवी मुंबईच्या वेगाने होणाऱ्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर टी.एस. चाणक्य परिसरातील पाणथळ जागांचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. हिवाळ्यात येथे विविध प्रकारचे बदक, पाणकोंबड्या, किनारपट्टीवरील पक्षी तसेच इतर जलपक्षी पाहायला मिळतात. त्यामुळे पक्षी निरीक्षक, निसर्गप्रेमी आणि वन्यजीव छायाचित्रकारांसाठी हा परिसर पर्वणी ठरत आहे. त्यामुळे परदेशातून हजारो किलोमीटरचा प्रवास करून येणाऱ्या या पक्ष्यांसाठी अशा नैसर्गिक जागा सुरक्षित राहणे गरजेचे आहे. पक्ष्यांच्या आगमनामुळे नवी मुंबईच्या जैवविविधतेचे दर्शन घडत असून, हा निसर्गाचा अनमोल ठेवा जपण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे.

दुसरा 'नं. ७' निवृत्त

काही दिवसांपूर्वी फुटबॉलचा बादशहा ख्रिस्तियानो रोनाल्डो निवृत्त झाला. त्याच्या जर्सीचा नंबर सात होता. म्हणून त्याला सीआर सेव्हन म्हणत. आता सात क्रमांकाची आणखी एक जर्सी निवृत्त झाली. ती भारतातील आहे. महेंद्रसिंग धोनीने आयपीएलला अलविदा केला आहे. क्रिकेटच्या इतर प्रकारातून आणि भारतीय संघातून तो आधीच बाहेर पडला होता. पण आता तो आयपीएलमध्येही मैदानावर दिसणार नाही. धोनी ४५ वर्षांचा आहे. रोनाल्डोचा जन्म १९८५ चा. तर धोनीचा सात जुलै १९८१ चा. म्हणजे हे दोघे जेन झीच्या आधीच्या मिलेनियल्स पिढीतले. पण त्या दोघांनीही जेन झीच नव्हे तर त्याही पुढच्या अल्फा जनरेशनलाही वेड लावले. त्यांच्या मनावर राज्य केले. या दोहोंमधील एक मोठे साम्य म्हणजे त्यांचा जबरदस्त फिटनेस. रोनाल्डो हा आजही विशीतल्या तडफेने मैदानावर धावू शकतो आणि त्याच्या पायांच्या हालचाली तितक्याच वेगाने होतात. धोनी हादेखील अगदी शेवटपर्यंत सर्वात चपळ खेळाडू होता. आपल्या संपूर्ण करियरमध्ये शेवटच्या सीझनचा अपवाद वगळता एकदाही धावचित किंवा रनआऊट झाला नव्हता. शिवाय सेकंदाच्या एक शतांश इतक्या वेळात चेंडू झपकन खाली आणून फलंदाजाला यष्टिचित करण्याचे त्याचे अद्भुत कसब शेवटपर्यंत कायम होते. रोनाल्डो शेवटच्या क्षणी काहीही चमत्कार करून जिंकून देईल अशी आशा त्याच्या चाहत्यांना वाटत राही. तर, धोनी हा तर शेवटच्या क्षणी सामना फिरवण्याच्या कलेतला बादशहाच होता. या दोघांच्या व्यक्तिमत्वात मात्र जमीन अस्मानाचा फरक होता. आपण जगातले सर्वश्रेष्ठ फुटबॉलपटू आहोत असे रोनाल्डो खुलेआम सांगे. अनेकांना हा त्याचा उद्धटपणा वाटे. याच त्याच्या स्वभावामुळे तो अखेरीला पोर्तुगाल संघातून बाहेर गेला. याउलट धोनी हा शांतपणाचा मूर्तीमंत पुतळा होता. प्रसिध्दीच्या झोतापासून तो कायम दूर राहिला. अगदी विश्वचषक जिंकल्यानंतर देखील धोनी नावाचा कर्णधार फोटोत अगदी कडेला उभा राहिलेला दिसे. पत्रकार परिषदेत तो नेमके बोले. कर्णधार म्हणून तर तो कोणत्याही खेळाडूवर कधीही चिडत नसे. अगदी वाईटातल्या वाईट स्थितीतही त्याने आपला तोल कधीही घालवला नाही.

अपेक्षित निर्णय

धोनीची परवाची निवृत्ती ही अपेक्षित होती. पण ती कोणताही गाजावाजा न करता, शांतपणे आली. अर्थात, हेच त्याने यापूर्वी अनेकदा केले होते. २०१४ मध्ये मेलबर्न इथे भारताचा कसोटी सामना संपल्यावर त्याने नेहमीप्रमाणे पत्रकार परिषद घेतली. पण त्यात ही घोषणा झाली नाही. नंतर पाऊण तासाने क्रिकेट बोर्डाचे पत्रकर आले व त्यात धोनीचा हा शेवटचा सामना होता असे जाहीर झाले. तीन वर्षानंतर तो एकदिवसीय सामन्यातून निवृत्त झाला. तर २०२० च्या १५ ऑगस्टला त्याने ट्वेंटी ट्वेंटीच्या भारतीय संघातून अचानकपणे निवृत्ती जाहीर केली. संध्याकाळी साडेसात वाजल्यापासून मी निवृत्त झालो आहे असे समजा अशी पोस्ट त्याने सोशल मिडियात केली. पण त्यानंतरही तो चेन्नई संघाचा कर्णधार राहिला. इतकेच नव्हे तर त्याने संघाला विजेतेपदही मिळवून दिले. त्यामुळे तो आणखी खेळत राहावा असे सर्वांना वाटत होते. पण तिथेही त्याने अचानक धक्का दिला. चेन्नई सुपर किंग्ज संघाची बैठक चालू असताना कोणत्या खेळाडूंना येत्या हंगामात रिलीज करता येईल (म्हणजे संघाच्या करारातून मोकळे करता येईल किंवा थोडक्यात काढून टाकता येईल) याचा विचार चालू होता. त्यावेळी त्याने या खेळाडूंच्या यादीत माझेही नाव समाविष्ट करा असे शांतपणे सांगितले. तीच त्याची निवृत्तीची घोषणा होती. अर्थात याची पार्श्वभूमी यंदाच्या हंगामात तयार झालीच होती. २०२६ च्या संपूर्ण मोसमात तो चेन्नई संघात होता, पण एकही सामना खेळला नव्हता. त्याआधीच्या म्हणजे २०२५ च्या हंगामात फलंदाज म्हणून त्याची कामगिरी ढासळली होती. मारधाडीच्या षटकात फलंदाजीला येऊन सामना पूर्ण फिरवून टाकण्याचे त्याचे कौशल्य गायब झाले होते. पूर्वी शेवटच्या षटकात २५ धावा असल्या तरी धोनी मैदानात असेपर्यंत चेन्नईवाले निश्चिंत असत. तोही अचूक षटकार ठोकून त्यांच्या अपेक्षा पूर्ण करी. पण शेवटी त्याची हीच जादू त्याला सोडून चालली होती. त्याचा प्रसिद्ध हेलिकॉप्टर शॉट काम करेनासा झाला होता. धावफलक हलता ठेवण्याचे कसबही कमी झाले होते.

बाप आखिर बाप होता है

यष्टिरक्षक व कर्णधार म्हणून मात्र तो शेवटपर्यंत उत्तम होता. गोलंदाजीतील बदल, अचूक क्षेत्ररक्षणाची आखणी यात कोणीही त्याचा हात धरू शकत नव्हता. मधल्या काळात तो कर्णधार म्हणून निवृत्त झाल्यावर रवींद्र जडेजाकडे ती धुरा सोपवण्यात आली. पण त्याला ते झेपले नाही. त्यामुळे ऐन आयपीएल सामने चालू असताना पुन्हा धोनीला कर्णधार करण्यात आले. चेन्नई संघाची कामगिरी खराब झाली. पुढच्या हंगामात ऋतुराज गायकवाडकडे ती जबाबदारी दिली गेली. हाही खास धोनीचा ठसा होता. ऋतुराज हा अतिशय तरुण आहे. मध्यंतरी त्याच्या फलंदाजीत सातत्यही नव्हते. पण खेळाडूंना सांभाळून घेणे, त्यांना संधी देत राहणे हे धोनीचे वैशिष्ट्य होते. खेळाडू जोवर मनापासून प्रयत्न करीत आहे तोवर त्याच्यावर उगाचच दडपण न टाकणे ही धोनीची खासियत होती. गोलंदाजांनाही तो विनाकारण सतत सूचना करीत नसे. क्वचित एखादा शब्द बोलला तर बोले. अनेकदा प्रतिस्पर्धी संघाला शेवटच्या षटकात समजा दहा-बाराच धावा हव्या असत. त्यामुळे आपल्या गोलंदाजावर दडपण येई. अशा वेळी संघातले इतर खेळाडू त्याच्याशी बराच वेळ बोलताना व डावपेच आखताना दिसत. पण कर्णधार असूनही धोनी यात क्वचित असे. काय करायचे आहे हे गोलंदाजाला चांगले ठाऊक आहे, गोलंदाज हाही भरपूर क्रिकेट खेळलेला आहे त्यामुळे त्याला सल्ल्याची गरज नाही असे त्याचे मत असे. बाकी धोनीचे आकडे हे त्याच्या कर्तबगारीचा आरसा आहेत. आयपीएलमध्ये तो २७८ सामने खेळला. ३८ च्या सरासरीने त्याने ५४३९ धावा फटकावल्या. त्यात २४ अर्धशतके आहेत. ३७५ चौकार आणि २६४ षटकार त्याने मारले. १५४ झेल घेतले व ४७ स्टंपिंग्ज त्याने केली. २०१०, २०११ , २०१८, २०२१ आणि २०२३ असे पाच वेळा त्याने चेन्नईला विजेतेपद मिळवून दिले. त्याच्या कर्णधारीचे असंख्य किस्से सांगता येतील. २०११ मध्ये अंतिम सामन्यात बंगळुरूचा संघ समोर होता. कोहली, डिव्हिलियर्स वगैरे तगडी फलंदाजी होती. ख्रिस गेल तुफानी फॉर्ममध्ये होता. पण धोनीने गोलंदाजीची सुरुवातच रविचंद्रन अश्विनपासून केली आणि त्याने गेलला शून्यावर बाद केले. तिथेच सामना संपला. मधल्या काळात चेन्नई संघावर दोन वर्षांची बंदी होती. त्यामुळे धोनी पुणे संघातून खेळला. पण चेन्नईचे पुनरागमन झाल्यावर लगेचच २०१८च्या हंगामात धोनीने पुन्हा संघाला जेतेपद मिळवून दिले. त्यावेळी धोनी ३७ वर्षांचा होता आणि संघात अनेक तिशी पार केलेले खेळाडू होते. पण बाप लोकांचा हा संघ विजयी ठरला. २०२३ च्या अंतिम विजेतेपदाच्या हंगामात धोनीची फलंदाज म्हणून कामगिरी निष्प्रभ होती. पण तो कर्णधार म्हणून बापच होता. आता हा बाप मैदानातून बाहेर गेला आहे. पण तंबूतूनही तो चेन्नईसाठी करामती करीत राहील यात शंका नाही. आखिर बाप बाप होता है.

विचार

इथेनॉल धोरणातील धरसोड

भीषण दुष्काळ, उसाचे घटते उत्पादन आणि साखर दरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने इथेनॉलनिर्मितीवर अचानक निर्बंध घातल्यामुळे महाराष्ट्रातील साखर कारखानदारी अभूतपूर्व संकटात सापडली. साखरेचे भाव गोठवल्याने तसेच इथेनॉल खरेदी थांबवल्याने कारखाने अडचणीत आले आहेत. धोरणात्मक धरसोडीच्या या दुष्टचक्रात कारखान्यांचे अर्थकारण पूर्णपणे कोलमडत असून हा उद्योग आता अस्तित्वाची लढाईत लढत आहे.



प्रा. जयसिंग यादव

भारतातील, विशेषतः महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आणि ग्रामीण समृद्धीचे मुख्य केंद्र म्हणून साखर कारखानदारीकडे पाहिले जाते. गेल्या सात-आठ दशकांत या उद्योगाने केवळ ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलला नाही, तर लाखो शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आणले. केवळ साखर उत्पादन एवढ्यापुरताच मर्यादित न राहता हा उद्योग सह-वीज निर्मिती, मद्यनिर्मिती आणि अलीकडच्या काळात इथेनॉल या हरित इंधनाचा प्रमुख स्त्रोत म्हणून नावारूपास आला होता; मात्र बदलणारे हवामान, पावसाची ओढ, निसर्गाचा लहरीपणा आणि केंद्र सरकारच्या धोरणांमधील सातत्यहीन धरसोड यामुळे हा संपूर्ण उद्योग सध्या अत्यंत संवेदनशील आणि गंभीर वळणावर येऊन ठेपला आहे. एकीकडे उसाचे घटते उत्पादन आणि दुसरीकडे सरकारी नियमांचा अवाजवी बडगा, या कात्रीत साखर कारखाने आज पूर्णपणे भरडले जात आहेत. ही परिस्थिती अशीच राहिली तर ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडण्यास वेळ लागणार नाही. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने खनिज तेलाची आयात कमी करण्यासाठी, परकीय चलन वाचवण्यासाठी आणि प्रदूषणावर नियंत्रण
मिळवण्यासाठी पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमाला राष्ट्रीय पातळीवर प्रचंड प्रसिद्धी दिली गेली.
सरकारने जाहीर केले, की जे कारखाने इथेनॉल प्रकल्पांची उभारणी करतील, त्यांना विविध सवलती, स्वस्त कर्ज आणि पायाभूत सुविधा पुरवल्या जातील. सरकारच्या या आवाहनाला आणि दीर्घकालीन आश्वासनाला प्रतिसाद देत देशातील आणि राज्यातील साखर कारखान्यांनी बँकांकडून कोट्यवधी रुपयांचे कर्ज काढून इथेनॉल प्रकल्पांमध्ये प्रचंड मोठी गुंतवणूक केली. उसाच्या रसापासून आणि 'बी-हेवी' मळीपासून थेट इथेनॉल तयार करण्याचे अत्याधुनिक तंत्रज्ञान कारखान्यांनी कोट्यवधी रुपये खर्च करून विकसित केले. कारखानदारांना असे वाटले होते, की केवळ साखरेच्या जागतिक आणि देशांतर्गत अस्थिर बाजारपेठेवर अवलंबून न राहता इथेनॉलच्या माध्यमातून एक शाश्वत, कायदेशीर आणि हमखास उत्पन्न मिळवून देणारा मार्ग खुला झाला आहे. या नव्या उत्पन्नाच्या जोरावर बँकांची कर्जे फेडणे आणि शेतकऱ्यांची उसाची बिले वेळेवर देणे सहज शक्य होईल, असा एक परिपूर्ण आर्थिक आराखडा तयार करण्यात आला होता; परंतु निसर्गाच्या एकाच फटक्याने आणि सरकारच्या एका रात्रीत घेतलेल्या निर्णयाने या संपूर्ण गुंतवणुकीवर आणि आर्थिक गणितावर पाणी फेरले गेले.

यंदाच्या हंगामात पावसाने दिलेली ओढ आणि अनेक प्रमुख ऊस उत्पादक पट्ट्यांमध्ये निर्माण झालेली तीव्र दुष्काळी परिस्थिती, यामुळे उसाच्या उपलब्धतेबाबत खूप मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एकरी उत्पादनात झालेली मोठी घट, उसाची रखडलेली वाढ आणि पाण्याचा अभाव यामुळे साखरेचे एकूण उत्पादन लक्षणीयरीत्या घटण्याची भीती निर्माण झाली. देशांतर्गत बाजारात साखरेचा तुटवडा निर्माण होऊ नये आणि सणासुदीच्या काळात किंवा निवडणूक वर्षात साखरेचे भाव नियंत्रणात राहावेत, यासाठी प्रशासकीय पातळीवर अचानक वेगाने हालचाली सुरू झाल्या. साखरेचे उत्पादन कमी झाल्यास बाजारात महागाई वाढेल आणि त्याचा थेट फटका सर्वसामान्य ग्राहकांना बसेल, हा राजकीय दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील विषय असतो. त्यामुळेच, साखरेचा साठा पुरेसा ठेवण्यासाठी सरकारने तातडीने आणि घाईघाईने पावले उचलण्यास सुरुवात केली; परंतु ही पावले उचलत असताना ज्या उद्योगाने अब्जावधी रुपयांची गुंतवणूक केवळ सरकारी आवाहनावरून केली होती, त्यांच्या आर्थिक हिताचा आणि अस्तित्वाचा पूर्णपणे बळी दिला गेला, याचा विचार धोरणकर्त्यांनी केला नाही. देशांतर्गत साखरेचा साठा सुरक्षित ठेवण्यासाठी केंद्र सरकारने उसाच्या रसापासून आणि 'बी-हेवी' मळीपासून इथेनॉल बनवण्यावर अचानक कडक निर्बंध लादले किंवा त्यावर पूर्ण बंदी घातली. साखरेचे उत्पादन घटू नये हा यामागील मुख्य हेतू असला, तरी या निर्णयामुळे कारखान्यांचे संपूर्ण आर्थिक गणितच कोलमडले. ज्या इथेनॉल प्रकल्पांसाठी कारखान्यांनी बँकांकडून अवाढव्य कर्जे काढली होती, ते प्रकल्प अचानक कच्च्या मालाअभावी बंद पडण्याच्या किंवा अत्यंत कमी क्षमतेने चालवण्याच्या स्थितीत आले. कोट्यवधी रुपयांची यंत्रसामग्री धूळखात पडली आहे. त्यातच भर म्हणून, सरकारी तेल कंपन्यांकडून इथेनॉल खरेदी संथ गतीने होणे किंवा खरेदीला अचानक ब्रेक लावण्याचा निर्णय यामुळे कारखान्यांकडे आधीच तयार असलेला इथेनॉलचा साठा गोदामांमध्ये पडून राहिला. कारखान्यांचा हक्काचा, हक्काच्या पैशांचा आणि तातडीने रोख पैसे मिळवून देणारा हा मार्ग बंद झाल्यामुळे त्यांची संपूर्ण आर्थिक तरलता संपुष्टात आली असून दैनंदिन कारभार चालवणे कठीण झाले आहे. साखर कारखानदारी समोरील सर्वात मोठे आणि चक्रावून टाकणारे विरोधाभासी संकट म्हणजे सरकारचे दुटप्पी आर्थिक धोरण. निवडणुकीचे राजकारण आणि शेतकरी मतदारांना खूश करण्यासाठी सरकारने उसाच्या रास्त आणि किफायतशीर दरात (एफआरपी) भरीव वाढ केली. शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचे आणि घामाचे दाम मिळायलाच हवेत, यात तीळमात्र शंका नाही आणि त्याचे सर्वांनीच स्वागत केले पाहिजे; परंतु कच्च्या मालाचा म्हणजेच उसाचा खरेदी दर वाढवत असताना, कारखान्यांचा पक्का माल म्हणजेच साखरेचे किमान विक्री मूल्य (एमएसपी) वाढवण्यास सरकारने साफ नकार दिला आहे.

गेल्या कित्येक वर्षांपासून साखरेची 'एमएसपी' वाढवण्याची रास्त मागणी कारखाने करत आहेत, कारण उत्पादन खर्च गगनाला भिडला आहे; मात्र साखरेचे भाव बाजारात वाढले तर शहरी भागातील ग्राहक आणि सर्वसामान्यांमध्ये नाराजी पसरेल, या भीतीने सरकारने साखरेचे भाव वाढणार नाहीत यासाठी बाजारपेठेवर कडक प्रशासकीय नियंत्रण ठेवले आहे. साखरेचे उत्पन्न मर्यादित ठेवायचे, उप-उत्पादनांवर (इथेनॉल) बंदी घालायची आणि कच्चा माल मात्र महाग खरेदी करायचा, हा व्यापार क्षेत्रातील कोणता नियम आहे? या आर्थिक विसंगतीमुळे कारखाने आतबट्ट्याच्या व्यवहारात अडकले आहेत. या सर्व चुकीच्या धोरणांचा आणि निसर्गाच्या अवकृपेचा एकत्रित परिणाम साखर कारखान्यांच्या ताळेबंदावर अत्यंत गंभीरपणे झाला आहे. आज बहुतांश साखर कारखान्यांची अवस्था आर्थिकदृष्ट्या दिवाळखोरीत निघण्यासारखी झाली आहे. बँकांचे हप्ते आणि त्यावरील व्याज नियमित सुरूच आहे; मात्र ज्या प्रकल्पातून हे पैसे फेडायचे होते, ते इथेनॉल प्रकल्प बंद आहेत. यामुळे अनेक कारखाने बँकांचे हप्ते थकवून 'एनपीए' म्हणजेच थकबाकीदार होण्याच्या मार्गावर आहेत. एकदा कारखाना 'एनपीए' झाला, की त्याला पुढील हंगामासाठी बँकांकडून खेळते भांडवल किंवा उचल मिळत नाही. त्यामुळे कारखाना कायमचा बंद पडू शकतो. साखरेला बाजारात भाव नाही आणि इथेनॉलमधून हक्काचा पैसा मिळेना, अशा स्थितीत शेतकऱ्यांची वाढीव 'एफआरपी' कशी द्यायची, हा यक्षप्रश्न कारखान्यांसमोर उभा ठाकला आहे.

यामुळे शेतकरी आणि कारखाना यांच्यात नाहक संघर्ष पेटण्याची चिन्हे दिसत आहेत. याशिवाय कारखान्यांचा दैनंदिन गाळप खर्च, यंत्रसामग्रीची दुरुस्ती, रसायने, ऊस तोडणी आणि वाहतूक व हजारो कामगारांचे पगार भागवण्यासाठी कारखान्यांकडे खेळते भांडवल शिल्लक राहिलेले नाही. साखर कारखानदारी हा केवळ एक व्यावसायिक उद्योग नसून ती ग्रामीण भागाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनाची वाहिनी आहे. जेव्हा सरकार एखाद्या उद्योगाला एका विशिष्ट दिशेने गुंतवणूक करण्याचे आवाहन करते आणि त्यासाठी प्रोत्साहन देते, तेव्हा त्या धोरणात किमान ५ ते १० वर्षांचे सातत्य असणे अत्यंत आवश्यक असते. दरवर्षी हवामानाच्या लहरी अंदाजानुसार किंवा तात्कालिक राजकीय फायद्या-तोट्यानुसार जर धोरणे बदलली, तर कोणताही उद्योग बाजारात तग धरू शकत नाही. आधीच जागतिक पातळीवर साखरेच्या किमतींमध्ये चढ-उतार होत असतात, अशा वेळी देशांतर्गत धोरणे तरी स्थिर राहणे अपेक्षित असते; परंतु आपल्याकडे नेमकी उलटी परिस्थिती पाहायला मिळत आहे. आज गरज आहे ती सरकारने साखरेची 'एमएसपी' तातडीने वाढवण्याची, जेणेकरून कारखान्यांना प्रति क्विंटल साखरेमागे काही प्रमाणात आर्थिक दिलासा मिळेल.
तसेच, इथेनॉल निर्मितीवरील निर्बंधांचा तात्काळ पुनर्विचार करून, साखरेचे उत्पादन आणि इथेनॉल निर्मिती यामध्ये एक सुवर्णमध्य साधला गेला पाहिजे. जर सरकारने वेळीच हस्तक्षेप करून कारखानदारीला या आर्थिक अरिष्टातून बाहेर काढले नाही, तर केवळ कारखानेच बुडणार नाहीत, तर त्यांच्यावर अवलंबून असलेला लाखो ऊस उत्पादक शेतकरी, शेतमजूर आणि संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था उद्ध्वस्त होईल.

चर्चा आजची

इमारत बांधणीला नव्या कल्पनांचा आधार

भारतात इमारतींची उंची वाढतच चालल्याने, जमीन आणि आकाश या दोन्हींप्रति आपली सामूहिक जबाबदारी अधिकच महत्त्वाची झाली आहे. आज, शहरी विकासावरील चर्चा प्रामुख्याने 'स्मार्ट' आणि 'ग्रीन' बांधकामावर केंद्रित आहेत. गेल्या तीन दशकांत या क्षेत्रात मोठे परिवर्तन झाले आहे, जिथे शाश्वतता हा आता दुय्यम विषय न राहता वास्तुरचना आणि इमारत व्यवस्थापनाचा एक मुख्य घटक बनला आहे. वाढता ऊर्जा खर्च, दीर्घकालीन परवडणारी किंमत, शाश्वततेची आश्वासने आणि पर्यावरणपूरक व उच्च-कार्यक्षम इमारतींची मागणी, हे या बदलाला चालना देणारे काही घटक आहेत. इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिल नुसार, पारंपरिक इमारतींच्या तुलनेत हरित इमारती २० ते ३० टक्के कमी ऊर्जा वापरतात. सरकारी सूत्रांनुसार, २०३० पर्यंत उत्सर्जन ४५ टक्क्यांनी कमी करण्याचे आणि २०७० पर्यंत कार्बन तटस्थता साधण्याचे भारताचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात हरित इमारती महत्त्वाची भूमिका बजावतात. सध्या, इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिल, इंटिग्रेटेड हॅबिटॅट असेसमेंटसाठी ग्रीन रेटिंग आणि जागतिक स्तरावर लीडरशिप इन एनर्जी अँड एन्व्हायर्नमेंटल डिझाइन यांसारखी मानके आणि प्रमाणपत्रे एक चौकट प्रदान करतात. ही मानके ऊर्जा वापर, पाणी वापर, कचरा व्यवस्थापन आणि इमारतीमधील पर्यावरणाची गुणवत्ता यांसारख्या मापदंडांच्या आधारे इमारतीचे मूल्यांकन करतात. हरित इमारतींमध्ये पूर्वीपासूनच सौर पॅनेल आणि पर्जन्यजल संचयन प्रणाली यांसारख्या दृश्य वैशिष्ट्यांवर लक्ष केंद्रित केले जात आहे. परंतु आता, शाश्वततेवर काम करताना, विकासक आणि वास्तुविशारद इमारतीच्या मुख्य प्रणालींमध्ये नवीन संधी शोधत आहेत. येथेच लिफ्ट आणि एस्केलेटर एक सकारात्मक भूमिका बजावू शकतात. लिफ्ट आणि एस्केलेटर या इमारतींमधील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या प्रणाली आहेत, ज्या लोकांना केवळ एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर नेण्यापलीकडे बरेच काही करतात. त्या इमारतीच्या दैनंदिन कामकाजाचा एक अत्यावश्यक भाग आहेत, ज्यांचा परिणाम ऊर्जा वापर, रहिवाशांची सोय, सुलभता, सुरक्षितता आणि एकूण कार्यक्षमतेवर होतो.

सुयोग आंग्रे

काही आधुनिक पद्धतींचाअवलंब करण्यावर भर दिला जात आहे. ३ डी प्रिंटिंग या तंत्रज्ञानामध्ये मोठ्या ३ डी प्रिंटरच्या मदतीने थेट काँक्रीटचे थर रचून काही दिवसांतच संपूर्ण घर बांधले जाते. यामुळे मजुरीचा खर्च आणि बांधकामाचा वेळ मोठ्या प्रमाणात वाचतो.प्रिफॅब्रिकेटेड आणि मॉड्यूलर बांधकामात इमारतीचे विविध भाग कारखान्यात तयार केले जातात आणि बांधकामाच्या जागेवर आणून फक्त जोडले जातात.नाविन्यपूर्ण आणि पर्यावरणपूरक साहित्याचा वापर कार्यावर भर दिला जात आहे. सेल्फ-हिलिंग काँक्रीटमध्ये विशिष्ट प्रकारचे बॅक्टेरिया किंवा रसायने मिसळलेली असतात. जर काँक्रीटला तडे गेले, तर पाण्याच्या संपर्कात आल्यावर हे घटक सक्रिय होऊन ते तडे आपोआप भरून काढतात. पारदर्शक लाकडावर रासायनिक प्रक्रिया करून ते काचेसारखे पारदर्शक बनवले जाते. हे काचेपेक्षा अधिक मजबूत असते आणि उष्णता रोखण्यास मदत करते.पुनर्वापर केलेले साहित्याचा वापर केला जात आहे. यामध्य प्लास्टिकच्या कचऱ्यापासून बनवलेल्या विटा किंवा फ्लाय-ॲश विटांचा वापर करून पर्यावरणाची हानी कमी केली जाते.डिजिटल तंत्रज्ञान आणि ऑटोमेशन पद्धतीचा अवलंब करण्यास सुरुवात झाली आहे.बीआयएम मध्येइमारत प्रत्यक्ष बांधण्यापूर्वी तिचे त्रिमितीय (३) डिजिटल मॉडेल तयार केले जाते. यामुळे बांधकामातील संभाव्य चुका आधीच लक्षात येतात आणि खर्चाचे अचूक नियोजन करता येते.ड्रोन आणि रोबोटिक्स प्रक्रियेतबांधकामाच्या जागेची पाहणी करण्यासाठी ड्रोनचा वापर केला जातो. तसेच, वेगाने आणि अचूकपणे विटा रचण्यासाठी रोबोट्सचा वापर वाढत आहे. हरित आणि स्मार्ट इमारती उभारण्यासाठी नागरिक पुढाकार घेत आहेत.यामध्येऊर्जा बचत करण्यावर भर दिला जात आहे. यासाठीइमारतींमध्ये सौर ऊर्जेचा वापर, नैसर्गिक प्रकाश आणि खेळत्या हवेसाठी विशेष रचना केली जाते.स्मार्ट सेन्सर्स वापरण्यासाठीचा सल्ला दिला जात आहे. यामध्येइमारतीमधील वीज, पाणी आणि तापमान नियंत्रित करण्यासाठी ऑटोमॅटिक सेन्सर्स बसवले जातात. या नवोन्मेषांमुळे बांधकामाचा वेग वाढतो, खर्चात बचत होते, कामगारांची सुरक्षितता वाढते आणि निसर्गावर होणारा दुष्परिणाम कमी होतो.स्मार्ट लिफ्ट इमारतीच्या 'मध्यवर्ती चेतासंस्थे'प्रमाणे काम करू शकतात, ज्या डेटा आणि कनेक्टिव्हिटीचा वापर करून कार्यक्षमता सुधारतात आणि ऊर्जा वाचविण्यात मदत करतात. त्या अधिक स्मार्ट, अधिक कार्यक्षम आणि अधिक टिकाऊ इमारती तयार करण्यात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. ही कार्यक्षमता भविष्याचा वेध घेणाऱ्या डिझाइनचा परिणाम आहे. याव्यतिरिक्त, एलईडी लाइटिंग, उच्च-कार्यक्षमतेच्या मोटर्स आणि व्हेरिएबल फ्रिक्वेन्सी ड्राइव्ह विजेचा वापर अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करण्यास मदत करू शकतात. बुद्धिमान तंत्रज्ञान केवळ ऊर्जा-कार्यक्षम वैशिष्ट्यांपुरते मर्यादित नाही. डेस्टिनेशन डिस्पॅच सिस्टीममुळे लिफ्ट शेजारील मजल्यांवर जाणाऱ्या प्रवाशांना एकत्र गटबद्ध करू शकतात. यामुळे अनावश्यक फेऱ्या कमी होतात आणि गर्दीच्या वेळी प्रवाशांचा ओघ सुधारतो, परिणामी प्रतीक्षा वेळ आणि एकूण प्रवासाचा वेळ कमी होतो. कनेक्टिव्हिटीमुळे लिफ्ट आणि एस्केलेटरच्या देखभालीची पद्धतही बदलत आहे. हरित इमारतींसाठी उच्च मानके साध्य करण्यासाठी विकासक आणि वास्तुविशारदांना पारंपरिक विचारांच्या पलीकडे जाऊन विचार करणे आवश्यक आहे. स्मार्ट उभ्या वाहतुकीकडे दुर्लक्ष केले जाऊ नये. मजबूत वैशिष्ट्ये असलेली एक स्मार्ट प्रणाली ऊर्जेचा वापर कमी करण्यास, रहिवाशांचा अनुभव सुधारण्यास, सुरक्षित कार्यप्रणाली सुनिश्चित करण्यास आणि इमारतीची दीर्घकालीन कार्यक्षमता टिकवून ठेवण्यास मदत करू शकते. यामुळे इमारतीच्या मालकांना अनेक फायदे मिळतात, ज्यात ऊर्जेचा खर्च कमी होणे, विश्वसनीयता वाढणे आणि रहिवाशांचे समाधान वाढणे यांचा समावेश आहे.

लोकसंसद

व्हॉयेजर-१, मानवी बुद्धिमत्तेचा सर्वोच्च अविष्कार!

अमेरिकेच्या 'नासा'ने (राष्ट्रीय वैमानिकी आणि अंतराळ प्रशासन) ५ सप्टेंबर १९७७ रोजी अवकाशात प्रक्षेपित केलेल्या 'व्हॉयेजर-१' या अंतराळयानाने तब्बल ४९ वर्षे, २ महिने आणि ११ दिवसांच्या प्रवासानंतर १८ नोव्हेंबर २०२६ रोजी पृथ्वीपासून 'एक प्रकाश-दिवस' इतके प्रचंड अंतर गाठले. 'एक प्रकाश-दिवस' म्हणजे निर्वात पोकळीत प्रकाशाने एका दिवसात (२४ तासांत) कापलेले अंतर होय, अगदी अचूक सांगायचे तर २५९०,२०,६८,३७१ किलोमीटर (सुमारे २५.९ अब्ज किलोमीटर) इतके अंतर असते. मानवी इतिहासात पृथ्वीपासून इतक्या प्रचंड अंतरावर पोहोचलेली ही पहिलीच मानवनिर्मित वस्तू ठरल्याने सध्या जगभरात तिची सर्वाधिक चर्चा सुरु आहे. सुरुवातीला केवळ गुरू आणि शनी या ग्रहांचा अभ्यास करण्यासाठी पाठवलेल्या या यानाने आपली मूळ मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केलीच, परंतु आपला प्रवास पुढे सुरू ठेवत २०१२ मध्ये आपल्या सूर्यमालेची सीमा (हेलिओपॉज) ओलांडून आंतरतारकीय अवकाशात प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे आजही अत्यंत कमी ऊर्जा आणि मर्यादित उपकरणांच्या आधारे हे यान पृथ्वीवर अंतराळातील महत्त्वाची वैज्ञानिक माहिती पाठवत आहे. 'व्हॉयेजर-१' चा हा ४९ वर्षांचा अखंड अंतराळ प्रवास म्हणजे मानवाच्या अफाट बुद्धीमत्तेचा, दुर्दम्य इच्छाशक्तीचा, पराकोटीच्या जिज्ञासेचा आणि जिद्दीचा आणि विज्ञानाच्या सामर्थ्याचा एक सर्वोच्च अविष्कार म्हणावा लागेल.

– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

फ्लाईंग शीख मिल्खा सिंग

भारतातीलच नव्हे, तर जगातील महान धावपटूंमध्ये ज्यांची गणना होते, असे भारताचे महान धावपटू म्हणजे मिल्खा सिंग! 'फ्लाईंग शीख' या नावाने जगभर ओळखल्या जाणाऱ्या मिल्खा सिंग यांची २० नोव्हेंबर रोजी जयंती. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या संघर्षमय जीवनाचा आणि देदीप्यमान क्रीडा कारकिर्दीचा आढावा घेणे औचित्यपूर्ण ठरेल. मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी अविभाजित भारतातील पंजाब प्रांतातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. फाळणीच्या वेळी झालेल्या हिंसाचारात त्यांच्या कुटुंबातील अनेक सदस्यांचा मृत्यू झाला. या भीषण प्रसंगातून बचावून ते भारतात आले. बालपणी अनेक संकटांचा सामना करावा लागलेल्या मिल्खा सिंग यांनी जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर जागतिक स्तरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. मिल्खा सिंग यांना भारतीय सैन्यात नोकरी मिळाल्यानंतर त्यांच्या धावण्याच्या कौशल्याला योग्य दिशा मिळाली. सैन्यातील एका धावण्याच्या स्पर्धेत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यानंतर त्यांनी धावण्याचा नियमित सराव सुरू केला. कठोर मेहनत, शिस्त आणि अफाट जिद्दीच्या जोरावर त्यांनी राष्ट्रीय स्तरावर अनेक स्पर्धा जिंकल्या. १९५८ हे वर्ष त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचे वर्ष ठरले. टोकियो येथे झालेल्या आशियाई स्पर्धेत त्यांनी २०० मीटर आणि ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदके जिंकली. त्याच वर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत ४४० यार्ड धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक पटकावले. राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे ते स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू ठरले. त्यांच्या या कामगिरीमुळे भारतीय ॲथलेटिक्सला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी प्रतिष्ठा मिळाली. १९६२ मध्ये जकार्ता येथे झालेल्या आशियाई स्पर्धेतही त्यांनी आपली विजयी घोडदौ

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० नोव्हेंबर

१) श्री.गणेश चिंतामण गोखले
ब्राम्हणआळी, अलिबाग
दि. २०-११-१९३९

२)श्री.प्रभाकर गोविंद भोईर
म्हाडा कॉलनी, अलिबाग
दि.२०-११-१९३५

३)श्री.मधुकर दत्तात्रेय थळकर
मु.नवगाव, ता.अलिबाग

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

कुंभेत साकारणार 'प्रतिमहाबळेश्वर'

● आल्हाददायक अनुभूती देण्याची क्षमता उंच डोंगररांगा, निसर्गरम्य परिसर

। माणगाव । प्रतिनिधी ।

कोकण म्हटले की डोळ्यांसमोर उभे राहते अथांग निळाशार समुद्र, नारळी-पोफळीच्या बागा, हिरव्यागार डोंगररांगा, धबधबे, ऐतिहासिक किल्ले आणि माणुसकी जपणारी साधी, प्रेमळ माणसे! निसर्गाने कोकणाला भरभरून दिले आहे. मात्र एवढे अफाट नैसर्गिक वैभव लाभूनही कोकण पर्यटनाच्या विकासात अपेक्षित उंची गाठू शकलेले नाही, ही खंत मनाला अस्वस्थ करणारी आहे. योग्य नियोजन आणि दूरदृष्टीच्या बळावर याच निसर्गसंपत्तीचे रूपांतर मोठ्या आर्थिक सामर्थ्यात होऊ शकते.

कोकणातील प्रत्येक गावात पर्यटनाची संधी दडलेली आहे.



शहरातील धावपळीपासून दूर काही दिवस गावात घालविण्याची अनेकांची इच्छा असते. स्वच्छ निवास व्यवस्था, घरगुती कोकणी जेवण, आंबा-काजूच्या बागा, फणस, कोकम, नारळ आणि ग्रामीण संस्कृतीचा अनुभव उपलब्ध करून दिल्यास कृषी पर्यटनाला मोठी चालना मिळू शकते. यातून शेतकरी, महिला बचतगट आणि तरुणांना गावातच रोजगार मिळेल.

कालबद्ध कृती आराखडा राबवावा

पर्यटनस्थळांवरील वाहतूक कोंडी, अपुरी पार्किंग व्यवस्था, अस्वच्छता आणि मूलभूत सुविधांचा अभाव दूर करण्यासाठी शासन, पर्यटन महामंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था आणि लोकप्रतिनिधींनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक पर्यटनस्थळासाठी निधी, जबाबदार यंत्रणा आणि निश्चित कालमर्यादा ठरविली पाहिजे.

मुंबई-पुण्याकडे नोकरीसाठी होणारे स्थलांतरही कमी होण्यास मदत होईल. महाबळेश्वरप्रमाणेच थंड आणि आल्हाददायक वातावरणाची अनुभूती देण्याची क्षमता माणगाव तालुक्यातील कुंभे परिसरात आहे. उंच डोंगररांगा, निसर्गरम्य परिसर, धरणाचा जलसाठा आणि बोगद्यामुळे उपलब्ध झालेली दळणवळणाची सुविधा या भागासाठी जमेच्या बाजू आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने या परिसराचा पर्यटन विकास आराखडा तयार करावा. पर्यावरणाचे संवर्धन करून निवास व्यवस्था, सुरक्षित नौकाविहार, निसर्गभ्रमंती आणि स्थानिक खाद्य संस्कृतीला प्रोत्साहन दिल्यास कुंभे हे कोकणातील आकर्षक पर्यटन केंद्र बनू शकते. स्थानिक ग्रामस्थांना होमस्टे आणि पर्यटन व्यवसायासाठी प्रशिक्षण व आर्थिक मदत दिल्यास रोजगाराची नवी दारे खुली होतील.

भिलजीमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा चॅरीटेबल फाऊंडेशन शाखा भिलजी यांच्या वतीने रविवार (दि.२९) नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत भिलजी येथील संत निरंकारी भवन येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. संत निरंकारी मंडळामध्ये रक्तदान शिबिराची शृंखला २३ ऑक्टोबर १९८६ पासून सुरू झाली असून दरवर्षी २४ एप्रिल रोजी मानव एकता दिवस या दिवसापासून संपूर्ण विश्वात रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते, याच अनुषंगाने अलिबाग तालुक्यातील भिलजी शाखा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. संत निरंकारी मंडळाचा रक्तदानाचा हा सामाजिक पैलू मनुष्यमात्राच्या मनामध्ये मानवतावादी भावनांना उद्योन्मुख करत आहे. तरी रक्तदान शिबिरासाठी जास्तीत जास्त रक्तदात्यांनी उपस्थित राहून रक्तदान या महान मानवी कार्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन संत निरंकारी मंडळाचे भिलजी शाखेचे सुरेश गावंड यांनी केले आहे.

विमा तक्रारींना न्यायाचा आधार

। मुंबई । प्रतिनिधी ।

विमा कंपन्यांकडून पॉलिसीधारकांना येणाऱ्या अडचणी आणि तक्रारींचे जलद व निष्पक्ष निराकरण व्हावे, तसेच विमा क्षेत्रावरील जनतेचा विश्वास अधिक दृढ व्हावा, या उद्देशाने मुंबईत बुधवारी (दि.१८) 'इन्शुरन्स ओम्बुड्समन दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. अंधेरी (पूर्व) येथील विशाल हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात विमा कंपन्यांचे प्रतिनिधी, नोडल अधिकारी, पॉलिसीधारक आणि तक्रारदार सहभागी झाले होते. कार्यक्रमाला आयआरडीएआयचे माजी सदस्य (जीवन विमा) निलेश भास्कर साठे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. जीवन विमा परिषदेचे महासचिव आदित्य गुप्ता आणि जीआय परिषदेच्या महासचिव कस्तुरी सेनगुप्ता यांनी सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थिती दर्शवली.

मुंबई केंद्राच्या विमा लोकपाल सरोजिनी डीखले यांनी उपस्थितांना शुभेच्छा देताना, विमा लोकपाल दिन हा पॉलिसीधारकांप्रती असलेल्या बांधिलकीचा पुनरुच्चार असल्याचे सांगितले. प्रत्येक पॉलिसीधारकाची तक्रार निष्पक्षपणे ऐकून सामान्य नागरिकाला सहज न्याय मिळवून देणे, ही लोकपाल संस्थेची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रमुख पाहुणे निलेश साठे यांनी विमा विवादांचे पारदर्शक, जलद आणि निष्पक्ष निराकरण करण्यावर भर दिला. विमा तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी विमा कंपन्या आणि संबंधित सर्व घटकांनी सामूहिक जबाबदारी पार पाडणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. विमा कंपन्यांच्या प्रतिनिधींनीही विमा क्षेत्रावरील ग्राहकांचा विश्वास वाढवण्यासाठी आणि लोकपाल संस्थेची प्रतिष्ठा उंचावण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. सकारात्मकवातावरणातकार्यक्रमाची सांगता झाली.

■ मुंबईत विमा लोकपाल दिन उत्साहात

शिवाजीराव देशमुख यांचे निधन

। पाली । प्रतिनिधी ।

ज्येष्ठ व्यावसायिक शिवाजीराव दत्तात्रय देशमुख यांचे शनिवारी (दि.१४) नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने रुग्णालयात निधन झाले. मिलिंद देशमुख यांचे ते वडील होत.



१५ नोव्हेंबर रोजी त्यांचे मूळ गाव तिवरे येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी सुलोचना, मुलगा मिलिंद, मुलगी, सून, भाऊ आणि नातवंडे असा परिवार आहे. दशक्रिया विधी सोमवार, २३ नोव्हेंबर रोजी उद्धर येथे तर उत्तरकार्य गुरुवार, २६ नोव्हेंबर राहते घर, तिवरे येथे होणार असल्याचे त्यांच्या कुटुंबियांनी सांगितले आहे.

आंतरविद्यापीठीय युवक महोत्सव इंद्रधनुष्यचे उद्घाटन



। नाशिक। प्रतिनिधी ।

सध्याच्या तरुण पिढीने आपल्याला आवडते काय यापेक्षा आपल्याला येते काय व जमते काय याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने छंदाचे रुपांतर व्यवसायात झाले तर ती भाग्याची सर्वोत्तम गोष्ट होईल. पण त्यासाठी सर्वप्रथम आपले स्वत:चे शिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहेफ असे प्रतिपादन अभिनेता प्रशांत दामले यांनी येथे केले.

१९ ते २३ नोव्हेंबर २०२६ दरम्यान हा युवा सांस्कृतिक महाकुंभ होत आहे. त्यात महाराष्ट्रातील २७ विद्यापीठांचे ४८६ विद्यार्थिनी, ६३७ विद्यार्थी मिळून ११२३ व संघव्यवस्थापकसह जवळपास १२५० जण सहभागी झालेले आहेत.

याप्रसंगी नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, कुलगुरू डॉ. व्यंकट गीते, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, डॉ. विलास पाध्ये, डॉ. विकास देसाई, विलास शिंदे, कुलसचिव प्रा. सुरेंद्र पाटोळे, गोविंद कतलाकुटे, भटूप्रसाद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती

■ मुक्त विद्यापीठात १२५० विद्यार्थ्यांचा सहभाग

'स्वच्छ सुंदर पाली' अभियान

। पाली । प्रतिनिधी ।

'स्वच्छ भारत अभियान' प्रेरणे पाली नगरपंचायतीच्या वतीने 'स्वच्छ आणि सुंदर पाली' या विशेष अभियानाचा उत्साहात करण्यात आला. ऐतिहासिक बल्लाळेश्वर मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ आयोजित या कार्यक्रमात पालीचे नगराध्यक्ष पराग मेहता, सुलतान बेनसेकर, मुख्याधिकारी किशोर जेठे, सुधीर भालेराव, सुधाकर मोरे यांनी या अभियानाचा शुभारंभ केला.

यावेळी संदीप दपके, प्रणाली शेठ यांच्यासह नगरपंचायतीचे सर्व पदाधिकारी, नगरसेवक आणि कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. आगामी दोन ते तीन महिने पाली शहरात विविध जनजागृतीपर उपक्रम राबवून लोकसहभागातून शहर स्वच्छ आणि हरित ठेवण्याचा विडा नगरपंचायतीने उचलला आहे.

शहरात जनजागृती निर्माण करण्यासाठी विद्यार्थी, व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांच्या सहभागातून विशेष उपक्रम राबवले जाणार असून, स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी सायकल मॅरेथॉनचे आयोजनही करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

चिपळूणमध्ये ब्लॅक पँथरला जीवनदान

चिपळूण : उमरोली येथील भडवळकरवाडीमध्ये ४० फूट खोल विहिरीत पडलेल्या दुर्मीळ ब्लॅक पँथरला (काळा बिबट्या) चिपळूण वनविभागाच्या बचावपथकाने अथक प्रयत्नांनंतर सुखरूप बाहेर काढले. अंदाजे एक वर्ष वयाच्या मादी बिबट्याची वैद्यकीय तपासणी करून तिला पुन्हा नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकारी एस. एस. खान यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. विहीर सुमारे ४० फूट खोल असून, त्याला संरक्षक कठडा नव्हता. विहिरीतील एका दगडाचा आधार घेत बिबट्या बसला होता. बाहेर काढल्यानंतर हा अंदाजे एक वर्ष वयाचा मादी बिबट्या असल्याचे स्पष्ट झाले. त्याला चिपळूण येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयात नेऊन तपासणी करण्यात आली. प्रकृती सुस्थितीत असल्याची खात्री झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाने त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकारी एस. एस. खान, एस. एस. सावंत, कृष्णा इरमले, राहुल गुंठे, अजय बडदे, अथर्व घाग, नंदकुमार कदम शहेनशहा कलावंत यांनी मोहिमेत सहभाग घेतला.

पर्यटनस्थळे बहरलेलीच

पालघर : सहा महिन्यांपासून पालघरच्या समुद्रकिनाऱ्यांवरील पर्यटन व्यवसाय काहीसा थंडावला होता. मात्र, दिवाळी सणाच्या निमित्ताने हा मोठा खंड सरला असून, दिवाळीनंतर सरलेल्या आठवडा अखेरीसही जिल्ह्यातील पर्यटनस्थळे पर्यटकांनी तुडुंब भरून गेली होती. शुक्रवार, शनिवार आणि रविवार या सलग सुट्ट्यांमध्ये स्थानिक नागरिकांसह गुजरात आणि मुंबई उपनगरांतील पर्यटकांनी समुद्रकिनाऱ्यांवर मोठी गर्दी केल्याने किनाऱ्यांना तब्बल सहा महिन्यांनंतर पुन्हा एकदा बहर आला आहे.

तारापूरात हिरव्या रासायनिक पाण्याचे संकट

। बोईसर । प्रतिनिधी ।

तारापूर औद्योगिक वसाहतीतील जलप्रदूषणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. औद्योगिक क्षेत्रात गडद हिरव्या रंगाचे संशयास्पद पाणी साचल्याचे निदर्शनास आले आहे. नाल्यातील पाण्याचा बदललेला रंग आणि त्यामध्ये तरंगणारा कचरा पाहता औद्योगिक सांडपाण्याच्या व्यवस्थापनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असून, या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.



औद्योगिक क्षेत्रात शेकडो रासायनिक कारखाने कार्यरत असताना सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया करूनच त्याची विल्हेवाट लावणे अपेक्षित आहे. असे असतानाही खुल्या गटारांमध्ये संशयास्पद रंगाचे पाणी आढळून येत असल्याने सांडपाणी व्यवस्थापनाच्या यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अशा पाण्यामुळे माती, भूजल आणि परिसरातील पर्यावरणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे केवळ पाहणी करून औपचारिकता न करता दोषी आस्थापनेची निश्चिती करून नियमांचे उल्लंघन सिद्ध झाल्यास कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. औद्योगिक विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची हानी किती काळ सहन करायची, असा सवाल या घटनेच्या निमित्ताने पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे.

सर्दी-खोकल्यासह तापाच्या तक्रारीत वाढ | **नागरिकांची उपचारासाठी रुग्णालयांकडे धाव**

बदलत्या वातावरणामुळे साथीच्या आजारांचा विळखा

। विरार । प्रतिनिधी ।

वसई-विरार परिसरात गेल्या काही दिवसांपासून वातावरणात सातत्याने बदल जाणवत असून, त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होताना दिसत आहे. रात्रीच्या वेळी थंडी आणि गारवा जाणवत असताना सकाळनंतर उन्हाचा कडाका वाढत असून, दुपारच्या सुमारास उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे. रात्री आठ वाजल्यानंतर वातावरणात थंडावा जाणवण्यास सुरुवात होते, तर पहाटे नऊ वाजेपर्यंत थंडीचे वातावरण कायम असते. मात्र, त्यानंतर



उन्हाची तीव्रता वाढत असल्याने नागरिकांना दिवसभर बदलत्या हवामानाचा सामना करावा लागत आहे. थंडी आणि उष्णतेच्या या सततच्या बदलामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या तक्रारींमध्ये वाढ होत असल्याचे चित्र समोर येत आहे. परिसरात सध्या साथीच्या आजारांनी डोके वर काढले असून, सर्दी, खोकला, ताप, घसादुखी, डोकेदुखी, कंबरदुखी, अंगदुखी तसेच अर्धशिशीसारख्या त्रासाने अनेक नागरिक हैराण झाले आहेत. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आधीपासूनच आरोग्याच्या समस्या असलेल्या व्यक्तींना या वातावरणाचा अधिक त्रास जाणवत आहे.

अचानक ताप येणे, घशात खवखव होणे, सतत शिंका येणे, अंगात कणकण जाणवणे अशा तक्रारी घेऊन नागरिक उपचारासाठी रुग्णालयांकडे धाव घेत आहेत. परिसरातील सरकारी तसेच खासगी रुग्णालयांमध्ये बाह्यरुग्ण विभागात रुग्णांची गर्दी वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

विशेषतः सकाळी घराबाहेर पडताना थंडी जाणवत असल्याने नागरिक उबदार कपड्यांचा वापर करतात; मात्र दुपारच्या वेळी उन्हाचा कडाका वाढल्याने उकाड्याचा त्रास सहन करावा लागतो. कामानिमित्त घराबाहेर पडणारे नोकरदार, विद्यार्थी, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना या बदलाचा अधिक सामना करावा लागत आहे. वातावरणातील या अनिश्चिततेमुळे सर्दी-खोकल्यासह तापाच्या तक्रारी वाढत असल्याचे दिसून येत आहे.

वैद्यकीय सल्ला घेणे

बदलत्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आपल्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय क्षेत्रातून करण्यात येत आहे. रात्रीच्या वेळी थंडीपासून बचाव करण्यासाठी योग्य उबदार कपड्यांचा वापर करावा, पुरेसे आणि स्वच्छ पाणी प्यावे, वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष द्यावे तसेच थंड पदार्थांचे सेवन टाळावे, असा सल्ला दिला जात आहे.

निवडक



क्षयरोग रुग्णांना कोरड्या आहाराचे वाटप

कोर्लई, : क्षयरोगमुक्त भारत अभियानाला हातभार लावण्यासाठी मुरुड तालुक्यातील कोर्लई ग्रामपंचायतीच्या सरपंच राजश्री मिसाळ यांनी सामाजिक बांधिलकी जपत ५ क्षयरुग्णांना कोरड्या आहाराचे वाटप केले. बोर्ली-मांडला प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित या उपक्रमात क्षयरुग्णांना पोषण आहाराचे महत्त्व पटवून देत त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले. क्षयरुग्णांना उपचारांसोबतच योग्य पोषण आहार मिळणे आवश्यक असल्याने या उपक्रमाचे विशेष महत्त्व आहे. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अक्षयकुमार सोळंके, वरिष्ठ औषधोपचार पर्यवेक्षक संकेत घरत,समुदाय आरोग्य अधिकारी हरिश्चंद्र फड, आरोग्य सहाय्यक अमित करमेळे, परीक्षेत कोळी, अनिकेत हजारे,धर्मेंद्र पुगावकर, प्रवीण पाटील, संगीता कासकर व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

विठ्ठल रुक्मिणी मंदिर उजळणार

पाली/गोमाशी : विठ्ठल-रुक्मिणी मंदिर आनंद आश्रम फाऊंडेशन गोमाशी येथे शनिवार (दि.२१) नोव्हेंबर रोजी कार्तिकी एकादशी महोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा होणार आहे. या महोत्सवाची सुरुवात सकाळी ८ वाजता नांदगाव हायस्कूल ते विठ्ठल मंदिर अशी भव्य दिंडी सोहळ्याने होणार आहे. टाळ-मृदुंगाच्या गजरात निघणाऱ्या या दिंडीमध्ये भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.सायंकाळी मंदिर परिसरात ११०० दिव्यांचे प्रज्वलन करण्यात येणार असून, यावेळी संपूर्ण मंदिर परिसर दीपोत्सवाने उजळून निघणार आहे.या महोत्सवाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आनंद आश्रम फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.





'रायगड संदेश' दिवाळी अंकाचे प्रकाशन

उरण : शिक्षणमहर्षी नरसू पाटील यांच्या शुभहस्ते रायगड संदेशच्या सातव्या दिवाळी अंकाचे प्रकाशन उत्साहात करण्यात आले. रायगड संदेशच्या माध्यमातून गेल्या सात वर्षांपासून सातत्याने विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय विषयांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात आहे. दिवाळी अंक ही केवळ साहित्याची मेजवानी नसून समाजातील विचार, अनुभव, भावना आणि परिवर्तनाचे प्रतिबिंब असते. नवोदित लेखक, कवी आणि साहित्यिकांना आपले विचार मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच नव्या पिढीमध्ये वाचन आणि लेखनाची आवड निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे. शिक्षणमहर्षी नरसू पाटील यांच्या हस्ते झालेल्या या प्रकाशनामुळे रायगड संदेश परिवाराचा उत्साह द्विगुणित झाला. सात वर्षांच्या या प्रवासात वाचक, जाहिरातदार, लेखक, कवी, हितचिंतक आणि सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्यामुळेच हा टप्पा गाठता आला असल्याची भावना विशाल सावंत यांनी व्यक्त केली. याप्रसंगी आसिम शेख, आर पी आयचे युवा नेते अक्षय आहिरे आदीसह मान्यवर उपस्थित होते



तोगरे दापत्यांतर्फे औषधेदान

चिरनेर : परकीयांच्या गुलामगिरीत अडकलेल्या भारतीयांमध्ये स्वातंत्र्याची चेतना जागवणारे, सशस्त्र क्रांतीचे जनक, सत्यशोधक चळवळीचे संरक्षक आणि जनजागृतीची ज्योत पेटवणारे आद्य क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या २३२ व्या जयंतीनिमित्त उरण येथील संग्राम तोगरे व सुमन तोगरे यांनी सामाजिक बांधिलकी जपत प्राथमिक आरोग्य केंद्र, रेवदंडा ता. अलिबाग येथे ३०३ प्रकारची, एकूण १ लाख ३५ हजार रुपये किमतीची औषधे दान केली. या उपक्रमातून त्यांनी क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांना अनोख्या पद्धतीने अभिवादन केले. कार्यक्रमास डॉ. आशिष धरणकर, डॉ. अमित पठारे, कर्मचारी राजेंद्र रूईकर, राम तुळशीराम म्हात्रे, ऐश्वर्या आगावकर, मनाली दिवकर, सुरेश भोईर उपस्थित होते.



मिरचूलवाडीत ड्रम वाटप

नेरळ : कर्जत तालुक्यातील मिरचुलवाडी येथील आदिवासी महिलांना पाणी डोक्यावर हांडे भरून वाहून न्यावे लागत आहे. आदिवासी महिलांची हि अडचण लक्षात घेऊन आणि महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरविण्यासाठी वेल्स ऑन व्हील्स संस्थेचा पुढाकार घेतला आहे. मिरचूलवाडी मधील तब्बल ५१ कुटुंबांसाठी हाताने ओढता येतील असे ड्रम वाटप केले. याप्रसंगी संस्थेचे नारायण गभाले, संकेत बिडगर, संकेत धेनक, अविनाश चौधरी, मुंजा कारके, अजित मोरे तसेच गावातील वसंत ढोले , हरि ढोले, हरिचंद्र पारधी, भगवान ढोले, गणेश पारधी आदी उपस्थितीत पाणी नेण्याचे ड्रम भेट देण्यात आले.

निवडक



फिरता दवाखान्यातून आरोग्य शिबीर

पाली : 'लाईफ ऑफ लाईफ ट्रस्ट' आणि 'लँडमार्क केअर्स' यांच्या सौजन्याने तसेच फिरता दवाखाना युनिटच्या सहकार्याने सुधागड तालुक्यातील दुर्गम अशा गौळमाळ गावात मजागतिक मधुमेह दिनानिमित्त विशेष आरोग्य जनजागृती शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य सुविधा पोहोचवणे आणि मधुमेह निवाराणाबाबत योग्य व शास्त्रीय माहिती देणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. या शिबिराचा गौळमाळ गावातील ५२ ग्रामस्थांनी प्रत्यक्ष लाभ घेतला. ग्रामीण भागात अशा उपक्रमांमुळे मधुमेह व इतर असंसर्गजन्य आजारांबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. दृकश्राव्य माध्यमातून ग्रामस्थांना मधुमेहाचे प्रकार, प्राथमिक लक्षणे, आहारातील आवश्यक बदल, नियमित तपासण्या, योग्य औषधोपचार आणि वेळीच काळजी न घेतल्यास होणारे दुष्परिणाम यावर सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋतुजा रमाकांत शिंदे, मानसी शिवडावकर, औषधीतज्ज्ञ मुस्कान गुप्ता, प्रियंका शिद मेहनत घेतली.



महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन

नवीन पनवेल : इंडाल्को इंडस्ट्रीज लिमिटेड, तळोजा यांच्या सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत जागृती महिला मंडळ, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी पाड्यातील गरीब व गरजू कुटुंबांसाठी अन्नधान्य किट वाटप आणि कायदेशीर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला गावातील महिला व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे आणि बालविवाहमुक्त समाज निर्माण करण्यासाठी महिलांना एकत्र आणणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमात उपस्थित आदिवासी महिला व कुटुंबांना अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. तसेच महिलांचे हक्क, अधिकार, कायदेशीर संरक्षण, महिलांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय सुविधा आणि बालविवाह प्रतिबंधक कायदा याविषयी ॲड. संतोषी कल्पेश चव्हाण यांनी कायदेशीर मार्गदर्शन केले. यावेळी ॲड. संतोषी चव्हाण यांनी महिलांना आत्मविश्वासाने जगण्याचे आवाहन केले. महिला या केवळ कुटुंबाचा आधार नसून त्या समाजाच्या परिवर्तनाची शक्ती आहेत. स्वतःच्या हक्कांची जाणीव ठेवा, अन्याय सहन करू नका आणि आपल्या मुला-मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य द्या, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी बालविवाहाच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करण्यात आली. मुलींचे लग्न वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी करणार नाही, असा निर्धार सर्व महिलांकडून सामूहिकरीत्या करून घेण्यात आला.

'शिवाश्रम'चा निराधार आधार

पनवेल : आयुष्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक आधार हरवलेल्या, बेघर आणि निराधार ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित निवारा मिळावा आणि उर्वरित आयुष्य सन्मानाने जगता यावे, यासाठी पनवेल येथील भार्गवी शंकर चॅरिटेबल ट्रस्टच्या 'शिवाश्रम'कडून सेवाकार्य सुरू आहे. केवळ निवारा देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्या राहण्याची, देखभालीची आणि आवश्यक मदतीची जबाबदारीही आश्रमाकडून स्वीकारली जात आहे. नुकतेच खारघर परिसरात झालेल्या अपघातात एक पाय गमावलेल्या ७५ वर्षीय मेनू रामदास कुमटेकर यांनाही शिवाश्रममध्ये आश्रय देण्यात आला आहे. आर्थिक अडचणी, कौटुंबिक आधाराचा अभाव किंवा अन्य कारणांमुळे अनेक ज्येष्ठ नागरिक निराधार होतात. अशा व्यक्तींना अन्न आणि निवाऱ्यासोबतच सुरक्षितता, आपुलकी आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. हीच गरज ओळखून शिवाश्रमकडून त्यांना आधार दिला जात आहे. 'मानव सेवा हीच माधव सेवा' या विचारातून मधुसूदन यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रस्टचे हे सेवाकार्य सुरू आहे. गरजू आणि निराधार व्यक्तींच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करण्याचा शिवाश्रमचा हा प्रयत्न समाजापुढे माणुसकीचा आदर्श ठेवणारा ठरत आहे.

कामोठ्यात आरोग्य शिबिराचे आयोजन

पनवेल : मावळा ब्रिगेड, मैत्री प्रतिष्ठान आणि एम.एस.पी. फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२२) नोव्हेंबर रोजी कामोठे येथे रक्तदान शिबीर आणि मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन स्वामी समर्थ मठ, सेक्टर ३४, कामोठे येथे करण्यात आले आहे. रक्तदान शिबिरात जे.जे. रुग्णालयाच्या रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तसंकलन करण्यात येणार आहे. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे. यासोबतच मेडिकव्हर रुग्णालयाच्या सहकार्याने रक्तदाब, रक्तातील साखर, ईसीजी, थायरॉईड, ऑक्सिजन पातळी, उंची, वजन आणि बीएमआय तपासणी करण्यात येणार आहे.या उपक्रमाचे आयोजन संदिप वावरे, लक्ष्मण कारंडे, महेंद्र हिरे, दिनेश निलख, योगेश निलख, राजेंद्र गडदे, गणेश शिंदे, सचिन शेंबडे, संदिप नलावडे, नितेश वाझे यांनी केले आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८७८८०२१५१०
- नागाव येथील हॉटेलसाठी कर्मचारी भरती रिक्त पदे : १) नाईट शिफ्टसाठी पुरूष कर्मचारी २) रिसेप्शनिस्ट ३) किचन हेल्पर (महिला) ४) मोरी कामगार ५) कॅप्टन (रेस्टॉरंट) ६) वेटर ७) ऑलराऊंडर कुक (स्वयंपाकी) कामाचे ठिकाण : नागाव, अलिबाग इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. मो. ७५५९१८४६१२
- अलिबाग बिगस्प्लॅश हॉटेलमध्ये रिसेप्शनिस्ट, वेटर, कॅप्टन, हाउसकीपिंग या पदांसाठी उमेदवार पाहिजेत संपर्क : 8483999229

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

माणगावात दूषित पाण्याचा विळखा

खांदाडमध्ये कावीळचे चार रुग्ण; आरोग्य विभागाचे घराघरांत सर्वेक्षण सुरू

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणसाच्या जगण्याचा आधार असलेले पाणीच जर आजारांचे कारण ठरू लागले, तर सामान्य नागरिकांनी विश्वास ठेवायचा तरी कोणावर? माणगाव नगरपंचायत हद्दीतील मोर्बा रोड, खांदाड परिसरात काळसर, गढूळ आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठ्याच्या तक्रारींनी आता गंभीर स्वरूप धारण केले आहे. या परिसरातील चार नागरिकांना कावीळ झाल्याची पुष्टी झाल्याची माहिती समोर आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, तब्बल ३५ वर्षांपूर्वी माणगावमध्ये कावीळच्या साथीने तीन नागरिकांचा बळी घेतला होता. त्या कटू आठवणी पुन्हा ताज्या



झाल्याने माणगावकरांच्या मनात चिंतेचे सावट पसरले आहे. बुधवारी (दि.१८) नोव्हेंबर रोजी तालुका आरोग्य विभागाच्या पथकाने खांदाड परिसराची पाहणी केली. यावेळी नगरपंचायतीचे स्वच्छता निरीक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

परिसरातील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोग्य विभागाने घराघरांत सर्वेक्षण सुरू केले असून कावीळसदृश लक्षणे असलेल्या नागरिकांचे रक्त नमुने तपासणीसाठी संकलित केले आहेत.

मोर्बा रोड कॉर्नर ते जुनी गांधी राईस मिलपर्यंतच्या पावसाच्या पाण्याच्या गटारातूनच पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिन्या जात असल्याची बाब समोर आली आहे. काही इमारतींच्या सांडपाणी वाहिन्या जमिनीखालून याच गटारात जोडण्यात आल्या आहेत, तर काही ठिकाणी पाइपलाइनमधून आणि उघड्यावरून सांडपाणी वाहत आहे. कचरा व प्लास्टिकमुळे गटारे तुंबून सांडपाणी साचले आहे. अशा परिस्थितीत जलवाहिन्यांना गळती असल्यास दूषित पाणी त्यात मिसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जलवाहिन्यांची तातडीने तांत्रिक तपासणी होणे गरजेचे आहे.

काळ नदीतील पाणी बायपासच्या कामामुळे गढूळ झाल्याचे तसेच मुसळधार पावसामुळे डोंगरातील माती व गाळ नदीत मिसळत असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे नदीतील पाणी, जलशुद्धीकरण प्रक्रिया आणि निवासी भागातील जलवाहिन्यांची स्वतंत्र तपासणी आवश्यक आहे.

> **"आरोग्य विभागाची वैद्यकीय पथके घराघरांत जाऊन सर्वेक्षण करीत आहेत. नगरपंचायतीनेही पाण्याचे नमुने तपासणीसाठी अलिबाग येथे पाठविले असून प्रभावित प्रभागांत रिक्षाद्वारे दवंडी देण्यात येत आहे. नागरिकांनी पाणी उकळून, थंड करून व गाळून वापरावे, असे आवाहन करण्यात आले आहे."**
>
> **– श्रीमती पुरी**
> **तालुका आरोग्य विभागाच्या प्रमुख**

आता नगरपंचायतीच्या प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. जलवाहिन्यांची तपासणी, गटारांची स्वच्छता, सांडपाणी जोडण्यांवर कारवाई आणि सुरक्षित पाणीपुरवठा यासाठी तातडीने ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.

माणगावकरांना आश्वासनांचे पाणी नको, नळातून स्वच्छ पाणी हवे तसेच ३५ वर्षांपूर्वीच्या कावीळ साथीची पुनरावृत्ती होऊ नये, एवढीच सामान्य नागरिकांची अपेक्षा आहे. नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्यानंतर जागे होण्यापेक्षा संकट येण्यापूर्वीच प्रशासनाने जबाबदारी पार पाडावी, हीच माणगावकरांची आर्त मागणी आहे.

माथेरानमध्ये पर्यटन हंगामात पाणी कपात

■ शारलोटमधील पाणी राखीव ठेवण्याचा निर्णय

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरात लागू असलेली पाणी कपात सोमवारपासून लागू होणार आहे. उल्हास नदीवरून पाणी उपसा करण्याचे प्राधिकरणाचे आश्वासन दिले आहे. माथेरान नळपाणी योजनेची तीन कोटींची थकबाकी असून ती थकबाकी तत्काळ वसूल करण्याचा निर्णय झाला. मात्र, जे थकबाकी भरणार नाहीत त्यांची पाणी कनेक्शन कापण्याचा निर्णय घेण्यात आला. तर पावसाळ्यानंतर नेरळ येथून पाणी पुरवठा बंद आहे तो पाणी उपसा शुक्रवारपासून सुरू होणार आहे.

शारलोट लेकमधील पाणी राखीव ठेवण्याचे निर्णय ग्रामसभमध्ये ग्रामस्थांनी घेतला असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून या निर्णयाची अंमलबजावणी व्हावी अशी मागणी केली आहे. माथेरानमध्ये पाणी कपात करण्याचा महाराष्ट्र जीवन



प्राधिकरणांनी जाहीर केला.

यावेळी माथेरान शहरात पाणी कपात लावण्यात आली होती, ही पाणी कपात सोमवारपासून सुरू होईल परंतु त्यानंतर ख्रिसमस हंगामात कोणत्याही प्रकारची पाणी कपात लागू नसेल तसेच माथेरान शहरातील शारलोट लेकमधून पाणी उपसा करू नये आणि हे पाणी राखीव ठेवावे असा निर्णय एकमताने घेण्यात आला.

पावसाळा संपल्यापासून आजपर्यंत कुंभे येथील उल्हास नदीवरून उचलले जाणारे पाणी येत्या शुक्रवारपासून पुन्हा उचलले जाणार आहे. तर सोमवारपासून दिवसाआड पाणी कपात लागू केली जाणार आहे.

शुक्रवार, शनिवार आणि रविवारी कोणत्याही प्रकारची पाणी कपात माथेरानमध्ये लागू नसेल. तर ख्रिसमस मध्ये २० डिसेंबर ते २ जानेवारी या कालावधीत पर्यटन हंगाम असल्याने कोणत्याही प्रकारची पाणी कपात होणार नसल्याचे जाहीर केले.

> स्टँड बाय दोन दोन पंप सेट तेथे उपलब्ध करून ठेवण्याची गरज आहे. प्राधिकरणाचा अंदाधुंद कारभार असून हॉटेल लाइनसाठी पाणी द्यायचे आहे. गावातील लोकांना दररोज पाणी हवे असेल तर मग स्वतंत्र पाईप लाइन टाकून घ्यावी लागेल.
>
> **– जनार्दन पार्टे**

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, सीताराम कुंभार, राजेश चौधरी, कुलदीप जाधव, कल्पना पाटील, गिरीश पवार, सुभाष भोसले, सुनील शिंदे, रिझवाना शेख, प्रकाश सुतार, जनार्दन पार्टे, बाबू सुतार, सागर पाटील राजकीय पक्षांचे प्रमुख आदीसह नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.



उरणमध्ये कवीभवन उभारण्याची मागणी

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यात प्रत्येक महिन्याच्या १७ तारखेला उरण कोकण मराठी साहित्य परिषद मधुबन कट्टातर्फे कविसंमेलन भरविण्यात येते. विकास पुरो यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले होते. यावेळी उरणमध्ये कवीभवन निर्माण करण्यात यावे अशी मागणी बल्लाळ वैशंपायन यांनी मागणी केली. याप्रसंगी प्रा. एल. बी. पाटील, नाशिकेत म्हात्रे, भुवन पाटील, सुरेश शिंदे, राम पाटील, मीना बिष्ट, अरविंद म्हात्रे, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी जनार्दन म्हात्रे, नरेश ठाकूर, दत्ताराम निळवर्ण, अशोक जाधव आदींनी आपले विचार मांडले. तर कविसंमेलनात रमण पंडित, संजीव पाटील, हेमंत पाटील, सुरेश मिस्त्री, रामचंद्र म्हात्रे, दौलत पाटील, म. का. म्हात्रे, भालचंद्र म्हात्रे, संग्राम तोगरे, प्रा. एल. बी. पाटील आदींं कवींनी कविता सादर केल्या.



ऐतिहासिक शाळेतील लाकडाचा भंगार प्रवास

। उरण । प्रतिनिधी ।

शाळा शिकवते संस्काराचे धडे, पण करंजाच्या शंभर वर्षांच्या ऐतिहासिक शाळेतून सागवानी लाकूडच बाहेर नेले जात असेल, तर या कारभाराला म्हणायचे तरी काय? देशाचे माजी पंतप्रधान स्वर्गीय मोरारजी देसाई यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या करंजा येथील मराठी शाळेतील शंभर वर्षे जुन्या सागवानी लाकडाच्या कड्या ठेकेदाराने बाबू लकडावाला या भंगार व्यावसायिकाकडे नेल्याचा धक्कादायक प्रकार जागृत ग्रामस्थांनी उघडकीस आणला आहे. यामध्ये विपुल व प्रणीत यांनी ही सहकार्य केल्याची कबुली भंगारवाल्यानी दिली. ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे मौल्यवान साहित्य पुन्हा शाळेच्या आवारात आणावे लागले. अन्यथा ऐतिहासिक वारशाची ही संपत्ती भंगाराच्या बाजारात कायमची गायब झाली असती.

करंजा येथील ही शाळा म्हणजे गावाच्या इतिहासाची साक्ष देणारी वास्तू दगडी भिंती, सागवानी लाकडाच्या कड्या आणि कौलारू छत अशी तिची देखणी बांधणी होती. मात्र, छत गळत असल्याचे कारण पुढे करून शासकीय निधीतून दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले. कौलारू छत काढून त्यावर सिमेंट पत्रे बसविण्यात आले. त्यामुळे वास्तूचे मूळ सौंदर्यच नष्ट झाले.

शंभर वर्षांपासून छताला आधार देणाऱ्या मौल्यवान सागवानी कड्यांची परवानगीविना उचल करण्यात आल्याचा प्रकार समोर आला. सागवानी लाकूड भंगाराच्या दारात पोहोचले असता याची विक्री करताना कायदेशीर बाबी पूर्ण करूनच विक्रीचा व्यवसाय करणे बंधनकारक असताना हा बेकायदेशीर विक्रीचा व्यवहार झाल्याचे उघड होत आहे. संबंधित ठेकेदार, साहित्य नेण्यास मदत करणारे व्यक्ती, भंगारवाला आणि या व्यवहाराला परवानगी देणाऱ्यांची चौकशी झालीच पाहिजे अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

शेतकऱ्यांची भाजीपाला रोपांना मागणी

। माणगाव । प्रतिनिधी ।

पावसाने लवकरच घेतलेली माघार, जमिनीतील कमी झालेला ओलाव्यामुळे रब्बी हंगामातील कडधान्य पिकांच्या पेरणीवरही त्याचा परिणाम होत असताना भाजीपाला लागवडीसाठी माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी तयार रोपवाटिकांचा पर्याय स्वीकारला आहे. बियाण्यांची पेरणी करून रोपे तयार करण्याऐवजी थेट २० ते ३० दिवसांची तयार रोपे खरेदी करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला असून रोपवाटिकांमध्ये वांगी, टोमॅटो, मिरची यांसह विविध भाजीपाला रोपांना मोठी मागणी निर्माण झाली आहे.

तालुक्यात रब्बी हंगामात कडधान्य शेतीबरोबरच भाजीपाला लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. यंदा गणेशोत्सवानंतर पावसाचे प्रमाण कमी झाल्याने शेतजमिनीतील ओलावा झपाट्याने घटला आहे. त्यामुळे कडधान्य पिकांच्या पेरणीवर परिणाम होत असून भाजीपाला लागवडीचे नियोजनही शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक बनले आहे. कोरड्या जमिनीत थेट बियाणे पेरल्यास त्याच्या उगवणीसाठी आवश्यक ओलावा मिळण्याची शाश्वती नसते.

परिणामी बियाणे वाया जाण्याची आणि लागवडीचा कालावधी लांबण्याची शक्यता असते. या परिस्थितीत तयार रोपांचा पर्याय शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरत आहे. रोपवाटिकांमध्ये साधारण दोन रुपयांना एक रोप उपलब्ध होत असून २० ते ३० दिवसांची वाढ झालेली रोपे थेट शेतात लावता येत आहेत.

वांगी, टोमॅटो, मिरची, झेंडू आदी रोपांना विशेष मागणी आहे. तयार रोपांच्या लागवडीमुळे बियाणे रुजविण्याचा सुरुवातीचा कालावधी वाचत असून भाजीपाला उत्पादन लवकर सुरू होण्यास मदत होत आहे. पावसाच्या लहरीपणामुळे शेतीचे नियोजन बदलत असताना उपलब्ध पर्यायांचा वापर करून उत्पादन टिकविण्याचा प्रयत्न तालुक्यातील शेतकरी करीत आहेत.

राजनाला कालव्यात पाणी सोडण्याची मागणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्याचा पूर्व भाग हिरवागार करणाऱ्या राजनाला कालव्याची दुरुस्तीची कामे संपत आली आहेत. त्यामुळे दुबार शेतीसाठी लवकरात लवकर पाणी सोडण्यात यावे अशी मागणी करणारे निवेदन शिवसेना ठाकरे पक्षाचे वतीने कर्जत जलसंपदा विभागाला देण्यात आले.

शिवसेना उबाठा पक्षाने कर्जत जलसंपदा विभागाला दिलेल्या निवेदनात यावर्षी कर्जत तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी तसेच पिकांच्या सिंचनासाठी पाण्याची मोठ्या प्रमाणात आवश्यकता भासत आहे. राजनाला कालव्याच्या



डाव्या व उजव्या कालव्यांमधून पाणी सोडण्याचे नियोजन डिसेंबर महिन्यात करण्यात येणार असल्याचे समजते.

सध्याची परिस्थिती पाहता डिसेंबर महिन्यापर्यंत प्रतीक्षा करणे शेतकऱ्यांसाठी अडचणीचे ठरू शकते. पाणी वेळेत उपलब्ध न झाल्यास शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता आहे. सतत दोन वर्षे भाताच्या शेतीचे तालुक्यात नुकसान होत आहे.त्यामुळे शेतकर्यांना दिलासा देण्यासाठी जलसंपदा विभागाने तातडीने राजनाला कालव्यात पाणी सोडण्याची कार्यवाही करावी अशी मागणी केली आहे. याप्रसंगी बाजीराव दळवी, माधव कोळंबे, रामदास घरत, सुरेश बोराडे आदींसह शेतकरी उपस्थित होते.

विशेष लोक अदालतीचे आयोजन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्ह्यातील हजारो प्रकरणे सामंस्याने निकाली काढण्यासाठी शनिवार, (दि.२१) नोव्हेंबर रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष लोकअदालत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग एस. बी. अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. या विशेष लोकअदालतीत पक्षकारांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग रेवती म. कटे यांनी केले आहे.

ऑनलाईन कामांचा होतोय खोळंबा | **मोबाईल टॉवर उभारण्याची मागणी**

घूम पंचक्रोशी परिसर नेटवर्कपासून वंचित

। म्हसळा । प्रतिनिधी ।

सध्या सगळे जग ऑनलाईन झाले असताना रायगड जिल्ह्यामधील म्हसळा तालुक्यातील घुम गाव व पंचक्रोशी परिसर मात्र अजूनही मोबाईल नेटवर्कपासून वंचित आहे. या परिसरात घुम, रुद्रवट, कोकबल, ठाकरोली, सांगवड, कृष्णनगर, कोलवट, भापट, रातीवणे, ताम्हणे करंबे, नेवरूळ, सकलप कोंड, अशी गावे आहेत. या गावंमध्ये अंदाजे पंधराशे पेक्षा अधिक कुटुंबे राहतात, तरी देखील गावात कोणत्याही कंपनीचे नेटवर्क व्यवस्थित मिळत



नाही. त्यामुळे घुम गावासाह या आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थांना रोजच्या जीवनात खूप मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सणासुदीला किंवा सुट्टी असेल तर मुंबईला राहणारे नोकरदार वर्ग गावी आले तर त्यांना एखादे वर्क फ्रॉम होम संबंधित कामे करायची असतील तर ती कामे देखील होत नाहीत परिणामी त्यांना नाराज होऊन पुन्हा कामासाठी मुंबई गाठावी लागत आहे.

तरुण वर्ग त्रस्त

गावातील तरुण वर्गाला याचा सर्वात जास्त फटका बसत आहे. नोकरीसाठी ऑनलाईन अर्ज करणे, ऑनलाईन परीक्षा देणे, शिक्षणासाठी ऑनलाईन अभ्यास करणे, शासकीय योजनांची माहिती घेणे ही सर्व कामे मोबाईलवरच करावी लागतात. पण नेटवर्क नसल्यामुळे तरुणांना गाव सोडून तालुक्याच्या ठिकाणी किंवा दुसऱ्या गावात जावे लागते. त्यामुळे वेळ आणि पैसा दोन्ही वाया जातो.

ऑनलाईन कमांमध्ये अडसर

शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत यांची सर्व कामे आता ऑनलाईन झाली आहेत. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन रेकॉर्ड, हजेरी, अंगणवाडीचे अहवाल, ग्रामपंचायतीचे ऑनलाईन कामकाज, दाखले, शासकीय योजनांचे फॉर्म हे सर्व मोबाईल नेटवर्कशिवाय होऊ शकत नाहीत. परिसरातील शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक, ग्रामरोजगार सेवक, आशासेविका, बचत गटाच्या महिला सीआरपी, तलाठी अशा सर्वच शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांना काम करण्यासाठी रोजच संघर्ष करावा लागत आहे.

गावात नेटवर्क नसल्यामुळे मोबाईलवर बोलणे देखील मुश्किल झाले आहे. फोन लावायचा असेल तर गावाबाहेर, डोंगरावर, उंच ठिकाणी जावे लागते. अनेक वेळा महत्त्वाचा फोन लागत नाही, त्यामुळे अनेक कामे अडकून पडतात.

श्रीवर्धनमध्ये सेनेची घोषणाबाजी

पनवेल : हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडल्याच्या निंदनीय घटनेविरोधात श्रीवर्धन येथे शिवसेनेच्या (उबाठा) वतीने शायना एन.सी.यांचा तीव्र निषेध करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत आपला संताप व्यक्त केला. बुधवारी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेदरम्यान हा प्रकार घडला होता.या पत्रकार परिषदेदरम्यान प्रवक्त्या शायना एन. सी. यांच्या हातून शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडण्यात आला. या घटनेचे पडसाद राज्यभरात उमटले असून त्यावरून मोठा राजकीय वाद निर्माण झाला आहे.

जाहीर नोटीस

आमच्या अशिलांनी सांगितल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे नेवाळी तर्फे वासरे ता. कर्जत जि. रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहेत.

मौजे नेवाळी तर्फे वासरे तालुका कर्जत जिल्हा रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा.नं.	क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी)	आकार (रू. पै.)
१२	८	०-०६-१०	०.७०
१२	९	०-०७-१०	०.६०

वर वर्णन केलेल्या मिळकती आमच्या अशिलाच्या ताबेकब्जातील व वहिवाटी खालील जमिन मिळकती आहेत. सदरची मिळकतीचा विक्री व्यवहार करायचा आहे. वरील वर्णन केलेल्या मिळकती अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण कुळ वारस इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण
दिनांक : २०/११/२०२६

ॲड. पराग मनोहर सावंत
राज लक्ष्मी कर्जत कोर्ट जवळ
ता कर्जत जि. रायगड ४१०२०१
९८३३४४५५३३

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत श्री श्रीराम दाजी राणे, रा. मातृकृपा अपार्टमेंट, शिंदेवाडी, कोल्हारे रोड, गंगानगर, मु. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे आंभेरपाडा, तालुका कर्जत, जिल्हा रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकार (रू. पैसे)
८१	२	०-६१-००	०=३६

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तकारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. २०/११/२०२६

ॲड. कैलास गणपत मोरे
बी.एल.एस, एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं. ४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता. कर्जत जि. रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत श्री कुसुम ललीतकुमार जैन, रा. बी/५२, ग्रीन पार्क बिल्डींग, अगाशी रोड, श्रीपाल कॉम्पलेक्स, विरार वेस्ट, ठाणे - ४०९२०५ यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे दहिवली तर्फे नीड, तालुका कर्जत, जिल्हा रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकार (रू. पैसे)
१२५	१२	५-६०-००	११=००

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तकारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. २०/११/२०२६

ॲड. कैलास गणपत मोरे
बी.एल.एस, एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं. ४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता. कर्जत जि. रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रविण गोपिनाथ रुईकर, रा. पाल्हे ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून विकत घेणेचे ठरलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

-: मिळकतीचे वर्णन :-

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रू. पैसे)
पाल्हे, ता. अलिबाग	७१/१/ब	०-३०-००	७.९५

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. १९-११-२०२६.

सही/-
ॲड. आर. बी. कोसमकर
चिरायु, ब्राम्हण आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

दिनांक : २० नोव्हेंबर २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे - धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार	
			हे.आर.पॉ.	रुपये	पैसे
१) प्रकाश कृष्णा नाईक २) संतोष उंदिर पाटील	२४	२/ब	०-४२-००	०	४०

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
ॲड. भुपेश तानाजी पेमारे
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :- २०/११/२०२६

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ सदरी नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाही व्यक्ती, संस्था, कंपनी यांचे हक्क, अधिकार, गहाण, दान, बोजा अधिकार, तारण, बक्षीस, साठेकरार, खरेदीखत, कुलमुखत्यारपत्र या अगर इतर स्वरूपात हक्क व अधिकार असतील तर त्या व्यक्ती संस्था, कंपनी यांनी लेखी हरकती खालील नमुद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत वरील पत्त्यावर संपर्क साधुन नोंदवाव्यात.

मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास जमिन मालक आणि आमचे अशील व्यवहार पूर्ण करतील, मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

- मिळकतीचे परिशिष्ट -

मालकाचे नाव	गावाचे नाव	सर्व्हे नं	एकूण क्षेत्रफळ	आकारणी
श्री. रविंद्र राम पाटील	मौजे -आसलपाडा ता.कर्जत जि.रायगड	१६/६	०-१८-००	१.२७ रू. पै.

दि.२०/११/२०२६

ॲड.दामिनी अरूण बासरे उर्फ गायकर
(कार्यालयीन पत्ता- गणेश कृपा बिल्डींग,
रूम नं.२०१, गारपोली, पो.कोषाणे,
ता.कर्जत, जि.रायगड ४१०१०१)
मो.नं.९७६७६३६०५२

जाहिर नोटीस

तमाम लोकांना जनतेला या जाहिर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे आगरसुरे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीत या जाहीर नोटीसचा विषय आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नंबर	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
आगरसुरे, ता.अलिबाग, जि. रायगड	३३७/१	२-७५-००	२६.८७

वरील वर्णनाच्या मिळकती संदर्भात आमचे अशील सुबोध पुरुषोत्तम राऊत यांनी दिनांक ५.११.२०२६ रोजी जाहिर नोटीस प्रसिद्ध करुन दिनांक २८.१०.२०२६ रोजीच्या ॲड. रश्मी आर. शिंदे अलिबाग यांच्या मार्फतच्या टायटलच्या जाहिर नोटीसला हरकत घेतलेली होती. ती हरकत या जाहिर नोटीसद्वारे आमचे अशील सुबोध पुरुषोत्तम राऊत हे मागे घेत आहेत. तसेच आमचे अशिलांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. तमाम जनतेला माहिती होण्याकरिता सदरची नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे. येणेप्रमाणे जाहिर नोटीस आहे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १९.११.२०२६

सही/-
ॲड.अजय उपाध्ये
श्रीनिल सोसायटी, तळमजला,
श्री गणपतीचे देवळाजवळ, ब्राह्मण आळी,
अलिबाग रायगड. ९८५०५७०९७७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली स्थावर मालमत्ता/जागा माझे अशिल श्री.रमाकांत काशिनाथ तांडेल यांच्या मालकीची असून सदरची मालमत्ता/जागा विकण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मौजे थळ, ता.अलिबाग, येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ६०/२, यामध्ये एकूण क्षेत्र ०-१९-८० हे आर, आकार रु. ४.६९ पैकी, श्री. रमाकांत काशिनाथ तांडेल यांच्या नावे असलेले क्षेत्र ०-०३-४४ हे.आर. आकार रु. ०.८१ हि मिळकत.

वर नमूद मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट, ताबा, बयाणा पावती, रजिस्टर्ड अगर अनरजिस्टर्ड साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बोजा, बक्षीस, मृत्युपत्र, भाडेपट्टा, जप्ती, लीज, लियन, अन्नवस्त्र-पोटगी, वारसाहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत त्यासंबंधातील लेखी हरकत पुराव्यासह खाली नमूद पत्त्यावर कळवावी.

या नोटीसमध्ये नमूद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात न कळविल्यास सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजुन तसेच सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजुन आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक : १९/११/२०२६

ॲड.रुपिका विजय पाटील
बी.एल.एस.एल.एल.बी.
पत्ता : ॲकॉन्स क्लासिक, अलिबाग कोर्टच्या समोर, अलिबाग- रायगड
कॉल : ८२३७५३१४१४

जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येते की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी, मौजे श्रीगांव येथील, खालील वर्णनाची मिळकत आशिष कांतिलाल भुला आणि बेला आशिष भुला यांचे सामाईक मालकीची आणि दोघांचे नावे ७/१२ कडे असणारी जमिन मिळकत आहे.

गट/सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.-पै.)
२५६	२	१-३९-००	२-२७

आमचे अशिलांनी सदर जमिन मिळकत खरेदी करण्याबाबत विद्यमान मालकांबरोबर बोलणी चालू केली असून, सदर खरेदी व्यवहार ठरविण्यापूर्वी वर नमूद गट/सर्व्हे नंबर २५६/२ या मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची/बँकेची/पतसंस्थेची काही जडजोखीम असल्यास अगर कोणताही वाद असल्यास त्याची माहिती मिळवण्याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

तरी, मौजे श्रीगांव येथील गट/सर्व्हे नंबर २५६/२ या मिळकतीमध्ये वर नमूद मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही दान, गहाण, साठेकरार, वहिवाट, अग्रहक्क, रक्कमेचा बोजा, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व आमचे अशील ठरविणार असलेल्या व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार ठरवतील व पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सही/-
तारीख : १८/११/२०२६
ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग रायगड.
मोबाईल: ९२७०९६२९२९

श्री विठ्ठल देवस्थान ट्रस्ट, वरसोली ता. अलिबाग

कार्यालय यात्रा वरसोली, दि.२०-११-२०२६

जाहीर नोटीस

सर्वश्री श्रीविठ्ठल दर्शनेच्छुक व यात्राप्रेमी जनतेस कळविणेत येते की, सालाबादप्रमाणे मौजे वरसोली ता.अलिबाग, जि. रायगड येथील श्रीविठ्ठलाची यात्रा कार्तिक उत्पत्ती एकादशी शुक्रवार दि. ०४-१२-२०२६ ते कार्तिक अमावस्या मंगळवार दि. ०८-१२-२०२६ अखेर ५ दिवस भरणार आहे. यात्रेच्या निमित्ताने व्यापार उदीम करणारे दुकानदार, फेरीवाले, उसाचे चरक, हॉटेल व इतर सर्व धंदेवाले यांना कळविणेत येते की,

१) दि.२७-११-२०२६ यात्रेपूर्वी कमीत कमी ७ दिवस अगोदर जागा मिळणे संबंधीचे अर्ज ग्रामपंचायतीकडे/देवस्थानकडे दिले पाहिजेत, ज्यांचे अर्ज दिलेल्या मुदतीत येतील त्यांच्याच प्रामुख्याने विचार केला जाईल. चालू वर्षी कोणताही व्यवसाय सुरु करण्यापूर्वी ग्रामपंचायतीने व देवस्थान ट्रस्टने ठरविलेली कराची रक्कम भरुन लेखी पावती घेऊनच असा व्यवसाय सुरु करणेचा आहे.

२) देवस्थानाचे भाडे व ग्रामपंचायत वरसोलीचा कर यांचे देय दिल्याशिवाय धंदा सुरु केल्यास तो बंद करणेचा अगर त्यावर ५ पट कर आकारण्याचा पंचायतीचा व देवस्थान ट्रस्टचा अधिकार राहील. तसेच कोणत्याही दुकानदारास व धंदेवाल्यास दि. ०८-१२-२०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत यात्रा चालू असेपर्यंत दुकाने काढण्याची नाहीत.

३) कोणत्याही दुकान, हॉटेल मालकांनी अगर फेरीवाल्यांनी व इतर धंदेवाल्यांनी दि. ०३-१२-२०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत पंचायत व देवस्थान ट्रस्ट कराची रक्कम भरणा करुन दिलेल्या जागेवर स्वत:दुकाने मांडण्याची आहेत. जे इसम वेळेवर येणार नाहीत. त्याची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही. तसेच दिलेल्या जागेवर स्वत:च व्यवसाय करणेचा आहे, इतर तिऱ्हाईत इसमास जागा दिल्यास ग्रामपंचायत/देवस्थान ट्रस्ट दुकान बंद करणेचा किंवा ५ पट जादा कर आकारण्याचा व त्याबाबत वाद करण्याचा प्रयत्न केल्यास पोलीस कारवाई करण्याचा अधिकार ग्रामपंचायत/देवस्थान ट्रस्टचा आहे.

४) सार्वजनिक सुरक्षितेच्या दृष्टीने यात्रेच्या परिसरात यात्रेच्या मुदतीत फटाके, दारुकाम उडविण्यास व फुगे भरणाऱ्या गॅस व इतर कोणत्याही स्फोटक वस्तूंचा वापर करण्यास सक्त मनाई आहे.

५) ध्वनी प्रदूषण रात्रौ १०.०० या वेळेत दिलेल्या मर्यादेत ठेवण्याची आहे. त्याची मर्यादा ओलांडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर आहे.

६) हॉटेल व इतर व्यावसायिकांनी यात्रेत व्यवसाय करण्यापूर्वी किंवा नंतर रितसर परवाना व हॉटेल व्यवसायासाठी वापरात येणाऱ्या गॅस सिलेंडरचा वापर करण्याचा परवाना मा. तहसीलदार सो. अलिबाग यांचेकडून घेण्याचा आहे. सदर परवानाशिवाय यात्रेत त्याचा वापर करता येणार नाही. याची संबधितांनी नोंद घेणेची आहे.

७) यात्रेनिमित्त देवस्थान ट्रस्ट यांनी ठरविले दर याप्रमाणे आहेत.

१	मिठाईच्या एका तराजूच्या दुकानास	५५०/- रु.
२	उसाचे चरकास यांत्रिक चरक	६००/- रु. १०००/- रु.
३	हॉटेलवाले व भेळवाले १० फुटाच्या गाळ्याला	११००/-रु. व त्यापुढे.
४	रिंग स्टॉल रनिंग फूट	८०/-रु. फुट
५	कटलरी दुकानास जागा व धंद्याचे स्वरुप पाहून तसेच जादू करमणूक सिनेमा व इ. बाबतीत त्यांच्या कार्यक्रमांच्या जागेवर साहित्यावर व्यापार धंद्यावर तसेच मागील वर्षाची आकारणी लक्षात घेऊनच कर आकार करील.	१००/-रु. व त्यापुढे
६	वेणीवाली/हारवाले/गजरेवाले	११०/-रु.च्यापुढे
७	आईस्क्रीम हातगाडी/इतर हातगाडी	१७५/-रु.
८	पानगादी व इतर	१७५/-रु

८) यात्रेची संपूर्ण व्यवस्था, देखभाल व रचना व त्यातील सोयीनुसार फेरबदल, वैयक्तिक बाबी, जागा देणे श्रीविठ्ठल यात्रा व्यवस्थापन बघत असून व नाहरकत दाखले देण्याचे हक्क ग्रामपंचायतीकडे आहेत.

९)यात्रेच्या जागेत व आजूबाजूच्या परिसरात यात्रेच्या कालावधीमध्ये बॅनर व कटआऊट वै. लावण्यापूर्वी पंचायतीची व देवस्थान ट्रस्टची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच त्यांचा असणारा कर भरणेचा आहे. तशी परवानगी न घेता बॅनर, कटआऊट लावल्यास ते काढून घेतले जातात याची सर्वांनी नोंद घ्यावी.

टिप : यात्रा ५ दिवस भरणार आहे.

सही/-
प्रमुख विश्वस्त
श्री.रमेश भास्कर नाईक
श्रीविठ्ठल देवस्थान ट्रस्ट, वरसोली

जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री. नरेन वासुदेवराव जाधव रा. मधुमिलन पेण, खोपोली रोड, ता. पेण, जि. रायगड यांनी अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर यांचे न्यायालयात स्पे. मु. नं.१०१/२०२३ चा दावा श्री गणेश कृपा रेहलपर्स तर्फे भागीदार श्री. प्रदिप विठ्ठल चव्हाण यांचे विरुद्ध दि. ८/५/२०१३ रोजीचा विकास करारनामा रद्द करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदर दावा प्रलंबित असताना दि. ६/१/२०२३ रोजी प्रदिप विठ्ठल चव्हाण यांचे निधन झालेले आहे. दाव्यामध्ये प्रदिप विठ्ठल चव्हाण या त्यांचे वारसांनी श्री गणेश कृपा डेव्हलपर्सचे इतर भागीदारांची माहिती दिलेली नाही. गणेश विठ्ठल चव्हाण यांनी दि. ८/५/२०१३ रोजी आमचे अशिलांसोबत मौजे पेण, ता. पेण सर्व्हे नं ३२३/३अ, प्लॉट नं. १, क्षेत्र ०-०५-७२ हे. आर. आकार ३६६.०६ रु. पैसे या मिळकतीबाबत विकसन करारनामा केलेला होता. त्यामध्ये त्यांनी श्री गणेश कृपा डेव्हलपर्सचे इतर भागीदार म्हणून करारावर सही केलेली होती व तो करार त्यांनीच लिहिलेला होता. परंतु कै. गणेश विठ्ठल चव्हाण यांनी त्यांच्या हयातीत श्री गणेशकृपा डेव्हलपर्स या भागीदारी फर्मचे इतर भागीदाराचे नावे आमचे अशिलांना कळविलेले नव्हते. तसेच भागिदारी पत्राची प्रत ही त्यांनी व त्यांच्या वारसांनी या दाव्याचेकामी दाखल केलेली नाही. तरी श्री गणेश कृपा डेव्हलपर्स यांचे या भागीदारी फर्मचे कुणीही अन्य भागीदार असल्यास त्यांनी वरील स्पे. मु. नं. १०१/२०२३ या दाव्याचेकामी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हजर राहावे व आपली बाजू मे. न्यायालयात स्वतः वा आपल्या वकीलांमार्फत हजर राहून मांडावी असे कुणीही श्री गणेश कृपा डेव्हलपर्स यांचे भागीदार सदर दाव्याचेकामी उक्त मुदतीत हजर झाले नाहीत तर सदर भागीदार फर्मचे विरुद्ध आदेश करणेकरीता आमचे अशिल मे. न्यायालयात सदर दाव्याचेकामी पुढील कार्यवाही करतील.

हे कळावे.
अलिबाग,
दि. १९-११-२०२६.

सही/-
ॲड. आर.बी.कोसमकर
चिरायु, ब्राम्हण आळी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यांत येते की, मौजे श्रीगांव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील निम्नलिखीत वर्णनाची जमीन मिळकतीमधील ०.१६.०० हे. आर जमीन मिळकत ही श्री. अविनाश तुकाराम जाधव व सौ. समिधा अविनाश जाधव रा. मुंबई यांचे खुद्द मालकीची आहे. सदर जमीन मिळकत ही माझे अशिल यांनी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले असून त्याबाबतची विक्री व्यवहाराची प्राथमिक बोलणी विद्यमान मालक व माझ्या अशिलांमध्ये झालेली आहे. सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसल्याही तऱ्हेचा कायदेशीर हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकतीबाबत बयाणा, साठेकरार, तारण, गहाण, दान, खरेदीखत अगर कोणत्याही मार्गाने गुंतविलेली असल्यास त्यांनी त्यांची हरकत ७ (सात) दिवसाचे आंत निम्नलिखीत पत्त्यावर अथवा रजिस्टर्ड पोस्टाने किंवा प्रत्यक्ष भेटून कळवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास सदर जमीन मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून मागाहून आलेल्या हरकती या जाणीवपूर्वक सोडून दिलेल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशिल सदरहू जमीन मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. हे कळावे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकारणी (रू.पैसे)
श्रीगांव ता. अलिबाग, जि. रायगड.	२८५	०.८१.७० पो.ख. ०.३०.६० एकूण क्षेत्र १.१२.३०	४.५६

(उक्त जमीन मिळकतीमधील श्री. अविनाश तुकाराम जाधव वगैरे १ यांच्या मालकीचे क्षेत्र ०.१६.०० हे. आर आकार रू. ०.८९ पैसे ही जमीन मिळकत या नोटीसचा विषय आहे.)

ठिकाण : अलिबाग
दिनांक : /११/२०२६.

डॉ.ॲड.निहा राऊत
जिल्हा न्यायालय, अलिबाग
मोबाईल नं. ९८२२०६८५२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गोवेले, ता. पोलादपुर, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमीन मिळकती तिचे मालक श्री. सुभाष दगडु रेणोसे यांजकडून कायमच्या खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ (हे. आर.)	आकार (रू. पै.)
१४	५	०-१०-००	०=०६
२२	१४/अ	०-७०-००	०=२२
२४	१४	०-०२-००	०=०२
२४	४७/ब	०-०६-००	०=०३
२९	४	०-०९-४०	०=७२
३०	१३	०-२४-००	०=१६
३०	२७	०-०४-००	०=०३
३४	१७	१-१९-००	०=१२
३६	९	१-७८-००	०=६८
४३	१६	०-११-००	०=०६
४६	१	०-२०-५०	०=०५
५०	६	०-६३-००	०=२५
५२	४५	०-०५-००	०=०६
४४	२०	०-३०-००	०=१२
४४	२७	०-०६-००	०=०६
५२	२८	०-४३-००	०=१२
५२	३	०-१०-००	०=०३

वर वर्णन केलेल्या मिळकतींबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/११/२०२६

ॲड. महेश मोतीराम घरे
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

उरण तालुक्याचे लवकरच भोपाळ होणार?

- गोदामवाल्यांची मुजोरी, प्रशासनाची दलाली
- प्रशासनाच्या निष्क्रियतेचा भडका



| उरण | प्रतिनिधी |

नुकतीच उरण तालुक्यातील वेश्वी येथील प्लॅटिनम लॉजिस्टिक गोदामाला आग लागल्याची घटना घडली. या आगीने प्रशासनाच्या निष्क्रियतेचा बुरखा फाडला आहे. उरणमध्ये यापूर्वीही अनेक भीषण आगी लागल्या आहेत. त्यात अनेकांचे जीव गेले, तर अनेक जखमी झाले; परंतु, या दुर्घटनांना जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली नसल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, आज एका गोदामाला आग लागली, उद्या दुसऱ्या गोदामात दुर्घटना घडली तर त्याची जबाबदारी कोण घेणार? आगींचे हे सत्र थांबले नाही तर उरणच्या माथी एखादी महाभयानक दुर्घटना मारली जाण्याची भीती वर्तविली जात आहे. त्यामुळे उरणचा भोपाळ होण्याची वाट पाहताय का, असा संतप्त सवाल उरणकरांमधून उपस्थित होत आहे.

उरण तालुक्यातील वेश्वी येथील प्लॅटिनम लॉजिस्टिक गोदामाला नुकत्याच लागलेल्या भीषण आगीने प्रशासनाच्या निष्क्रियतेचा बुरखा फाडला आहे. विशेष म्हणजे याच गोदामाला यापूर्वीही भीषण आग लागल्याचे सांगितले जात असून, त्यावेळी हे प्रकरण दडपण्यात आल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. आता पुन्हा त्याच गोदामाला आग लागल्याने संशयाचा धुरळा उडाला आहे. त्यातच उरणमध्ये गोदामांची संख्या वाढत आहे. त्यासाठी येथील कांदळवनांवर भराव टाकल्याच्या तक्रारी आहेत. पावसाळी नाले बुजवले जात असल्याचे देखील आरोप आहेत. त्यामुळे येथील पर्यावरणावर घाला घालून अवैधरित्या गोदाम उभे केले जात असल्याचा आरोप उरणकरांमधून होत आहे.

प्रशासनाच्या निष्क्रियतेचा धूर

एखादी दुर्घटना घडली की पंचनामे, चौकशीचे आदेश आणि आश्वासनांचा बाजार मांडला जातो. मात्र, त्यानंतर सारे काही शांत होते. जनतेचे जीव गेले तरी प्रशासनाच्या संवेदना जाग्या होत नसतील, तर या खुर्च्यांवर बसून संबंधित प्रशासन नेमके करतय तरी काय? असा प्रश्न उपस्थित करत ही आग गोदामात लागली खरी, परंतु, त्यातून धूर मात्र प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निघत असल्याचे बोलले जात आहे. तसेच, येथील गोदामवाल्यांच्या तिजोऱ्या भरताना उरणकरांच्या जीवाची किंमत शून्य झाली असून, उद्या भोपाळपेक्षाही भयानक दुर्घटना घडली तर त्याला जबाबदार कोण, असा संतप्त प्रश्न उपस्थित केला जात आहे.

सुरक्षेपेक्षा राजकीय हितसंबंध मोठे?

या सगळ्या प्रकारावर राजकीय पक्ष आणि नेतेमंडळींचे मौन अधिकच बोलके आहे. जनतेच्या जीवाचा प्रश्न असताना राजकीय नेत्यांच्या तोंडाला कुलूप का? काही गोदामे राजकीय नेते किंवा त्यांच्या निकटवर्तीयांच्या मालकीची असल्याची चर्चा जनतेत आहे. त्यामुळेच कारवाईच्या प्रश्नावर राजकीय मंडळी गप्प असून, जनतेच्या सुरक्षेपेक्षा राजकीय हितसंबंध मोठे आहेत का? राजकारणाच्या आडून नियम मोडणाऱ्यांना संरक्षण मिळत असेल तर हा लोकशाहीचा नव्हे, तर सत्तेच्या माजाचा बाजार असल्याचे उरणकरांमधून बोलले जात आहे.

दरम्यान, लॅटिनम लॉजिस्टिक गोदामात आगीने रौद्ररूप धारण केल्यावर अग्निशमन दलाला पाण्यासाठी धावाधाव करावी लागली. त्यांच्यावर वेश्वी गावातील तलावातून पाणी आणण्याची वेळ आली. या गोदामांमध्ये कोट्यवधींचा माल साठवला जात असून, तेवढीच उलाढाल होते; परंतु, या गोदामांत आग विझवण्यासाठी पुरेसे पाणी आणि अग्निसुरक्षेची साधने उपलब्ध नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. त्यामुळे हा व्यवसाय आहे की नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेला जुगार, असा संताप उरणकरांमधून व्यक्त केला जात आहे.त्यामुळे आज एका गोदामाला आग लागली, उद्या दुसऱ्या गोदामात दुर्घटना घडली तर त्याची जबाबदारी कोण घेणार? आगींचे हे सत्र थांबले नाही तर उरणच्या माथी एखादी महाभयानक दुर्घटना मारली जाण्याची भीती देखील वर्तविली जात आहे.

उरणमध्ये भोपाळसारखी महाभयानक परिस्थिती निर्माण झाल्यावर प्रशासन जागे होणार का? दुर्घटना घडल्यावर मृतदेहांच्या ढिगाऱ्यांवर उभे राहून चौकशीचे आदेश देण्यात काय अर्थ आहे? आजच प्रशासनाने जागे होऊन उरणमधील सर्व यार्ड आणि गोदामांचे अग्निसुरक्षा व कायदेशीर ऑडिट करावे. वेश्वीतील गोदामाला यापूर्वी लागलेल्या आगीची आणि आताच्या आगीची उच्चस्तरीय चौकशी करावी. अग्निशमन प्रमाणपत्रे, पाणीसाठा, आपत्कालीन मार्ग, कांदळवनांवरील अतिक्रमणे आणि नाल्यांवरील भराव यांची तपासणी करावी. नियम मोडणाऱ्यांना केवळ दंडाची पावती देऊन पुन्हा धंदा करण्याची मोकळीक न देता कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी उरणकरांमधून जोर धरत आहे.

निवडक

रोह्याच्या कन्येची अमेरिकेत भरारी

रोहा : शहरातील अष्टमी येथील डॉ. उजमा पठाण यांनी अमेरिकेतील प्रतिष्ठित सार्वजनिक विद्यापीठ असलेल्या बाल्टिमोर येथील युनिव्हर्सिटी ऑफ मेरीलँडमध्ये सार्वजनिक आरोग्य विषयातील पीएच.डी. संशोधनाचा यशस्वी बचाव दि.१७ नोव्हेंबर रोजी पूर्ण करून आपल्या शैक्षणिक कारकिर्दीत एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. त्यांच्या पीएच.डी. संशोधनाचा विषय ''ओपिऑइड वापर विकार आणि हिपॅटायटिस सी उपचारांचा प्रवास व त्यांचा आरोग्यविषयक परिणाम'' असा आहे. या संशोधनामध्ये ओपिऑइड वापर विकार आणि हिपॅटायटिस सी या दोन्ही आरोग्यसमस्यांनी ग्रस्त असलेल्या व्यावसायिक आरोग्य विमाधारक व्यक्तींच्या उपचारपद्धती, उपचारांमधील सातत्य आणि त्यांचे आरोग्यावर होणारे परिणाम यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील महत्त्वाच्या समस्यांवर प्रकाश टाकणारे हे संशोधन समाजोपयोगी ठरण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल तिचे पालक आरिफ व शबीना पठाण यांनी मनस्वी आनंद व अभिमान व्यक्त केला. आपल्या मुलीच्या अनेक वर्षांच्या मेहनतीचे आणि स्वप्नपूर्तीचे फलित प्रत्यक्ष अनुभवण्याचा हा क्षण आमच्यासाठी अत्यंत आनंददायी व अविस्मरणीय असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.



सामाजिक एकता बळकट होणारः डॉ. राजपूरकर

आगरदांडा : धार्मिक परंपरांचे जतन करण्याबरोबरच समाजातील एकोपा, बंधुभाव आणि परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ होते. भविष्यातही अशा सामुदायिक मौंजीबंधन सोहळ्याच्या माध्यमातून धार्मिक परंपरा, संस्कार आणि सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला आहे. अशा उपक्रमांमुळे समाजबांधवांना एकत्र येण्याची संधी मिळते, असा विश्वास दैवज्ञ ब्राह्मण सोनार समाजाचे डॉ.नंदकुमार राजपुरकर यांनी व्यक्त केला. दैवज्ञ समाज संस्था रायगडच्यावतीने ४० बटूंचा भव्य सामुदायिक मौंजीबंधन (उपनयन संस्कार) सोहळा माणगाव येथील हॉटेल ओपन अंब्रेला येथे आयोजित करण्यात आला होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ. नंदकुमार राजपुरकर, वासंती उमरोटकर, दीपक राजुरकर, सुहास वेदक, किशोर वेदपाठक, सुर्यकांत विरकर, प्रविण पिसात, दैवज्ञ समाजातील अनेक मान्यवरांसह महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या सुमारे ८०० समाजबांधवांच्या उपस्थित होते.



'यंग मॉर्निंग कट्टा'चा उत्साह

उरण : येथील विमला तलाव परिसरात दररोज सकाळी ज्येष्ठ नागरिकांचा हा समूह व्यायाम, योगासने, ध्यानधारणा आणि मॉर्निंग वॉकसाठी एकत्र येतो. केवळ व्यायामापुरता हा कट्टा मर्यादित नसून मैत्री, आनंदी जीवनशैली, सकारात्मक विचार आणि सामाजिक बांधिलकी जपणारे हे एक व्यासपीठ बनले आहे. या समूहातील सदस्यांचा उत्साह, ऊर्जा आणि जिद्द पाहता हा ज्येष्ठ नागरिकांचा कट्टा नसून खऱ्या अर्थाने 'यंग मॉर्निंग कट्टा' असल्याचे चित्र दिसून येते. डॉ. सत्या ठाकरे यांनी वाढदिवसानिमित्त या ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले होते. या शिबिराला ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्य तपासणी करून घेतली. आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाने आपल्या आरोग्याची योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. नियमित व्यायाम, योगासने, संतुलित आहार आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी यांचे महत्त्व डॉ. ठाकरे यांनी यावेळी उपस्थितांना समजावून सांगितले. यावेळी कामगार नेते संतोष पवार यांनी डॉ. सत्या ठाकरे यांना पुस्तक भेट देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या शिबिरासाठी डॉ. घन:श्याम पाटील, डॉ. अविनाश गिरकर, विरेश मोडखरकर, घन:श्याम कडू यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

दुचाकींमुळे श्रीवर्धनमध्ये वाहतूक कोंडी



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन शहरामध्ये सध्या खूप मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला वेड्यावाकड्या उभ्या करण्यात येत असलेल्या दुचाकींमुळे वाहतूक कोंडीच्या प्रमाणामध्ये भर पडत असते. तर, श्रीवर्धनमध्ये येणाऱ्या पर्यटकांची वाहने देखील बेशिस्तपणे रस्त्यात उभी करत असतात. रस्त्याच्या मधोमध वाहन उभे करून मॅप बघून कुठल्या रस्त्याने जायचे हे विचार करून ठरवत असतात. त्यामुळे एका गाडीच्या मागे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. अगोदरच शहरातील रस्ते अरुंद आहेत. श्रीवर्धनमधील तीन चाकी रिक्षावाले देखील अनेक ठिकाणी रिक्षा स्टँड नसताना आपल्या रिक्षा उभ्या करत असतात. तर शहरातून जाणाऱ्या सहा आसनी रिक्षा प्रवासी घेण्यासाठी जागोजाग उभ्या राहत असल्याने देखील वाहतूक कोंडी होत असते.

आता दिवाळीची सुट्टी संपत आली आहे. आता श्रीवर्धनमध्ये सहलींच्या बसेस येणे सुरू होईल. या बसेस श्रीवर्धन शहराच्या प्रवेशद्वारापासून समुद्रकिनाऱ्याजवळ जाईपर्यंत संपूर्ण शहरातील रस्त्यांवरती वाहतूक कोंडी होते. कारण मोठमोठ्या बस असल्यामुळे समोरून एखादे छोटे वाहन आले तरी बस सावकाशपणे पुढे न्यावी लागते. संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून अनेक शाळा व महाविद्यालयांच्या सहली श्रीवर्धन येथे येत असतात. त्यामध्ये काही खासगी लक्झरी बसेस असल्यानंतर त्या शहरातील रस्त्यावरून नेणे अशक्य असताना देखील सहली बरोबर आलेले शिक्षक या बस घेऊन समुद्रकिनाऱ्यापर्यंत येतात. श्रीवर्धन शहरात सुद्धा अनेक अल्पवयीन मुले दुचाकी चालवत असल्यामुळे अपघाताचा धोका वाढलेला आहे. तरी श्रीवर्धन पोलिसांनी अल्पवयीन दुचाकी चालक आढळल्यास कारवाई करण्याची आवश्यकता असल्याचे नागरीकांमधून बोलले जात आहे.

वाहतूक कोंडीमुक्त शहरासाठी पुढाकार



| चणेरा | प्रतिनिधी |

रोहा शहराची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असून, धाटाव औद्योगिक वसाहतीमुळे शहरासह संपूर्ण तालुक्यात लोकसंख्येत आणि वाहनांच्या संख्येत मोठी वाढ होत आहे. परिणामी सकाळ संध्याकाळी शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनत आहे. त्यातच रस्त्यांवरील बेशिस्त पार्किंग आणि अवजड वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर रोहा-अष्टमी नगरपरिषदेत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीला नगराध्यक्ष वनश्री शेडगे, मुख्याधिकारी अजय एडके, उपनगराध्यक्ष, नगसेवक, रोहा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अभय शेलार, जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक सचिन पवार, वाहतूक नियंत्रण पोलीस, रिक्षा व टेम्पो चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत रोहा शहरातील वाहतूक व्यवस्थेला शिस्त लावण्यासाठी विविध महत्त्वपूर्ण उपाययोजनांवर चर्चा झाली. त्यामध्ये रिक्षा आणि टेम्पोसाठी विशिष्ट जागा निश्चित करून त्यांना नियमावली लागू करणे, अवजड वाहनांना गर्दीच्या वेळेत प्रवेशबंदी करणे, एमआयडीसीच्या बसेससाठी ठराविक थांबे निश्चित करणे, तसेच सागर डेअरी आणि येवले चहा परिसरातील अपघातप्रवण ठिकाणी सिग्नल यंत्रणा उभारण्याच्या मुद्द्यांचा समावेश आहे. यासोबतच शहरातील पार्किंग व्यवस्थाही अधिक शिस्तबद्ध करण्यावर भर देण्यात आला. या सर्व उपाययोजनांबाबत लवकरच अधिकृत पत्रक काढून प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जाणार असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी, शिस्तबद्ध आणि वाहतूक कोंडीमुक्त रोहा घडवण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे स्पष्ट केले. प्रशासनाकडून नियम तयार केले जातील; मात्र, त्यांचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारी नागरिकांचीही आहे. त्यामुळे प्रत्येक रोहेकराने वाहतुकीच्या नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

वेतनवाढीच्या मागणीसाठी संप

| खोपोली | प्रतिनिधी |

दुय्यम न्यायालयांमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाने शिफारस करूनही महाराष्ट्र शासनाकडून अद्याप मंजूर करण्यात आलेला नाही. शासनाच्या या विलंबाविरोधात अखेर महाराष्ट्र राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी दि.१७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे. खालापूर न्यायालयासमोर सुरू असलेल्या या आंदोलनात सहायक अधीक्षक साक्षी पन्हाळे, सहायक अधीक्षक दिपाली वडावकर, विलास नलावडे यांच्यासह एकूण २१ न्यायालयीन कर्मचारी सहभागी झाले आहेत.

रायगड हॉस्पिटलला दहा वर्षे पूर्ण

| नेरळ | प्रतिनिधी |

रायगड हॉस्पिटलने अनेक चढउतार आपल्या १० वर्षाच्या कालावधीत पाहिले आहेत. मात्र, यश अपयशाच्या पायऱ्या चढत रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील सामान जनतेसाठी हक्काचे मोफत सेवा देणारे हॉस्पिटल म्हणून पुढे आले आहे. आता मागे न पाहता आणखी एक मेडिकल कॉलेज उभारण्याचा निर्धार आहे, असे उद्गार सरस्वती एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार तासगावकर यांनी काढले. रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर स्थापनेला १० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल एका कौटुंबिक कार्यक्रमाचे आयोजन



करण्यात आले होते. रायगड हॉस्पिटलमध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमाला सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन नंदकुमार तासगावकर तसेच संस्थेच्या सचिव वंदना तासगावकर, संस्थेचे पदाधिकारी मृदुल तासगावकर, कार्यकारी संचालक नागसेन कांबळे, महेश काशिद, रमाकांत तरे, पठाण, हॉस्पिटलचे डीन डॉ.सुब्रम्हयण आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी रायगड हॉस्पिटलमध्ये सलग वर्षे सेवा देणाऱ्या आरोग्य सेविका आणि आरोग्य कर्मचारी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

उरण तालुक्यात सरकारी लूट?

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील सरकार जमीन म्हणजे सोन्याची खाण बनली असून, ती काही अधिकारी व धनदांडग्यांसाठी जणू खुली तिजोरीच बनली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल, सिडको, महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड, जेएनपीए, नगरपालिका, पंचायत समिती आणि वनविभागाच्या अखत्यारीतील जमिनींवर कथित बेकायदा अतिक्रमण करून अनेकांनी आपले आर्थिक साम्राज्य उभे केले आहे. कंटेनर यार्ड, भंगार दुकाने, पार्किंग, ढाबे, रीलिंग सेंटर, गॅरेज, बार, रेस्टॉरंट, टपऱ्या, अनधिकृत बांधकामे आणि आठवडा बाजार अशा विविध व्यवसायांचा उरणमध्ये सुळसुळाट झाला आहे. दरम्यान, उरणमध्ये येणारा शासकीय अधिकारी अल्पावधीतच मालामाल होत असल्याची चर्चा जनतेत रंगू लागली आहे. संबंधित अधिकारी वर्गाकडे पुराव्यांसह लेखी तक्रारी करूनही कारवाई होताना दिसत नाही. विशेष म्हणजे, काही बेकायदा व्यावसायिकांकडून दरमहा लाखोंचा मलिदा दिला जात असल्याच्या चर्चा रंगत आहेत. हा मलिदा नेमका कोणाच्या खिशात जातो? कोणाच्या आशीर्वादाने सरकारी जमिनींवर बेकायदा धंद्यांचे साम्राज्य फोफावते? असे प्रश्न देखील उपस्थित केले जात आहेत.

स्पर्धा परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन

| रसायनी | प्रतिनिधी |

कोयना क्षत्रिय मराठा समाज सेवा संघाच्यावतीने युवक-युवतींसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच इतर विविध स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागामध्ये गट 'क' संवर्गमध्ये एकूण १६,७१७ पदांची भरती करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन शनिवारी (दि.२१) ठाणे (प.) येथील मावळी मंडळ खुले सभागृह येथे सकाळी १० वाजता करण्यात आले आहे.

गाणी येथे जलतारा उपक्राचा शुभारंभ



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.० तसेच माझी वसुंधरा अभियान अंतर्गत श्रीवर्धन तालुक्यातील गाणी येथे नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे. ग्रामपंचायत क्षेत्रात प्लास्टिकमुक्त आणि जलसमृद्ध वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने श्रीवर्धन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजू किरवे यांच्या हस्ते नाविन्यपूर्ण बर्तन बँक आणि जलतारा कामाचा दिमाखदार शुभारंभ करण्यात आला.

गावात कार्यक्रमांच्या किंवा घरगुती समारंभाच्या निमित्ताने होणारा प्लास्टिक आणि थर्मोकोलच्या डिस्पोजेबल वस्तूंचा वापर टाळून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी बर्तन बँक (भांडी बँक) उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यामुळे गावात प्लास्टिकमुक्त गावाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यास मोठी मदत होणार आहे. ''पाण्याचे थेंब अन् थेंब जमिनीत मुरवूया, भूजल पातळी वाढवूया'' या धोरणांतर्गत भविष्याची सुवर्णसंधी साधत हा उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमावेळी सरपंच आदित्य कासरुंग, उपसरपंच सुभाष उजळ, निखील कदम, चांदणी कासरूंग, तनिषा आब्रसकर, आत्माराम रहाटवळ, विशाखा उजळ, श्रेया रहाटवळ, ग्रामपंचायत अधिकारी अभिजीत माने आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन | **पालीकरांना 'मोरूची मावशी'ची मेजवानी**

रायगडच्या सांस्कृतिक विश्वात नाट्यकलेचा जागर



(छायाचित्र: धम्मशील सावंत)

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्यावतीने पाली येथे चौदाव्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या नाट्यमहोत्सवात राज्याच्या विविध भागांतून व्यावसायिक तसेच होतकरू कलाकार सहभागी होणार असून, नाट्यरसिकांसाठी ही एक मोठी सांस्कृतिक पर्वणी ठरणार आहे. यंदाच्या स्पर्धेचे आयोजन आणि नियोजनाबाबत प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी बुधवारी (दि.१८) आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत माहिती दिली.

या पत्रकार परिषदेला प्रकाश देसाई, शांताराम सोनार, विक्रम काटकर, संतोष भोईर, मयूर कारखानीस, आरिफ मनियार, आलाप मेहता, दत्तात्रेय सावंत, मिलिंद सातूर्डेकर, सुनील तिरमिले, हिमांशू शहा, आशिष हजारे, सुहास लोखंडे आणि ऋषिकेश पिंपळे यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या रंगभूमीला नवे कलाकार देणारा आणि ग्रामीण भागात नाट्यसंस्कृती रुजविणारा हा उपक्रम यंदाही पालीच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणार आहे. त्यामुळे सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील आणि राज्यभरातील नाट्यप्रेमींनी १८ ते २४ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या या एकांकिका स्पर्धांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून कलाकारांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे. या स्पर्धांना पाली येथील ग. बा. वडेर हायस्कूलच्या रंगमंचावर दररोज सायंकाळी ७ वाजता सुरुवात होणार आहे. तसेच, या सात दिवसीय नाट्यमहोत्सवाची सांगता विशेष आकर्षणाने होणार आहे. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी 'मोरूची मावशी' या लोकप्रिय नाटकाचा खास नाट्यप्रयोग सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे एकांकिका स्पर्धेसोबतच रसिकांना दर्जेदार नाट्यप्रयोगाचा आनंदही घेता येणार आहे. तसेच, या स्पर्धेत ठेवण्यात आलेली भरघोस पारितोषिके ही या स्पर्धेचे सर्वांत मोठे आकर्षण आहे. तसेच, सुधागड तालुक्यातील एकांकिकांनाही विशेष प्रोत्साहनपर पारितोषिके देण्यात येणार असून, उत्कृष्ट अभिनय, नेपथ्य, प्रकाशयोजना यांसह विविध कलात्मक विभागांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कलाकारांचाही गौरव करण्यात येणार आहे.



राशीभविष्य

- **मेष** : स्वाभिमान दुखावला जाईल. दु:खद वार्ता प्राप्त होऊ शकेल. किंमती वस्तुंची काळजी घ्यायला हवी.
- **वृषभ** : मेहनतीचं उत्तम फळ मिळेल. विचारपूर्वक केलेली गुंतवणूक लाभदायक ठरेल. बाकी चिंता नसावी.
- **मिथुन** : उत्साह वाढवणाऱ्या घटना घडतील. मोठ्या कार्यासाठी उत्साह राहील. विचारपूर्वक बोलायला हवं.
- **कर्क** : कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. भेटवस्तुंची प्राप्ती होऊ शकेल. नोकरीत अधिकार वाढतील.
- **सिंह** : नव्या ओळखींबाबत विचार करावा. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावं. द्विधा मनस्थिती राहील.
- **कन्या** : कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. व्यापार-व्यवसायात समाधानी रहाल. बाकी चिंता नसावी.
- **तूळ** : महत्त्वाच्या योजनांमध्ये यश मिळेल. मित्र तसंच नातलगांचं सहकार्य लाभेल. प्राप्ती सुलभ ठरेल.
- **वृश्चिक** : आरोग्यविषयक तक्रारी संभवतात. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. कौटुंबिक समाधान लाभेल.
- **धनु** : शारीरिक हानी वा आर्थिक नुकसान संभवतं. महत्त्वाची कामं मार्गी लागतील. प्रवासात लाभ होईल.
- **मकर** : नोकारीत वरिष्ठांकडून कौतुक होईल. भाग्याची साथ लाभेल. प्रलंबित कामं मनासारखी होतील.
- **कुंभ** : स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळेल. उत्पन्नात वाढ होणार आहे. रागावर वेळीच नियंत्रण ठेवायला हवं.
- **मीन** : शैक्षणिक, संशोधन कार्यात यश मिळेल. मानसन्मान लाभेल. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.

२० नोव्हेंबर

दिनविशेष

१८५४ : प्रख्यात कवी, निबंधकार, नाटककार मोरो गणेश लोंढे यांचा जन्म.
१९६३ : इंग्लिश गणित तज्ञ टिमोथी गॉवर्स यांचा जन्म.
१९७३ : केशव सीताराम ठाकरे यांचं निधन.
१९७९ : सौदी अरेबियातील काबा मशिदीत सुमारे २०० सुन्नी लोकांनी ६,००० लोकांना ओलिस धरलं. सौदी सरकारने फ्रान्सच्या मदतीने हा उठाव हाणून पाडला.
१९९८ : आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाचा पहिला भाग प्रक्षेपित.

जाणून घ्या

देशोदेशीचे बाल दिन

मुलांनो, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन म्हणजे १४ नोव्हेंबर हा दिवस आपल्याकडे बाल दिन म्हणून साजरा केला जातो. तर असा हा बाल दिन फक्त भारतातच नाही तर इतर देशांमध्येही साजरा होतो.

❊ जपानमध्ये पाच मे हा दिवस बाल दिन म्हणून साजरा होतो. या दिवसाला 'कोदोमो नो ही' असं म्हटलं जातं. या दिवशी लहानग्यांसाठी विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. त्यांचं खूप कौतुक होतं. ❊ कॅनडामध्ये २० नोव्हेंबरला बाल दिन असतो. या दिवसाला 'चाईल्ड डे ॲक्ट' असंही म्हटलं जातं. १९९३ मध्ये कॅनडातल्या संसदेत लहान मुलांच्या हक्कांसाठी कायदा संमत करण्यात आला. त्यामुळे या दिवसाला 'चाईल्ड डे ॲक्ट' म्हणतात. ❊ अमेरिकेत जून महिन्यातला दुसरा रविवार बाल दिन असतो. इतकंच नाही, तर हा संपूर्ण आठवडा 'फॅमिली वीक' म्हणून साजरा होतो. या आठवड्यात कुटुंबातले सर्व सदस्य एकमेकांसोबत वेळ घालवतात, खूप मजा करतात. ❊ मेक्सिकोमध्ये ३० एप्रिल हा दिवस बाल दिन असतो. या दिवशी शाळांमध्ये कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. तसंच पालकांनाही खास आमंत्रण दिलं जातं.

आरोग्यमंत्र

औषधी पालेभाज्या

आहारात पालेभाज्यांचं महत्व वेगळं असतं. आहार परिपूर्ण होण्यासाठी पालेभाज्या खाल्ल्या पाहिजेत. पालेभाज्यांत औषधी गुणधर्म असतात. कोथिंबीर उष्णता कमी करणारी, पित्तनाशक असते. हृदरोगावर अतिशय उपयुक्त आहे. पालक मूत्रसंस्था, पचनसंस्था यांच्या आतील सूज़ेला मऊपणा आणण्यास उपयुक्त असून दमा व खोकला कमी करणारी आहे. माठ हृदयाच्या कार्याला उपयोगी असून ही भाजी खाल्यावर शौचाला साफ होते. चाकवत ही पचण्याला सुलभ असून ज्वरनाशक आहे. त्वचेला कांती देणारी अशी ही भाजी आहे.



ही भाजी कृमीनाशक असून यकृताच्या सर्व विकारांवर उपयुक्त आहे. हादगा खोकला, पित्त, हिवताप कमी करणारी ही भाजी आहे. या हा फुलांचा रस मधातून घेतल्याने छातीतील कफ लवकर सुटतो. अळूच्या पानांचा व दांड्यांचा रस जंतुनाशक आहे. शरीराच्या कापलेल्या भागावर याचा रस लावून पट्टी बांधल्यास जखमा लवकर भरून येतात. याचा रस साखरेबरोबर दिवसातून दोन-तीन वेळा घेतल्यास मूळव्याध कमी होते. अंबाडी मीरपूड व साखर यांच्याबरोबर अंबाडीचा रस प्राशन केल्यास तो पित्तनाशक ठरतो. टाकळा ही भाजी खाल्ल्यानं सर्वांगाला येणारी खाज कमी होते. तांदुळजा बाळंतीणीला दूध वाढवण्यास ही भाजी उपयोगी ठरते. मेथीमध्ये लोहाचं प्रमाण बरंच आहे. याचं बी वातहारक व शक्तिकारक असतं, म्हणून बाळंतपणात याचा उपयोग केला जातो. दूधवाढीसाठीही त्याचा उपयोग होतो.

पंचांग

शुक्रवार, २० नोव्हेंबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८, कार्तिक शु. १०/११, चंद्रराशी : मीन, नक्षत्र : पू. भाद्रपदा, उ. भाद्रपदा
योग : वज्र,
सूर्योदय ६.५१, सूर्यास्त ५.५८

फॉरवर्ड्स

कैसें क़ह दूँ क़ी महँगाई बहोत हैं...

मेरें शहर के चौराहें पर आज़ भी एक रुपये में कईं दुआएं मिलतीं हैं...!

भटकंती

दोस्तांनो, तुम्हाला वन्यजीवन आवडत असेल किंवा यंदा जंगलसफारीची योजना आखत असाल तर मध्य प्रदेशमधलं बांधवगड राष्ट्रीय उद्यान खास आहे. बांधवगड राष्ट्रीय उद्यान वाघांसाठी प्रसिद्ध आहे. ४५० चौरस किलोमीटर परिसरात पसरलेलं हे राष्ट्रीय उद्यान जैवविविधता आणि निसर्गसौंदर्यासाठी ओळखलं जातं. बांधवगड राष्ट्रीय उद्यानात ३५० प्रजातींचे पक्षी पहायला मिळतात तर प्राण्यांच्या २२ प्रजाती इथे सुखाने नांदतात.

वाघांसह इथे चितळ, तरस, माकडं, हरणं, सांबर, चिंकारा, बिबट्या, रानमांजर हे प्राणी मुक्तपणे विहार करताना दिसतात. **(क्रमश:)**

डाएट अँड न्यूट्रिशन

किती वेळा प्यावा ग्रीन टी

ग्रीन टीचे असंख्य लाभ आहेत. पण ग्रीन टीच्या अतिरेकामुळे काही दुष्परिणाम होऊ शकतात. त्याविषयी...

❊ काहींना कॅफेनची ॲलर्जी असते. अशांना ग्रीन टीमधल्या कॅफेनमुळे त्रास होऊ शकतो. ग्रीन टीमध्ये कॅफेनचं प्रमाण तुलनेने बरंच कमी असलं तरी याच्या अतिसेवनामुळे चिडचिड, निद्रानाश, पोट बिघडणं अशा समस्या निर्माण होतात. त्यामुळे ग्रीन टी दिवसातून एक किंवा दोनवेळा प्यावा. ❊ काही व्याधींवर औषधोपचार सुरू असतील तर ग्रीन टीचं सेवन करताना काळजी घ्यायला हवी. ग्रीन टी आणि ॲस्पिरिन कधीही एकत्रितपणे घेऊ नये. ❊ रिकाम्या पोटी ग्रीन टी पिऊ नये. यामुळे पेप्टीक अल्सर आणि ॲसिड रिफ्लक्सची समस्या निर्माण होते. त्यामुळे न्याहरीसोबत ग्रीन टी प्यावा. जेवणानंतर ग्रीन टी पिता येईल. ❊ ग्रीन टीमध्ये पॉलीफेनॉल्स असतात. यामुळे हृदयविकार आणि कॅन्सरला अटकाव होतो. मात्र एका अभ्यासानुसार ग्रीन टीचं अतिसेवन केल्यास यातले पॉलीफेनॉल्स मूत्रपिंड तसंच यकृताच्या कार्यावर परिणाम करतात. त्यामुळे ग्रीन टी दिवसातून दोनच वेळा प्यावा.

करिअरवाटा

व्हा ॲग्रीकल्चरल मार्केटर

सध्या शेतकऱ्यांचा माल थेट ग्राहकांपर्यंत नेण्यावर भर दिला जात आहे. या पद्धतीत ग्राहकांनाही माल स्वस्त मिळतो आणि शेतकऱ्यांनाही चार पैसे जास्त मिळतात. या यंत्रणेतून ॲग्रीकल्चरल मार्केटर हा नवा घटक उदयाला आला आहे. पीक काढल्यानंतर या घटकाचं काम सुरू होतं, असं सर्वसाधारणपणे मानलं जातं. परंतु, प्रत्यक्षात ते त्यापूर्वीच सुरू झालेलं असतं. शेतकऱ्यांना एक सल्ला दिला जातो, की जे पिकवाल ते विकण्याचा प्रयत्न करू नका. परंतु, जे विकतं ते पिकवा. म्हणजेच बाजारावर नजर ठेवून शेती करा. अशी नजर ठेवणं हे मार्केटिंगचंच काम आहे.



म्हणून ॲग्रीकल्चरल मार्केटर हा शेतकऱ्यांना शेतात काय पिकवावं, असा सल्ला देण्यापासून कामात गुंतलेला असतो. शेतमाल पिकवल्यापासून तो माल ग्राहकाच्या हातात पडेपर्यंत निवडणं, साठवणं, पॅकिंग, वाहतूक करणं, प्रोसेस करणं, जाहिरात करणं, वितरण करणं आणि विक्री एवढ्या क्रिया असतात. या सर्व कामात ॲग्रीकल्चरल मार्केटर उपयुक्त असतो. या कामाचं प्रशिक्षण देणाऱ्या काही संस्था कार्यरत झाल्या आहेत. पदवीनंतरचा ॲग्री बिझनेस एम.बी.ए. असा स्वतंत्र कोर्स तयार करण्यात आला आहे. इच्छुकांनी त्याचा लाभ घ्यावा.

खेचाखेची

साडी

बायको : अहो, मला आज पहाटे स्वप्नात दिसलं, तुम्ही साडी घ्यायला मला ५००० रुपये दिलेत. पहाटेचं स्वप्न खरं होणार का?
.
.
.
नवरा : होणार ना. ठेव ते ५००० रुपये तूच आणि आण त्याची साडी.

वेगळं काही

ओलफ प्रजातीच्या एका बेडकाचा जन्म आयव्हीएफ तंत्रज्ञानाद्वारे झाला आहे. ओलफ प्रजाती दुर्मीळ होत चालली आहे. १९८७ पासून या प्रजातीच्या बेडकांची संख्या खूप कमी झाली आहे. या प्रजातीच्या बेडकांचं अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अमेरिकेतल्या टेक्सासमधलं फोर्ट वर्थ प्राणीसंग्रहालय आणि मिसिसिपी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. या प्रक्रियेसाठी सहा नर बेडकांचे शूक्राणू गोठवून ठेवण्यात आले होते. या शूक्राणूंचं दोन मादी बेडकांच्या बीजांडांशी फलन घडवून आणण्यात शास्त्रज्ञांना यश आलं आणि या बेडकाचा जन्म झाला. आयव्हीएफ तंत्रज्ञानाने जन्मलेल्या या बेडकाचं वजन अवघं सहा ग्रॅम आहे. यामुळे भविष्यात विविध प्रजातींचं संरक्षण शक्य होणार आहे.

संगोपन

वातावरण सकारात्मक हवं

मुलांना सतत कोणत्या ना कोणत्या परीक्षेची तयारी करावी लागते. त्यांचा हा अभ्यास हसत खेळत, तणावरहित व्हावा यासाठी काही मुद्दे लक्षात घेणं गरजेचं ठरतं.

❊ आपल्या मुलांनी भरपूर गुण मिळवावेत, असं वाटत असलं तरी प्रत्येक मूल वेगळं असतं हे पालकांनी लक्षात घ्यायला हवं. त्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव टाकू नका. ❊ मुलांची इतरांशी तुलना करू नका. यामुळे त्यांच्यामध्ये कमीपणाची भावना निर्माण होऊ शकते. ❊ मुलांवर सतत अभ्यास करण्याचा दबाव टाकू नका. अभ्यास करताना मुलांना येणाऱ्या अडचणींचा विचार करा. त्यांच्याशी बोला. एखादा विषय कठीण वाटत असेल तर चर्चा करून मार्ग काढा. ❊ मुलांशी प्रेमानं बोला. कमी गुण मिळाले म्हणून त्यांना ओरडू नका. कमी गुण का मिळाले यामागची कारणं जाणून घ्या. ❊ घरातलं वातावरण सकारात्मक आणि शांत ठेवा. ❊ मुलं डोकेदुखी, अंगदुखी, चक्कर येणं, विस्मरण, भीती वाटणं, अस्वस्थ वाटणं अशा तक्रारी करत असतील तर त्याकडं दुर्लक्ष करू नका. त्यांना डॉक्टरांकडं न्या. गरज पडली तर समुपदेशकाची मदत घ्या.



सुडोकू १७६

७		९	१					
	२			७				६
५		४	३				१	७
					९		५	४
९		७		४		१		२
८	४		७					
६	९				८	५		१
४				३			६	
					६	४		९

टीप -

❊ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
❊ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
❊ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १७५ चे उत्तर

८	३	२	१	६	४	५	९	७
७	९	५	२	८	३	६	४	१
१	४	६	७	९	५	२	३	८
९	२	३	८	४	७	१	६	५
६	७	१	९	५	२	३	८	४
४	५	८	६	३	१	९	७	२
३	६	७	५	२	८	४	१	९
५	८	४	३	१	९	७	२	६
२	१	९	४	७	६	८	५	३

शब्दकोडे क्रमांक १७६



आडवे शब्द :-

१) धान्य वगैरे
४) सर्वत्र
८) दक्षतेचा शब्द
११) वध करणे
१३) बरोबर, ठिक
१५) विळाखा
१६) किंमत
१८) विटी कोलण्याचा बारीक खड्डा
१९) नगर
२१) नाला
२२) पाणी उकळतानाचा आवाज
२५) चिंचेची चव
२७) कार्य
२८) नवाकोरा
३१) टीका करणारा
३४) असुर
३५) तृण
३७) अलमारी
३९) प्रवासीगाडी
४०अ) धातूचा धागा
४१) जिवंत असे तोवर
४४) एक चर्मवाद्य
४५) केर
४६) पायापासून डोक्यापर्यंत
४८) अनुत्तीर्ण
५०) मधुमक्षिका
५२) कडक (केस)
५४) आनंद
५५) गाय
५६) मैत्रीण
५७) तूप,
५८) ढग
६०) कारस्थान
६२) चौक
६४) अपशकुन
६६) कावळा
६७) तास
६८) बारीक दगड
६९) दुलई
७०) प्रमाणपत्र
७१) सहाय्यक
७२) स्वच्छ
७३) रेशीमाचे जाडसर कापड
७५) करणारा, जबाबदार
७७) मावा
७९) वाळा गवताचे मूळ
८०) कबूतर
८१) जमीन
८२) आश्रय, थारा

उभे शब्द :-

१) दावा सांगणारा,
२) गाई-म्हशीचे घर
३) चटोर, फाजील
४) पावसाची झड
५) गणपती
६) मकबरा
७) रांजण
८) तात्पर्यार्थ
९) लहान (भाऊ)
१०) साहित्यातील नऊ भावना
१२) सामान
१४) मोठे डोळे,
१७) जुगाराचा एक प्रकार
२०) उपस्थिती
२३) खरकट्याची प्रचंड रास
२४) पुष्कळ
२६) बांगला देशाचे चलन
२८) कौशल्य
२९) मनाचा ओढा
३०) बिना वासाचे पांढरे फूल
३२) चिंता, फिकीर
३३) दु:ख
३६) लक्ष, अवधान
३८) मागोमाग
४०) रस्ता
४१) विश्रांती
४२) नवरदेवाची आई
४३) मृत्यू नसलेला
४५) सत्वांश
४६) प्रार्थना, उपासना
४७) स्तुती करण्याचे जोगे
४८) आवाज, छंद
४९) स्वयंपाकाचे शास्त्र
५१) मनाने घेतलेली भीती
५४) हर्ष
५९) रसाळ
६१) डोंगराचा उभा कडा
६२) नावात केलेला बदल
६३) एकटा, शेणपाण्याचे शिंपण
६५) फळाचे साल
६६) खराब
६७) कलावंत
६८) अफूचे बी
७२) लहान
७४) मित्र
७६) गव्हाचे जाडसर पीठ
७८) वाहणारी हवा

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

वा	ळ	वं	ट	■	रा	स	ग	र	बा	■	म	ल	मा	स
प	■	द	■	र	ज	त	■	क	व	■	न	ट	■	ग
र	ज	नी	ना	थ	■	त	न	म	न	ध	न	■	मा	ळी
■	ल	य	■	या	ग	■	र	■	क	डा	■	ढो	■	क
क	द	■	भि	त्रा	■	रा	म	दा	स	■	स	ल	क	डे
ळ	■	अ	न्न	■	क	णी	■	ढी	■	आ	वा	■	ले	■
स	पा	ट	■	न	र	व	र	■	सां	ज	■	स	व	त
■	य	■	स	■	व	सा	ह	त	■	का	र	भा	र	■
आ	ज	ता	गा	य	त	■	दा	वा	न	ल	■	थी	■	पा
ज	मा	व	■	क्ष	■	वा	री	■	म	■	र	ट	र	ट
न्म	■	दा	म	■	वा	स	■	म	क	रं	द	■	य	व
■	स	न	स	ना	टी	■	क	ल	ह	■	न	य	न	■
पा	त	■	ल	ट	■	म	■	म	रा	ठी	■	■	दि	वा
क	वा	य	त	■	ता	जा	क	ल	म	■	क	र	व	त
ळी	■	दा	■	टा	क	■	र्ण	■	■	ख	र	व	स	■

निवडक

खेळताना तरुण खेळाडूचा मृत्यू

अर्जेंटिना : फुटबॉलच्या मैदानात एक धक्कादायक घटना घडली. त्यामुळे सर्वच हादरून गेले. अर्जेंटिनातील ही धक्कादायक



घटना आहे. या घटनेने जगभरातील फुटबॉल प्रेमींवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. मॅचच्या दरम्यान एक शॉट थेट एबेल नुनेज या खेळाडूच्या डोक्याला जाऊन लागला. त्यामुळे त्याचा मैदानावरच मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर खेळाच्या मैदानावरील खेळाडूंची सुरक्षा आणि आपत्कालिन आरोग्य व्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर सवाल केले जात आहेत. ब्यूनस आयर्सजवळी जोस सी. पाज परिसरात ही घटना घडली. एफसी एजीजा आणि डेपोर्टिव्हो मुनिजच्या युवा टीमच्या दरम्यान सामना खेळवला गेला. मैदानात खेळ अत्यंत वेगाने आणि उत्साहात सुरू होता. त्यावेली विरोधी टीममधील एका खेळाडूने चेंडू क्लिअर करण्यासाठी संपूर्ण ताकद लावून एक जोराचा शॉट मारला. चेंडू फार दूर गेला नाही. पण प्रचंड वेगाने तो १८ वर्षाच्या एबेल नुनेज याच्या डोक्याला जाऊन लागला. व्हिडीओत विरोधी टीमच्या खेळाडूचा पायही त्याच्या डोक्याला लागताना दिसत आहे. ही टक्कर इतकी भयानक होती की तरुण खेळाडू स्वत:ला सावरून शकला नाही. चेंडू लागताच त्याला भोवळ आणि तो खाली कोसळला. तो कोसळताच संपूर्ण संघाने त्याच्या भोवती गराडा केला. डॉक्टरांनीही मैदानात येऊन त्याचा ताबा घेतला. त्याला तात्काळ वैद्यकीय उपचार दिले गेले. पण वेळ निघून गेली होती.

आता रायझिंग स्टार्स करंडकाचे लक्ष्य

दोहा : नुकत्याच झालेल्या १९ वर्षांखालील आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत भारताने अखेरच्या चेंडूवर पाकिस्तानचा पराभव करून विजेतेपद पटकावले. आता रायझिंग स्टार्स आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेचे लक्ष्य भारतीय संघाने बाळगले आहे. या स्पर्धेत रविवारी भारत आणि पाकिस्तान यांच्यात साखळी सामना रंगणार आहे. यंदाची ही स्पर्धा ५० षटकांच्या स्वरूपात खेळवली जाणार आहे. भारत आणि पाकिस्तानसह आशियातील आठ संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. भारताने या स्पर्धेसाठी बलाढ्य संघाची निवड केली आहे. तिलक वर्मा भारतीय संघाचे नेतृत्व करणार असून, टी-२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीतील अव्वल फलंदाज अभिषेक शर्मा आणि युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी यांचाही संघात समावेश आहे.पाकिस्तान अ संघात १९ वर्षांखालील आशिया करंडक स्पर्धेत खेळलेले अली रझा आणि मोहम्मद हसनैन यांचा समावेश आहे. याशिवाय अनुभवी साद मसूद, हैदर अली आणि हसन नवाझ यांच्यावरही संघाची भिस्त असेल.भारताचा स्पर्धेतील पहिला सामना २० नोव्हेंबर नेपाळविरुद्ध होणार आहे. त्यानंतर २२ नोव्हेंबर भारताची गाठ पाकिस्तान अ संघाशी पडेल.

भारतीय संघ : तिलक वर्मा (कर्णधार), अभिषेक शर्मा, वैभव सूर्यवंशी, प्रभसिमरन सिंग, रिंकू सिंग (उपकर्णधार), कुमार कुशाग्र, सूर्यांश शेडगे, शाहबाज अहमद, विपराज निगम, हर्ष दुबे, तनुष कोटियन, हर्षित राणा, प्रिन्स यादव, अर्शद खान आणि आयुष बदोनी.

महाराष्ट्राची हिमाचल प्रदेशवर मात

चंडीगड : महाराष्ट्राच्या क्रिकेट संघाने दोन पराभवांनंतर सय्यद मुश्ताक अली या राष्ट्रीय टी-२० स्पर्धेत पहिला विजय साकारला. महाराष्ट्राने क गटातील लढतीत हिमाचल प्रदेश संघावर दोन विकेट राखून रोमहर्षक विजय संपादन केला. विकी ओस्तवालची अष्टपैलू चमक महाराष्ट्राच्या विजयाचे वैशिष्ट्य ठरली. हिमाचल प्रदेशकडून महाराष्ट्राच्या संघासमोर १४६ धावांचे आव्हान उभे ठाकले. रोहितकुमारच्या गोलंदाजीवर पृथ्वी शॉ (एक धाव) व अर्शिन कुलकर्णी (०) हे सलामीवीर झटपट बाद झाले. त्यानंतर मात्र साहील पारख (३५ धावा), ऋषीकेश सोनावणे (४२ धावा) व सिद्धेश वीर (२२ धावा) यांनी मधल्या फळीत झुंज दिली. विजयासाठी प्रयत्नही केले.महाराष्ट्राचा संघ १२व्या षटकांत पाच बाद ९० धावा अशा अडचणीत सापडला. पुढे जाऊन महाराष्ट्राची अवस्था आठ बाद १३४ धावा अशीही झाली. विकी ओत्सवाल याने महाराष्ट्राचा पाय खोलात गेला असताना १८ चेंडूंमध्ये नाबाद २५ धावांची खेळी साकारली. या खेळीमध्ये त्याने चार चौकारही मारले. त्याच्या महत्त्वपूर्ण खेळीच्या जोरावर अखेरच्या चेंडूवर विजय साकारला.हिमाचल प्रदेशने २० षटकांत पाच बाद १४५ धावा फटकावल्या. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या इकांत सेन याने नऊ चौकार व एक षटकारासह नाबाद ७३ धावांची खेळी साकारली. महाराष्ट्राच्या संघाकडून विवेक शेलार व विकी ओत्सवाल यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले.या पहिल्या विजयामुळे महाराष्ट्राचे गुणांचे खाते उघडले चार गुणांसह ते सहाव्या स्थानावर आहेत. क गटात मध्य प्रदेश आणि पुदुचेरी यांनी प्रत्येकी १२ गुणांसह अनुक्रमे पहिले आणि दुसरे स्थान मिळवले आहे.

वेलिंग्टन कसोटी पहिला दिवस

निकोलस-फिलिप्सने सावरला डाव

| वेलिंग्टन | वृत्तसंस्था |

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी, भारतीय गोलंदाजांनी ७० धावांत ५ गडी गमावून किवी संघाला बॅकफूटवर ढकलले होते. मात्र, हेन्री निकोल्स आणि ग्लेन फिलिप्स यांनी किवी संघाला पुनरागमन करून दिले. दोन्ही फलंदाजांनी कठीण परिस्थितीत उत्कृष्ट फलंदाजी करत संघाला संकटातून बाहेर काढले आणि सहाव्या विकेटसाठी १७३ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. दिवसाचा खेळ संपता संपता, न्यूझीलंडने ८२ षटकांत ५ गडी गमावून २४३ धावा केल्या होत्या. निकोल्स शतक पूर्ण करून खेळपट्टीवर आहे, तर ग्लेन फिलिप्स शतकापासून ६ धावा दूर आहे.



न्यूझीलंड ५ बाद २४३ धावा

भारताने सोपा झेल सोडला

या सामन्यात १५३ धावांवर निकोलस आणि फिलिप्स यांची भागीदारी तोडण्याची संधी भारताला मिळाली होती. मात्र, देवदत्त पडिक्कल आणि ऋषभ पंत यांच्यातील गैरसमजामुळे एक सोपा झेल सुटला आणि प्रसिद्ध कृष्णाचे प्रयत्न वाया गेले.

न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीच्या षटकांमध्ये सलग बळी घेत किवी संघाला मोठा धक्का दिला. कर्णधार टॉम लॅथम एकही धाव न काढता जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर डेव्हन कॉनवेने ४ धावा केल्या, पण अंशुल कंबोजच्या गोलंदाजीवर ऋषभ पंतने त्याचा झेल घेतला.

हेन्री निकोलसचे शानदार शतक

हेन्री निकोलसने कठीण परिस्थितीत डाव सावरला आणि एक शानदार शतक झळकावले. दिवसाचा खेळ संपताना तो २२१ चेंडूंमध्ये ११३ धावांवर नाबाद राहिला. त्याच्या खेळीत १४ चौकारांचा समावेश होता. निकोलसने संयमाने फलंदाजी करत भारतीय गोलंदाजांना बराच काळ खेळपट्टीपासून दूर ठेवले आणि संघाला सन्मानजनक धावसंख्या गाठण्यास मदत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

ग्लेन फिलिप्स शतकाच्या जवळ

दुसरीकडे, ग्लेन फिलिप्स, जो शतकाच्या जवळ पोहोचला होता, दिवसाचा खेळ संपताना नाबाद राहिला. त्याने १८२ चेंडूंमध्ये १३ चौकारांसह ९४ धावा केल्या. फिलिप्सने निकोलससोबत मिळून भारतीय गोलंदाजांवर दबाव टाकला. टी-२० मालिकेतील विक्रमी कामगिरीनंतर, फिलिप्सने कसोटीतही उत्कृष्ट फलंदाजी करून आपली क्षमता दाखवून दिली.

७० धावांत पाच गडी बाद

रचिन रवींद्र १५ धावांवर आकाश दीपच्या गोलंदाजीवर ऋषभ पंतकरवी झेलबाद झाला. डॅरिल मिचेल केवळ एक धाव काढू शकला आणि जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीवर यशस्वी जैस्वालकरवी झेलबाद झाला. टॉम ब्लंडेलनेही पाच धावा केल्या, पण तो शुभमन गिलकरवी झेलबाद झाला. अशाप्रकारे, सुमारे ७० धावांत पाच गडी गमावल्याने न्यूझीलंड अडचणीत सापडले होते. पाच गडी गमावल्यानंतर, हेन्री निकोल्स आणि ग्लेन फिलिप्स यांनी भारतीय गोलंदाजांविरुद्ध जोरदार फलंदाजी केली. दोघांनीही गडी वाचवले आणि धावफलक पुढे सरकत ठेवला. त्यांच्या भागीदारीने न्यूझीलंडला सुरुवातीच्या धक्क्यातून सावरले आणि त्यांना मजबूत स्थितीत आणले. त्यांनी सहाव्या गड्यासाठी नाबाद १७३ धावांची भागीदारी केली.

गणेश देवखिळे, गौरव राव यांना दुहेरी मुकुट

| नांदेड | प्रतिनिधी |

नांदेड डिस्ट्रिक्ट आणि सिटी लॉन टेनिस संघटनेच्या वतीने आयोजित आणि आयटीएफ, एआयटीए, एमएसएलटीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या कोहिनुर-एनईएस एमटी २०० जागतिक वर्ल्ड मास्टर्स वरिष्ठ टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत गणेश देवखिळे व गौरव राव यांनी एकेरी आणि दुहेरी या दोन्ही गटांत विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट संपादन केला.एनईएस सायन्स कॉलेज येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत दुहेरीच्या ३० वर्षांवरील पुरुष गटात गणेश देवखिळे व गौरव राव या जोडीने अव्वल मानांकित गौरबदीप घोष व जयनारायण के. आर. या जोडीचा पराभव करून विजेतेपद पटकावले. ५० वर्षांवरील पुरुष गटात हरजिंदर सिंग चिरागिया व संजय चंदवानी यांनी जतिंदर गंभीर व भूपिंदर कुमार यांचा पराभव करून विजेतेपद मिळवले.

आयसीसीने टीम इंडियाला आकारला दंड



| ॲडलेड | वृत्तसंस्था |

न्यूझीलंडची सिरीज जिंकल्यावर देखील टीम इंडियाची चिंता वाढली आहे. आयसीसीने टीम इंडियावर मोठी कारवाई केली आहे. टीम इंडियावर आयसीसीने ३५ टक्के दंड आकारला आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या पाचव्या आणि अंतिम एकदिवसीय सामन्यात भारतीय संघाने विजय मिळवला असला, तरी सामना संपल्यानंतर संघाला एक मोठा धक्का बसला आहे.

निर्धारित वेळेत ओव्हर्स पूर्ण न करू शकल्यामुळे आयसीसीने भारतीय खेळाडूंवर मोठी कारवाई केली आहे. टीम इंडियाने वेळेत ओव्हर्स पूर्ण न केल्याने आयसीसीने खेळाडू आणि प्लेयर सपोर्ट स्टाफसाठी असलेल्या आचारसंहितेच्या कलम २.२२ अंतर्गत ही कारवाई केली आहे. या नियमानुसार, प्रत्येक कमी असलेल्या ओव्हर्ससाठी खेळाडूंना मॅच फीच्या निश्चित टक्केवारीनुसार दंड ठोठावला आहे. त्यामुळे भारताने सिरीज जिंकली असली तरी आयसीसीने केलेल्या कारवाईमुळे टीम इंडियाच्या आनंदावर विरजण पडले आहे.

आयसीसीच्या नियमानुसार, निर्धारित वेळेत ओव्हर्स पूर्ण न केल्यास दंडात्मक कारवाई केली जाते. निर्धारित वेळेत प्रत्येक ओव्हर कमी पडल्यास खेळाडूंच्या मॅच फीच्या पाच टक्के इतका दंड आकारला जातो.

न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात स्लो ओवर रेट प्रकरणी शेवटच्या सामन्याचा कर्णधार श्रेयस अय्यरने आपली चूक मान्य केली आहे. मॅच रेफरी रंजन मदुगले यांनी सुचवलेली शिक्षा विनाअट स्वीकारली असल्याचे समजते आहे.

१४ वा राज्यस्तरीय कराटे ट्रेनिंग कॅम्प संपन्न



| उरण | प्रतिनिधी |

- **साठ विद्यार्थ्यांनी शिबिरात घेतला सहभाग**
- **मुलींना स्व-संरक्षणाचे दिले ज्ञान**

शोतोकान कराटे डू स्पोर्ट्स महाराष्ट्र, मिक्स बॉक्सिंग फेडरेशन रायगड व विजय विकास सामाजिक संस्था ऑल स्टाईल कराटे फेडरेशन यांच्या वतीने १२ नोव्हेंबर २०२६ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीमध्ये पेण कुरमुली श्री. बल्लाळेश्वर फार्म हाऊस येथे कराटे ट्रेनिंग कॅम्प मोठया उत्साहात पार पाडण्यात आला.

या कराटे कॅम्पमध्ये एकूण ६० ज्युनिअर व सिनियर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कॅम्पमध्ये फुल कॉन्टॅक्ट व सेमी कॉन्टॅक्ट कराटे, ज्युडो, मिक्स बॉक्सिंग, वेपन्स, कराटे काताज, किक बॉक्सिंग, नानचाकू यांचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच या कॅम्पमध्ये मुलींसाठी स्व-संरक्षणाचे ज्ञान कसे संपादन करावे यांचे प्रशिक्षण देण्यात आले. या कॅम्पमध्ये सर्व ज्युनिअर व सिनियर ब्लॅक बेल्ट उपस्थित होते.

त्यामध्ये विकास भोईर महाराष्ट्र प्रेसिडेंट शोतोकान कराटे डू स्पोर्ट्स असोसिएशन अध्यक्ष, मिक्स बॉक्सिंग फेडरेशन रायगड अध्यक्ष तसेच विजय विकास सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष व दिपक घरत, प्रगती भोईर, घरत, महेश भोईर, अजय तांडेल, अर्थव घरत, सोनल तांडेल, किरण हरगिलवाड, मिलन जाधव, पृथ्वीराज कुंभार, निखिल पाटील, स्वरा पेढवी, नैतिक घरत हे ब्लॅक बेल्ट उपस्थित राहून प्रशिक्षण दिले. हरेश्वर ठाकूर यांनी सी.पी. आर. बद्दल मार्गदर्शन केले. तसेच एकलव्य अकॅडमीचे राम आणि रूद्रांश अकॅडमीच्या गुंजन यांनी मोलाचे मार्गदर्शन दिले. या कॅम्पसाठी माजी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी पुढील वाटचालींसाठी शुभेच्छा देऊन कॅम्पमध्ये सहभाग घेतलेल्या प्रशिक्षणार्थींचे मनोधैर्य वाढवले.उपस्थित सर्व मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली १४ वा राज्यस्तरीय कराटे कॅम्पची सांगता मोठया उत्साहात करण्यात आली.

अर्पितचा सनसनाटी विजय

| मुंबई | प्रतिनिधी |

एचसीएल ८२व्या राष्ट्रीय स्क्वॉश स्पर्धेत अर्पित चोटालियाने शानदार खेळाचे प्रदर्शन करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सुरुवातीचे दोन गेम गमावल्यानंतरही हार न मानता अर्पितने जोरदार पुनरागमन केले आणि सदाशिव शिंगवाचा ३-२ असा पराभव करत पुरुष एकेरीच्या अंतिम १६ खेळाडूंमध्ये स्थान मिळवले.



वांद्रे येथील ओटर्स क्लबच्या ग्लास-बॅक कोर्टवर ही स्पर्धा सुरू आहे. स्क्वॉश रॅकेट्स फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित या स्पर्धेत अर्पित आणि सदाशिव यांच्यात चुरशीची लढत पाहायला मिळाली. सुरुवातीचे दोन गेम अर्पितने ८-११, ९-११ अशा फरकाने गमावले. मात्र, त्यानंतर त्याने खेळाची लय बदलत तिसऱ्या गेममध्ये ११-३ असा मोठा विजय मिळवला. चौथ्या गेममध्येही ११-४ अशी बाजी मारत त्याने सामना २-२ असा बरोबरीत आणला. निर्णायक पाचव्या गेममध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये जोरदार चुरस रंगली. अखेर अर्पितने १२-१० असा गेम जिंकत सामना आपल्या नावावर केला.

पुरुष गटातील अन्य सामन्यात रणजित सिंगने आदर्श बनोधाचा ११-६, ४-११, १४-१२, २-११, ११-६ असा पराभव केला. गोव्याच्या यश फडतेनेही उत्कृष्ट फॉर्म कायम राखत गुरवीर सिंगला १३-११, ११-९, ११-९ असे सरळ तीन गेममध्ये हरवले. अभय एस. वासुदेवने ध्रुव गंगाशेट्टीवर ११-३, ११-२, ११-७ असा विजय मिळवला.

१४ वर्षांखालील खेळाडूंचीही बोन टेस्ट?

मुंबई क्रिकेट संघटनेचा लवकरच निर्णय अपेक्षित

| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबई क्रिकेट संघटना १४ वर्षांखालील मुलांच्या स्पर्धेतील वयचोरी टाळण्यासाठी कठोर उपाययोजना करणार आहे. अजित नाईक स्मृती स्पर्धेत पुढील वर्षापासून उपांत्यपूर्व फेरीपासून बोन टेस्ट होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर वयचोरी करणाऱ्या खेळाडूंविरुद्ध कठोर कारवाई करण्याचा विचारही मुंबई क्रिकेट संघटना करीत आहे.

अजित नाईक स्मृती १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेचा बक्षीस समारंभ मंगळवारी वरळी स्पोर्ट्स क्लबवर झाला. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात संघटनेचे खजिनदार अरमान मलिक यांनी वयचोरी टाळण्यासाठी १४ वर्षांखालील स्पर्धेतील खेळाडूंची बोन टेस्ट करण्याचा प्रस्ताव मांडला.



मुंबई क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी वयचोरी करणाऱ्या खेळाडूंवर भारतीय दंड संहितेनुसार कारवाई केली जाईल, असेही स्पष्ट केले.

नाईक यांनी खेळाडूंच्या पालकांना संघनिवडीत हस्तक्षेप न करण्याची सूचना केली. आपल्या मुलाच्या निवडीसाठी संघटनेच्या कार्यालयात फोन केल्यास त्याची निवड होणार नाही. त्याने चांगली कामगिरी केली असली तरीही हा निर्णय कायम राहील, असा इशारा त्यांनी दिला. त्याचबरोबर पालकांनी मुलांना साथ द्यावी. त्यांच्या क्रिकेटमधील प्रगतीची काळजी आम्ही घेऊ. आमची निवड समिती खेळाडूंच्या मैदानावरील कामगिरीचा अभ्यास करीत असते. त्याचबरोबर क्रिकेट सुधार समितीही आहे. मुंबई क्रिकेट संघटनेला विजेतेपदापेक्षा कमी काहीही मान्य नसते. त्यामुळे त्यासाठी सर्व प्रयत्न केले जातात आणि त्यानुसारच संघनिवड होत असते, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

वरळी स्पोर्ट्स क्लबचे मुंबई क्रिकेटमधील योगदान खूप मोलाचे आहे. या क्लबने आयोजित केलेल्या अजित नाईक स्मृती स्पर्धेने मुंबईला अनेक खेळाडू दिले, असे नमूद करून माजी कसोटीपटू राजू कुलकर्णी यांनी नवोदित खेळाडूंनी सुरुवातीला लाल चेंडूवरील क्रिकेटवर प्रभुत्व मिळवणे योग्य ठरेल, असे सांगितले. त्यानंतर पांढऱ्या चेंडूवरही चांगली कामगिरी करता येईल, असे ते म्हणाले.

२० नोव्हेंबरला पाकिस्तानशी महामुकाबला! | सुनील रमेशची नाबाद ६३ धावांची खेळी

बांगलादेशला नमवत भारत फायनलमध्ये

| ढाका | वृत्तसंस्था |

ब्लाइंड आशिया कप २०२६ मध्ये भारतीय दृष्टिबाधित क्रिकेट संघाने शानदार कामगिरी करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. बुधवारी ढाका येथे झालेल्या उपांत्य सामन्यात भारताने यजमान बांगलादेशचा ८ विकेट्सनी पराभव केला.

आता २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या अंतिम सामन्यात भारताचा सामना पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होणार आहे. साखळी फेरीत पाकिस्तानकडून झालेल्या एका विकेटच्या निसटत्या पराभवाचा बदला घेण्याची संधी भारतीय संघाला मिळणार आहे.



या सामन्यात नाणेफेक जिंकून भारताने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय गोलंदाजांनी शिस्तबद्ध कामगिरी करत बांगलादेशला निर्धारित २० षटकांत ७ बाद १२३ धावांवर रोखले. कर्णधार टी. दुर्गा रावने तीन षटकांत १० धावा देत एक विकेट घेतली. लोकेशा, देबराज बेहेरा आणि सुनील रमेश यांनी प्रत्येकी एक विकेट मिळवली.

भारतीय क्षेत्ररक्षकांनीही तीन फलंदाजांना धावबाद करत बांगलादेशच्या धावसंख्येला आळा घातला. बांगलादेशकडून मुहम्मद तहाफिजने ३० चेंडूंत नाबाद ३६ धावा केल्या.

१२४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय फलंदाजांनी सुरुवातीपासून आक्रमक पवित्रा घेतला. सुनील रमेशने नाबाद ६३ धावांची खेळी करत भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. त्याने ४१ चेंडूंचा सामना करत सात चौकारांसह ही धावसंख्या उभारली. त्याचा स्ट्राइक रेट १५३.६६ इतका होता.

संजय कुमार शाहने २५ चेंडूंत ३२ धावा करत त्याला चांगली साथ दिली. तर सुखरामने १५ चेंडूंत नाबाद २० धावा केल्या. भारताने अवघ्या १३.२ षटकांत २ बाद १२४ धावा करत ४० चेंडू राखून विजय मिळवला.

अंतिम सामन्यापूर्वी भारतीय कर्णधार टी. दुर्गा राव यांनी संघाचा आत्मविश्वास व्यक्त केला. बांगलादेशविरुद्धच्या विजयामुळे संघाला अंतिम सामन्यासाठी बळ मिळाले आहे. साखळी फेरीत पाकिस्तानविरुद्ध केवळ एका विकेटने पराभव झाला होता. त्या सामन्यातील चुका लक्षात घेऊन २० नोव्हेंबरला सर्वोत्तम कामगिरी करण्यावर संघाचे लक्ष असेल, असे त्यांनी सांगितले.

भारतामधील दृष्टिबाधितांसाठी क्रिकेट संघटनेचे (सीएबीआय) अध्यक्ष डॉ. महांतेश जी. के. यांनीही भारतीय संघाचे अभिनंदन केले. संपूर्ण स्पर्धेत खेळाडूंनी चांगली कामगिरी केली असून, पाकिस्तानविरुद्धच्या अंतिम सामन्यातही संघ विजेतेपद मिळवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भारताचे मिशन 'वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप फायनल'

| मुंबई | प्रतिनिधी |

टीम इंडिया च्या न्यूझीलंड दौऱ्याची सांगता कसोटी मालिकेने होणार आहे. उभयसंघात या मालिकेत एकूण २ कसोटी सामने खेळवण्यात येणार आहेत. टीम इंडिया या स्पर्धेच्या पहिल्या २ साखळीत उपविजेता राहिली आहे. भारताने पहिल्या दोन्ही साखळीत अंतिम फेरीत धडक दिली. मात्र दोन्ही वेळा भारताचं स्वप्न अधुर राहिलं. तर टीम इंडिया सलग तिसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहचण्यात अपयशी ठरली. तर सध्या या स्पर्धेच्या चौथ्या साखळीचा थरार सुरु आहे.

भारताला चौथ्या साखळीत काही खास करता आलेलं नाहीय. त्यामुळे टीम इंडियाचं सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहचण्याचं स्वप्न भंगणार का? याची भीती चाहत्यांना आहे.

प्रत्येक संघाचं वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनल खेळण्याचं स्वप्न असतं. मात्र भारतीय संघासाठी यंदा हा प्रवास अत्यंत कठीण ठरला आहे. त्याचं कारण म्हणजे आतापर्यंतच्या काही मालिकांमधील निराशाजनक कामगिरी. त्यामुळे भारताची फायनलमध्ये पोहचण्याची वाट बिकट झाली आहे. मात्र भारतीय संघ या चौथ्या साखळीतून बाहेर झालेला नाही. भारतासाठी तिथवर पोहचणं आव्हानात्मक आहे, मात्र अशक्य नाही. मात्र टीम इंडिया तिथे पोहचणार की नाही? हे भारताच्या आगामी ७ सामन्यांवर अवलंबून असणार आहे. त्यामुळे टीम इंडियाला न्यूझीलंड विरूद्धच्या कसोटी मालिकेत जबरदस्त कामगिरी करावी लागणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)